दैनिक
सिंहवाणी वृत्त
दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ८ | वर्ष : १ | अंक : ३११ | किंमत : २ रूपये

शुभ दसरा

धम्मचक्र प्रवर्तन
दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!

ROKDE
G.O.A.T
OFFER
GREATEST OF ALL TIME
Till 11th Nov'26



फ्लॅट 40% ची सूट*
22KT गोल्ड ज्वेलरीच्या मेकिंग चार्जेसवर

फ्लॅट 60% ची सूट*
18KT गोल्ड ज्वेलरीच्या मेकिंग चार्जेसवर

फ्लॅट 100% ची सूट*
डायमंड ज्वेलरीच्या मेकिंग चार्जेसवर

मिळवा 101%*
तुमच्या जुन्या सोन्याच्या मूल्यावर

*नियम व अटी लागू

जुने सोने आहे? तर रोकडे ज्वेलर्समध्ये जरूर या!
तुमच्या जुन्या सोन्याची योग्य किंमत जाणून घ्या आणि एक्सचेंजवर जास्त मूल्य मिळवा!

हे आहे नवं रोकडे
22 कॅरेट गोल्ड ज्वेलरी
मेकिंग चार्जेस
आता फक्त
5% पासून सुरू

ROKDE
JEWELLERS
वर्षे 1902 पासून सौभाग्याचे स्वरूप

चंद्रपुर – गिरनार चौक
(शोरूम रविवारसह आठवड्यातील सर्व दिवस सुरू राहील)

गडचिरोली – चंद्रपूर रोड, हॉटेल लँडमार्कच्या समोर
(शोरूम बुधवारसह आठवड्यातील सर्व दिवस सुरू राहील.)

व्हॅलेट सेवा आणि 4 व्हीलर पार्किंग सुविधा उपलब्ध आहे.

नागपूर | भंडारा | गोंदिया | चंद्रपूर | गडचिरोली लवकरच: यवतमाळ टोल फ्री क्र.: 1800 268 1010

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६

संपादकीय लेखणीतून...

शुल्क लादण्याचा धोका टळला

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या देशांवर आयात शुल्क लादणारे नवीन नियम तात्पुरते रद्द केले आहेत त्यामुळे भारत आणि चीनसारख्या देशांवर १०० टक्केपर्यंत शुल्क लादण्याचा धोका टळला आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्रीय हिताचा हवाला देत हा निर्णय घेतला; पण याचा अर्थ असा नाही की, रशियावरील अमेरिकेचे सर्व निर्बंध उठवले गेले आहेत. गरज भासल्यास हे नियम पुन्हा लागू करण्याचा अधिकारही ट्रम्प यांनी राखून ठेवला आहे. अमेरिकेला कोणतेही व्यापारी नुकसान होऊ नये, हे सुनिश्चित करण्यासाठी ट्रम्प या कायद्याद्वारे अनेक कठोर उपाययोजना करण्याची योजना आखत होते. या कायद्यानुसार रशियाकडून तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या देशांवर पूर्ण १०० टक्के शुल्क लादले गेले असते. यामुळे रशियासोबत व्यापार करणाऱ्या देशांना मोठे आर्थिक नुकसान झाले असते. दिवंगत सिनेटर लिंडसे ग्रॅहम हे या कायद्याचे प्रमुख समर्थक होते. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्यावर होणारी टीका आणि रशियासोबत अमेरिकेची वाढत चाललेली जवळीक या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी हा आदेश दिला आहे. अमेरिका आणि रशिया यांच्यातील जवळीक गेल्या काही काळापासून दिसून येत आहे.

ट्रम्प यांनी रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांच्या प्रमुखांना युद्ध थांबवण्याचे आवाहन केले आहे. या काळात त्यांनी दोन्ही देशांवर विविध प्रकारे दबाव आणला; पण ते युद्ध टाळू शकले नाहीत. एका कार्यकारी आदेशात ट्रम्प यांनी जाहीर केले की, ग्रॅहम कायद्यांतर्गत असलेले निर्बंध, प्रतिबंध आणि शुल्क यांना सूट देण्यात येईल. त्यांनी सांगितले की, काँग्रेसला एक प्रमाणपत्र सादर करण्यात आले असून, हे राष्ट्रीय हितासाठी उचललेले पाऊल असल्याचे म्हटले आहे. रशियासंबंधित शुल्कांवरील ही स्थगिती केवळ काही दिवसांपुरतीच असण्याची शक्यता आहे. अध्यक्ष ट्रम्प भविष्यात साधक-बाधक बाबींचा विचार करून हे निर्बंध लागू करू शकतात त्यामुळे त्यांच्या या ताज्या निर्देशांमुळे ही स्थगिती दीर्घकाळ टिकेल की नाही याबद्दल शंका आहे. चीननंतर भारत हा रशियन कच्चा तेलाचा दुसरा सर्वांत मोठा खरेदीदार आहे. ग्रॅहम कायद्याद्वारे, अमेरिका रशियावर कठोर निर्बंध लादू इच्छिते. या कायद्यानुसार रशियाकडून अतिरिक्त तेल खरेदी करणाऱ्या कोणत्याही देशाला आर्थिक निर्बंधांना सामोरे जावे लागेल. हे निर्बंध रशियाकडून तेल व वायू खरेदी करणाऱ्या पहिल्या ५ देशांना लागू होतील; पण जे देश त्यांच्या एकूण तेलाच्या गरजेपैकी केवळ १५ टक्के आयात करतात त्यांना सूट दिली जाईल. तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० ते ५०० टक्के शुल्क आकारले जाऊ शकते. अमेरिकेत पुढील महिन्यात होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांच्या तोंडावर हा निर्णय घेण्यात आला आहे. हा नवा कायदा लागू होऊन रशियन तेलाचा ओघ मोठ्या प्रमाणावर घटला असता तर अमेरिकेसह जगभरात आधीच वाढलेले इंधनाचे भाव आणखी भडकले असते. याचा थेट फटका आगामी निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला बसण्याची शक्यता होती म्हणूनच निवडणुकांआधी वाढत्या इंधन किमतींना लगाम घालण्यासाठी ट्रम्प सातत्याने पावले उचलत आहेत. काही दिवसांपूर्वी रशियाकडून अमेरिका आणि इतर देशांना होणाऱ्या डिझेल निर्यातीवरचे निर्बंध उठवण्यासाठी झालेला करार हे याचेच एक उदाहरण आहे. या सवलतीमुळे रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर दंडात्मक कारवाई होण्याचा धोका सध्या तरी टळला आहे; मात्र याचा अर्थ अमेरिका भविष्यात भारतावर दबाव आणणारच नाही, असा होत नाही.

ट्रम्प हे त्यांच्या लहरी स्वभावासाठी प्रसिद्ध आहेत त्यामुळे मध्यावधी निवडणुकांनंतर त्यांचे प्रशासन रशिया आणि युक्रेनच्या मुद्द्यावर काय भूमिका घेते ते पाहणे महत्त्वाचे आहे. भारत हा कच्च्या तेलाचा जगातला तिसरा सर्वांत मोठा ग्राहक असून देशाची ८८ टक्क्यांहून अधिक गरज आयात तेल साठ्यांमधून भागवली जाते. रशिया हा भारताचा सर्वांत मोठा पुरवठादार देश आहे. सप्टेंबरमध्ये भारत रशियाकडून दररोज १९ लाख बॅरल कच्चा तेलाची आयात करत होता. हे प्रमाण त्या महिन्यातल्या भारताच्या एकूण तेल आयातीच्या ३५ टक्क्यांहून अधिक होते. त्या आधीच्या महिन्यातही आयात यापेक्षाही जास्त होती. जुलै महिन्यात भारताने दररोज २८ लाख बॅरल आयात करण्याची विक्रमी पातळी गाठली होती. ट्रम्प यांनी दिलेल्या सवलतीमुळे भारतासमोरचा पेच तूर्त तरी मिटला आहे.



स्टारलिंक विरुद्ध सरकार: भारताचे सुरक्षा नियम आणि सॅटेलाइट इंटरनेटची आगामी क्रांती

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा

२१ व्या शतकातील डिजिटल क्रांती आता जमिनीवरून थेट अंतराळात पोहोचली आहे. उपग्रह इंटरनेटच्या माध्यमातून जगातील कोणत्याही कोपऱ्यात अतिजलद इंटरनेट पोहोचवण्याची क्षमता या तंत्रज्ञानात आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात, जिथे दुर्गम भागात ऑप्टिकल फायबर पोहोचवणे अत्यंत जिकिरीचे आहे, तिथे हे तंत्रज्ञान वरदान ठरू शकते. मात्र, या नव्या बाजारपेठेवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सध्या जागतिक आणि देशांतर्गत कंपन्यांमध्ये मोठी रस्सीखेच सुरू आहे. 'स्टारलिंक' या जगप्रसिद्ध कंपनीचे मालक एलन मस्क यांनी नुकतेच भारतीय धोरणांवर सडकून टीका केली. काही ठराविक भारतीय उद्योगपती आपली मक्तेदारी टिकवण्यासाठी आणि 'स्टारलिंक'ला रोखण्यासाठी सरकारी यंत्रणांवर दबाव आणत असल्याचा गंभीर आरोप मस्क यांनी केला. या आरोपांमुळे तंत्रज्ञान आणि दूरसंचार क्षेत्रात मोठे वादळ निर्माण झाले. मस्क यांना भारतात विनाअडथळा आणि तातडीने प्रवेश हवा आहे, परंतु भारताचे कायदे आणि सुरक्षा धोरणे त्यांना त्यांच्या अटींवर देशात येऊ देण्यास तयार नाहीत.

एलन मस्क यांच्या या आक्रमक आरोपांना भारत सरकारच्या दूरसंचार मंत्रालयाने अत्यंत सडेतोड आणि स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे. देशाचे कायदे सर्वांसाठी समान असून, कोणत्याही परदेशी कंपनीसाठी ते शिथिल केले जाणार नाहीत, अशी ठाम भूमिका सरकारने घेतली आहे. भारताची बाजारपेठ खुली असली तरी ती राष्ट्रीय सुरक्षेच्या अटींवरच खुली राहील, असा स्पष्ट संदेश यातून देण्यात आला आहे. सध्या 'स्टारलिंक'सोबतच 'रिलायन्स जिओ' आणि 'वनवेब' यांसारख्या कंपन्यांना 'जीएमपीसीएस' (ग्लोबल मोबाईल पर्सनल कम्युनिकेशन बाय सॅटेलाईट) परवाना देण्यात आला आहे. मात्र, या सर्व कंपन्या व्यावसायिक सेवा सुरू करण्यापूर्वीच्या सुरक्षा चाचणीच्या एकाच टप्प्यावर आहेत. त्यामुळे कोणत्याही परदेशी कंपनीवर अन्याय होत असल्याचा मस्क यांचा दावा सरकारने पूर्णपणे फेटाळून लावला आहे. भारताचे धोरण हे सर्वांना समान संधी देणारे आहे, हे सरकारने यातून सिद्ध केले आहे.

भारत सरकाचा हा सावध आणि कठोर दृष्टिकोन केवळ व्यावसायिक स्पर्धेपुरता मर्यादित नाही, तर त्यामागे देशाच्या अंतर्गत सुरक्षेचे अत्यंत गंभीर कारण दडलेले आहे. उपग्रह इंटरनेट थेट अंतराळातून चालत असल्यामुळे त्याला जमिनीवरील टॉवर किंवा केबलची आवश्यकता नसते. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात अतिरेक्यांनी शोधता न येणाऱ्या उपग्रह फोनचा वापर केला होता. ही घटना भारताच्या सुरक्षा यंत्रणांसाठी एक मोठा धडा होती. त्यामुळे उपग्रहाद्वारे होणाऱ्या माहितीच्या देवाणघेवाणीवर नियंत्रण आणि निगराणी असणे अनिवार्य झाले आहे. याच कारणामुळे सरकारने सर्व उपग्रह इंटरनेट कंपन्यांना त्यांचे 'डेटा सेंटर्स' आणि 'सर्व्हर्स' म्हणजेच 'गेटवे' भारताच्या भौगोलिक सीमेतच उभारणे बंधनकारक केले आहे. भारतीय वापरकर्त्यांचा डेटा देशाबाहेर जाऊ नये आणि सुरक्षेच्या कारणास्तव सरकारी यंत्रणांना आवश्यकतेनुसार या माहितीची कायदेशीर तपासणी करता यावी, हा यामागील मुख्य उद्देश आहे. 'स्टारलिंक'ने या नियमांचे पालन करण्यासाठी भारतात २० गेटवे उभारण्याची तयारी दर्शवली असली, तरी संपूर्ण तांत्रिक आणि सुरक्षा तपासणी पूर्ण झाल्याशिवाय त्यांना हिरवा कंदील मिळणार नाही.

सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२६ मध्ये केंद्र सरकारने दूरसंचार क्षेत्रात मोठे धोरणात्मक निर्णय घेत या प्रक्रियेला गती दिली. उपग्रह इंटरनेटसाठी स्पेक्ट्रमचे वाटप कसे करायचे, हा मोठा कळीचा मुद्दा होता. देशांतर्गत कंपन्या लिलावाच्या बाजूने होत्या, तर जागतिक कंपन्या प्रशासकीय वाटपाची मागणी करत होत्या. अखेर सरकारने सुवर्णमध्य साधत, दूरसंचार विभागामार्फत स्पेक्ट्रमचा लिलाव न करता 'प्रशासकीय वाटप' पद्धतीने स्पेक्ट्रम देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या नव्या धोरणानुसार, पात्र कंपन्यांना ५ वर्षांसाठी स्पेक्ट्रम दिले जाणार असून, त्यासाठी त्यांना त्यांच्या समायोजित ढोबळ उत्पन्नाच्या (एजीआर) ५ टक्के एवढी रक्कम स्पेक्ट्रम शुल्क म्हणून सरकारला द्यावी लागेल. या निर्णयामुळे उपग्रह इंटरनेट क्षेत्रात पारदर्शकता आली असून, कंपन्यांना आपला पुढील व्यावसायिक आराखडा निश्चित करणे सोपे झाले आहे. एकीकडे जागतिक कंपन्या नियम शिथिल करण्यासाठी दबाव आणत असताना, भारतातील आघाडीच्या कंपन्यांनी मात्र सर्व नियमांची पूर्तता करत मोठी आघाडी घेतली आहे. 'रिलायन्स जिओ'ने (जिओ सेसफायबर) लक्झेंबर्ग येथील 'एसईएस' या नामांकित सॅटेलाईट कंपनीसोबत धोरणात्मक भागीदारी केली आहे. 'जिओ'ला भारतीय अंतराळ नियामक 'इन-स्पेस' कडून आवश्यक त्या सर्व मंजुऱ्या मिळाल्या आहेत आणि त्यांनी देशातील अनेक दुर्गम भागात या सेवेच्या यशस्वी चाचण्याही पूर्ण केल्या आहेत. दुसरीकडे, 'भारती एअरटेल' समूहाचे पाठबळ असलेल्या 'वनवेब' (युटेलसॅट वनवेब) या कंपनीनेही जोरदार तयारी केली आहे. 'वनवेब'ने आपले उपग्रह नेटवर्क आणि जमिनीवरील आवश्यक पायाभूत सुविधा गुजरात आणि तमिळनाडू या राज्यांमध्ये पूर्णपणे उभारून तयार ठेवल्या आहेत. 'एलईओ' (लो अर्थ ऑर्बिट) तंत्रज्ञानावर आधारित या कंपन्यांचे प्रकल्प आता केवळ सरकारच्या अंतिम सुरक्षा मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत.

उपग्रह इंटरनेट तंत्रज्ञान हे भारताच्या ग्रामीण आणि अतिदुर्गम भागांचा चेहरामोहरा बदलण्याची ताकद ठेवते. शिक्षण, आरोग्य, आणि कृषी यांसारख्या क्षेत्रांमध्ये डिजिटल क्रांती घडवून आणण्यासाठी ही सेवा मैलाचा दगड ठरणार आहे. मात्र, तंत्रज्ञानाचा हा वेग देशाच्या सुरक्षेला आणि सार्वभौमत्वाला बाधा आणणारा असू नये, याची पुरेपूर काळजी घेणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२६ मधील धोरणात्मक स्पष्टतेमुळे आता या क्षेत्रातील अनिश्चितता संपली आहे. सुरक्षा नियमांचे कठोर पालन, पारदर्शक स्पेक्ट्रम वाटप आणि सर्वांसाठी समान संधी या त्रिसूत्रीवर आधारित भारताचे हे मॉडेल भविष्यात एक आदर्श ठरू शकते. लवकरच अंतिम सुरक्षा परवानग्यांची प्रक्रिया पूर्ण होईल आणि त्यानंतर भारतातील सर्वसामान्यांना अंतराळातून येणाऱ्या अतिजलद आणि सुरक्षित इंटरनेटचा थेट अनुभव घेता येईल.

भारत सरकारचा उद्देश परदेशी कंपन्यांना रोखणे हा नसून, 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी' (धोरणात्मक स्वायत्तता) आणि राष्ट्रीय सुरक्षा राखणे हा आहे. जोपर्यंत स्टारलिंक भारताच्या सर्व सुरक्षा अटींचे पूर्णपणे पालन करत नाही, तोपर्यंत मस्क यांना व्यावसायिक सेवेची परवानगी मिळणे कठीण आहे. एकदा का या नियमांचा तिढा सुटला, की भारताील इंटरनेट क्षेत्रात एक नवी क्रांती पाहायला मिळेल.

- ९५६१५९४३०६

प्रचंड इच्छाशक्तीचा प्रवास म्हणजे नर्मदा परिक्रमा

रवींद्र गोविंद पांडे नागपूर

असे म्हणतात की, माणसाची इच्छाशक्ती प्रबळ असली की तो कोणतेही धाडस करु शकतो. अगदी शारिरीक वेदनांवरही मात करून आपले ध्येय पूर्ण करू शकतो. अशीच एक सुरम्य कथा आहे नागपूरमधील एका ध्येयवेड्या साधकाची, संजय कठाळेंची.

संजय कठाळे बँकेचे व्यवस्थापक पदावरून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी. मुळात धाडसी स्वभाव असलेल्या संजय यांना ४० वर्षांपूर्वी वयाच्या २५ व्या वर्षी केलेला नागपूर ते नेपाळ या सायकल प्रवासाचा अनुभव पाठीशी होता. संजय यांना आपली कुलस्वामिनी जाकादेवीचे मूळ स्थान नर्मदा ऋतिराव आहे एवढीच माहिती होती. एवढ्याशा अल्प माहितीच्या आधारे कुलदेवतेच्या मूळ स्थानाचा अमरकंटक ते मिठीतलाई अशी २२०० किलोमीटर लांब वाहणाऱ्या नर्मदा तिरावर शोध घ्यावा या ध्यासाने ग्रासले.

खरं तर अवघ्या दोन वर्षांपूर्वी ह्रदयाची अवघड शस्त्रक्रिया नुकतीच पार पडली होती व डायबेटिसनेही धूमाकुळ घातला होता. उपाशी पोटी ४७० तर जेवण झाल्यावर ६५० एवढी मधुमेहाने पातळी गाठल्यावरही महत्प्रयासाने मृत्यूच्या दारातून हे महाशय सुखरूप परत आले. दिवसभरात ७-८ गोळ्या घ्याव्या लागत असे. परमेश्वराने या दिव्यातून सुखरुपपणे बाहेर काढले याची जाण ठेवून कुलदेवतेचा शोध घेण्यासाठी कोविडच्या काळात नर्मदा मैय्याची परिक्रमा करण्याचा वयाच्या साठाव्या वर्षी यांनी संकल्प केला.

२०२० साली देशात कोविडने थैमान घातलेले, कोविडचा पहिला लॉकडाऊन नुकताच संपलेला अशातच निश्चय झाला परिक्रमेला जाण्याचा. प्रबळ इच्छाशक्ती असली की मार्ग सापडतो. कुलस्वामिनीच्या कृपेने रक्ताचा चाचण्या आणि इतर वैद्यकीय तपासण्या नॉर्मल आल्या. डॉ. पी. के. देशपांडे यांनी सहर्षपणे परवानगी दिली व घरच्या मंडळीचा होकार मिळताच नर्मदा मातेच्या परिक्रमेचा मार्ग मोकळा झाला. आवश्यक साहित्याची जुळवाजुळव करून १ डिसेंबर २०२० रोजी ओंकारेश्वर येथील नर्मदा तिरावर संकल्प सोडला "मम कुलदेवता शोध प्रित्यर्थं नर्मदा पद परिक्रमा अहं करिष्ये" परिक्रमेला प्रारंभ झाला. सुरवातीलाच ओंकारेश्वर येथील १२५ पायऱ्या चढतानाच दम भरून आला. काही वेळ विश्रांती घेऊन प्रवास सुरु झाला. उन्हाच्या काहिलीने प्रचंड थकवा येऊ लागला. पुढे एक रोटी आश्रमात पाटीवरचे सामान कमी करताना अनावधानाने एटीएम कार्डही त्यातच राहून गेले.

एक एक टप्पा गाठत नर्मदा काठाने खडतर प्रवास सुरू झाला. संध्याकाळी मुक्कामावर पोहचल्यावर पाय खूप दुखायचे, पायात गोळे भरून येत असे. कटोरा येथील खुशीराम बाबाने पायाला लावायचे तेल दिले. थोडा आराम पडू लागला. साधू संतांच्या भेटी घडू लागल्या. प्रत्येकजण काहीना काही आशीर्वाद देत असे. धैर्य वाढत होते. पण दुस?या बाजूला अडचणी उभ्या ठाकत होत्या. बडवाणी या शहरात पोहोचताच धोधो पावसाला सुरुवात झाली. सतत दोन दिवस पाऊस पडत होता. पुढील टप्पा होता चिंब भिजलेल्या शूलपाणी झाडीतून जाण्याचा. दिवसभर बातम्या येत होत्या बरेच लोक घसरून पडले, हात पाय फ्रॅक्चर झालेत. काही परत आले. अशातच स्थानीक लोकांनी सल्ला दिला की झाडीतून जाऊ नका, घसरुन पडाल, प्रवास थांबेल.

निश्चयाचे बळ आणि ईश्वरी कृपा असली की संकटावर मात करण्याची शक्ती येते. एव्हाना पाऊस थांबला आणि पुढील परिक्रमा पुन्हा सुरु झाली तीही शूलपाणी झाडीतूनच. बोरखेडीचे हिरालाल रावत मामाकडे पहिला मुक्काम झाला. या मामाचे आता परिवर्तन झाले आहे. सेवा देतात सोबत वाटाडे दिलेत. त्यांचे बरोबर कठीणतम प्रवास सुरु झाला. सतत एक एक डोंगर चढायचा आणि उतरायचा. बरेचदा दम भरून यायचा. काही वेळ विश्रांती घ्यावी आणि नर्मदे हर" म्हणत प्रवास सुरू करायचा.

पुढे कुली या गावात कुणीही लुटले नाही उलट मार्ग दाखवण्याचे काम केले.?

जीवावर बेतलेला प्रसंग

कुलीनंतर सातपुडा पर्वत चढताना खूप दमछाक होते. निसरड्या पायवाटेवरून चालताना पाय घसरत होते. वाटाड्या ज्या पायवाटेने नेईल त्याचे मागे मागे चालणे सुरु होते. घोंगसा येथील लखनागिरी बाबांचे आश्रमाकडे जात असताना अचानक पाय घसरला, अक्षरशः ३०-४० फूट खाली घरसत गेले. समोर वाटाड्या चालत होता. आवाज आला म्हणून त्याने मागे वळून पाहिले. संजय घसरत दरीकडे चालले होते. त्याने क्षणाचाही विलंब न लावता त्यांना अडवले. भानावर आले तेव्हा मागे वळून पाहिले असता खाली खोल दरी नर्मदेच्या पाण्याने तुडुंब भरलेली. वाटाड्याने वाचवले नसते तर जलसमाधीच मिळाली असती. नर्मदा मातेनेच पुढील प्रवास करण्यासाठी जीवदान दिले होते. शूलपाणीत झाडीत कधी खिचडी तर कधी मक्याची भाकरी व भाजी जेवण मिळायचे. कधी कधी स्वतःच्या हाताने जेवण तयार करावे लागायचे.

खाण्यापिण्यावर फार लक्ष नसायचे, जे मिळेल ने नर्मदे हर म्हणत ग्रहण करायचे. मनात एकच ध्यास माझी कुलदेवता नर्मदा काठी कुठे सापडेल. अनेक आश्रमातील संत मार्गदर्शन करीत असे. भालोदचे प्रतापे महाराज म्हणाले "घाबरू नकोस, घराबाहेर पडला आहेस, एकच ध्यास मनी ठेव. केव्हा ना केव्हा तुझे इच्छित स्थळ सापडेल".

समुद्रप्रवास करून उत्तरतीरावर शोधू सुरु झाला. भडोच, शुक्लेश्वर, सिनौर, कंजेटा, अनसूया,नानी अंबाजी असे मार्गक्रमण करीत तिलकवाड्यात पोहोचले. विष्णुगिरी महाराजांशी चर्चा करताना त्यांना म्हणाले "महाराज शोध तर खूप घेतोय, पण मूळ स्थान सापडत नाही". महाराज म्हणाले, "तुझी धडपड मला कळतेय, पण हा मार्ग सोपा नाही, तुला काठोर परिश्रम घ्यावे लागतील, काही नाही मिळवले तर पुन्हा ये, सोडू नकोस. नर्मदा मैया तुला यश देईल". कुलस्वामिनी दर्शनासाठी वेडे झालेले संजय जेव्हा एक एक अनुभव सांगतात, तेव्हा अंगावर रोमांच उभे राहतात. अनुभव ऐकावे ते त्यांच्या तोंडूनच. नर्मदा परिक्रमा मार्गावरील गावे त्यांना तोंडपाठ आहेत. कोणत्या गावात कोणता आहे वा कोणते महात्मा संत राहतात यांची त्यांना खडानखडा माहिती आहे. नर्मदा क्षेत्रातले चालते बोलते विद्यापीठ म्हटल्यास वावगे ठरु नये.

२५०० किमी प्रवास करुन अमरकंटकला आले. येथपर्यंत कुणी ना कुणी परिक्रमा वासी सोबत असायचे. पुढे दक्षिण तीरावरील प्रवास एकट्यानेच सुरु केला. परतीच्या प्रवासात राई घाटातील दाट जंगलात मुक्काम करावा लागला. बंजारी माता आश्रमात एकटेच गाईच्या गोठ्यात राहावे लागेल. मध्यरात्री कोल्हाने हल्ला केला तेव्हा नर्मदा मातेने गोमातेच्या रुपात येऊन वाचविले. त्यानंतरही संजय यांनी धैर्य न सोडता आपली संकल्पित परिक्रमा पूर्ण केली.

नर्मदा परिक्रमेच्या अनुभवातून त्यांना पुस्तक लिहिण्याची प्रेरणा नर्मदा मातेने दिली. त्यांचे 'अगं नर्मदे' हे पुस्तक प्रकाशित झाले. पुस्तकाला वाचकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. ह्या पुस्तकाला देशभरातील नर्मदा भक्तांकडून मागणी होते आहे. एवढेच नव्हे तर संजय कठाळे लिखित अगं नर्मदे या पुस्तकाला ३ राज्यस्तरीय पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. लोकमान्यते बरोबर राजमान्यताही मिळाली आहे हे विशेष.

सध्या ते नवीन परिक्रमा करणाऱ्या लोकांना मार्गदर्शन करतात. नर्मदा परिक्रमेचा प्रचार प्रसार करण्यासाठी व्याख्याने देऊन परिक्रमेची संपुर्ण माहिती देत असतात. या कायासोबतच कठाळे परिवाराला संघटीत करण्याचे कार्य गत २५ वर्षापासून करत असून कुलस्वामिनीच्या मुळ स्थानाचा शोध हेच त्यांचे जीवनकार्य असल्याचे त्यांनी सांगितले. अशा या ध्येयवेड्या साधकाला नर्मदा मैय्याच्या कृपाप्रसादाने कुलस्वामिनीचे दर्शन घडो व त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होवोत अशा शुभेच्छा देतो.

नर्मदे हर !

- ९३२५४५७०५२

दसरा सण विचारांच्या सीमोल्लंघनाचा!

दसरा म्हणजेच विजयादशमी. हा हिंदू धर्मातील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे. हा सण अश्विन शुद्ध दशमीला साजरा केला जातो. वाईट शक्तीवर चांगल्या शक्तीच्या विजयाचे प्रतीक म्हणून हा सण आपण साजरा करतो. दसरा साजरा करण्यामागे काही कारणे आणि कथा आहेत. देवी दुर्गेने नऊ रात्री युद्ध करून दहाव्या दिवशी म्हणजेच विजयादशमीला महिषासुर राक्षसाचा वध केला. दक्षिण आणि पूर्व भारतात हा दिवस 'दुर्गापूजा' समाप्ती म्हणून साजरा होतो. तर उत्तर, पश्चिम आणि मध्य भारतात प्रभू श्रीरामाने याच दिवशी रावणाचा वध केला होता. म्हणून रावण दहन केले जाते. महाभारतात पांडवांनी आपल्या अज्ञातवासा दरम्यान शमीच्या झाडावर आपली शस्त्रे लपवून ठेवली होती आणि दसऱ्याच्या दिवशी ती परत घेतली होती.

दसऱ्याच्या दिवशी लोकं एकमेकांना शमी किंवा आपट्याची पाने देऊन सोन्यासारख्या शुभेच्छा देतात. विचारांच, शुभेच्छांच सोन या दिवशी लुटलं जातं. या दिवशी घरातील शस्त्रे, अवजारे, वाहने आणि पुस्तकांची (सरस्वती पूजन) पूजा केली जाते. हा नवीन पीक घरात येण्याचा आनंद साजरा करण्याचा जसा काळ असतो तद्वतच दिवाळीची पूर्वतयारी करण्याचाही काळ असतो. कारण दसऱ्यानंतर साधारण वीस दिवसांनी दिवाळी सण येतो. दसऱ्याच पौराणिक काळातल महत्त्व लक्षात घेऊन तो साजरा झाला पाहिजे असं मला वाटतं. आजच्या परिस्थितीवर नजर टाकली तर दसऱ्याचे महत्त्व जास्तच जाणवतं. सासारसार विचार करण्याची माणसाची क्षमता नष्ट होते की काय अशी भीती वाटू लागली आहे. समाजाची वैचारिक पातळी खालावली आहे. 'मी आणि माज्यापुरता' हा विचार मूळ धरू लागला आहे. स्वार्थीपणा वाढीस लागतो आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने कब्जा करावला सुरुवात केली आहे. सोशल मीडियामध्ये रमलेल्या तरुणाईला आभासी जग आणि वास्तव जग यामधला फरक कळेनासा झाला आहे. मोबाईलमुळे घराघरातला संवाद हरवला आहे. नाती बदलत आहेत. नात्यांमधली आपुलकी हरवत चालली आहे. मानसिक व्याधी बळावल्या आहेत. एखादी घटना घडल्यानंतर माणूसकीच्या प्रत्यक्ष मदत करण्याऐवजी ती घटना मोबाईल मध्ये कैद करण्यासाठी चालू असलेली लोकांची अहमहमिका म्हणजेच हरवत चाललेल्या माणूसकीचे आणि संवेदनशीलतेचे उत्तम उदाहरण आहे.

प्रत्येक क्षेत्रात वाढत असलेली स्पर्धा, जीवनाचा वेग वाढवण्यासही कारणीभूत ठरत आहे. मोबाईलमुळे वर्तणूकातली आक्रमकता वाढत आहे. तडजोड करण्याच्या वृत्तीला फाटा देऊन 'हम करे सो कायदा' अशी वृत्ती अंगी बाणवण्यात आम्ही धन्यता मानतो आहोत. मुलांवर पूर्वीच्या काळी होत असलेले सदगुणांचे, सदविचारांचे, सद्वर्तनाचे संस्कार काळाच्या ओघात नष्ट होत आहेत. मुलींसाठी शहर सुरक्षित राहिलेली नाहीत. शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींमुळे विद्यार्थी आत्महत्या करत आहेत. विचारपूर्वक वागणे, विचारपूर्वक बोलणे समाजातून, कुटुंबातून नाहीसे होत आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर 'दसरा' आपल्याला आत्मपरीक्षणाची एक उत्तम संधी देणार आहे. त्याचा लाभ घेऊया. खऱ्या अर्थाने विचारांच्या सीमोल्लंघनाची कुटुंबाला, समाजाला गरज आहे.

- सौ. आसावरी अभिजीत ऐनापुरे, मुंबई

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३७,३५० /-
✔ चांदी : २,४८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सत्ताधारी विरोधकांच्या रडारवर !

महाराष्ट्रात 'गँगस्टर' राज, राज्यात राष्ट्रपती राजवट लावा

मुंबई : मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संजय राऊत यांनी राज्यातील वाढत्या गुन्हेगारीवरून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर थेट शरसंधान साधले. तसेच महाराष्ट्रात गँगस्टर राज सुरू असून सत्ताधाऱ्यांचा रेझिम चेंज केल्याशिवाय जनता शांत बसणार नाही, असा इशाराही संजय राऊत यांनी यावेळी दिला. ठाण्यातील गुन्हेगारीवरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर प्रहार करताना संजय राऊत म्हणाले, काल टायगर श्रॉफच्या गाडीवर गोळीबार झाल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तातडीने अभिनेत्याच्या घरी पोहोचले. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहिले तर केवळ रडायचेच बाकी होते. बॉलिवूड, हॉलिवूड आणि उद्योगपतींवर गोळ्या चालल्या की यांना प्रचंड काळजी वाटते, त्यांना झेड प्लस सुरक्षा देण्याचा चर्चा सुरू होतात.



पुर्णेकरांच्या हत्येकडे दुर्लक्ष

दुसऱ्या बाजूला स्वतः एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील घरासमोर राजकीय कार्यकर्ते प्रदीप पुर्णेकर यांची गोळ्या झाडून हत्या झाली. मात्र, ठाण्याचे पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री असूनही शिंदे पुर्णेकर यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करायला गेले नाहीत. या प्रकरणातील आरोपी सत्ताधारी गटाच्या स्थानिक नेत्यांसोबत उघडपणे दिसत आहेत. आरोपींना वाचवण्याचे काम गृहखाते करत असल्यामुळेच मुख्य आरोपींना अद्याप अटक झालेली नाही.

गृहमंत्री फडणवीस विरोधकांना अडकवण्यात व्यस्त

राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यशैलीवर ताशेरे ओढताना ते म्हणाले, महाराष्ट्राला एक पूर्णवेळ आणि सक्षम गृहमंत्री हवा आहे, अशी मागणी आम्ही सातत्याने करतोय. मात्र, गृहखात्याचा वापर गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी न होता केवळ राजकीय विरोधकांना खोट्या गुन्ह्यांत अडकवण्यासाठी आणि तुरुंगात डांबण्यासाठी केला जात आहे. त्यामुळेच माफिया टोळ्यांना कायद्याची किंवा पोलिसांची कोणतीही भीती उरलेली नाही.

राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री द्या! हर्षवर्धन सपकाळ

अकोला : अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवरील हल्ल्याच्या घटनेनंतर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली. राज्याचा गृहमंत्री 'पांडू हवालदार' झाला आहे, अशी बोचरी टिप्पणी करत त्यांनी महाराष्ट्राला पूर्णवेळ गृहमंत्री देण्याची मागणी केली.



अकोला येथे बोलताना सपकाळ यांनी राज्यातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्यात अंतर्गत गँगवॉर सुरू असल्याचा आरोप करत सरकारला कायदा आणि सुव्यवस्थेचे गांभीर्य नसल्याचे ते म्हणाले. राज्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करत सपकाळ यांनी सरकारच्या कारभारावर टीका केली. टायगर श्रॉफच्या गाडीवरील हल्ल्याच्या घटनेमुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून, अशा घटनांमुळे कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सरकारने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी सपकाळ यांनी केली. महाराष्ट्राला पूर्णवेळ गृहमंत्री मिळावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, सपकाळ यांच्या आरोपांवर राज्य सरकारकडून काय प्रतिक्रिया दिली जाते, तसेच टायगर श्रॉफच्या गाडीवरील हल्ल्याच्या प्रकरणात पुढे काय कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्रात गुंडशाही सरकारपोषित तर नाही ना?

मुंबई : बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ याच्या गाडीवर जुहू येथे झालेल्या प्राणघातक गोळीबाराच्या पार्श्वभूमीवर नाना पटोले यांनी सोशल मीडिया आणि प्रसिद्धीपत्राद्वारे राज्य सरकारवर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याची आग्रही मागणी त्यांनी केली. राज्याची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईमध्ये दिवसाढवळ्या गोळीबाराचे सत्र सुरू आहे. राज्यातील वाढत्या गुन्हेगारी घटनांचा पाढा वाचताना नाना पटोले म्हणाले, काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची निर्घृण हत्या करण्यात आली. त्यानंतर ठाण्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पुर्णेकर यांची गोळ्या झाडून हत्या झाली. काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण यांना उघडपणे जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. आता बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर लॉरेन्स बिश्नोई टोळीकडून ७ गोळ्या झाडल्या जातात. यावरून महाराष्ट्रात कायद्याचा कोणताही धाक शिल्लक राहिलेला नाही, हेच सिद्ध होते.



जर उच्चभ्रू जुहू परिसरात, जिथे पोलीस ठाणे हाकेच्या अंतरावर आहे, तिथे अभिनेत्यांवर गोळ्या झाडल्या जात असतील आणि राजकीय नेत्यांचे खून पडत असतील, तर गल्लीबोळात राहणाऱ्या सामान्य नागरिकाच्या जीविताचे रक्षण कोण करणार ? हा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्राला पडला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यशैलीवर थेट निशाणा साधताना पटोले म्हणाले, राज्यात सत्ताधारी पक्ष केवळ कमिशन लाटण्यात आणि विरोधकांना नामोहरम करण्यासाठी यंत्रणांचा वापर करण्यात व्यस्त आहेत. गुन्हेगार, खंडणीखोर आणि टोळ्या मोकाट सुटल्या आहेत. गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस पूर्णपणे अपयशी ठरले असून त्यांच्या निष्क्रियतेमुळे मुंबईची अवस्था गुन्हेगारांचे कुरण अशी झाली आहे.

टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणात मोठी कारवाई; सुरत एक्सप्रेसमधून ३ आरोपींना घेतले ताब्यात

वृत्तसंस्था, मुंबई

बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या कारवर झालेल्या गोळीबार प्रकरणात एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राजस्थानमधील कोटा पोलिसांनी या प्रकरणातील ३ संशयिताला ताब्यात घेतले आहे. टायगर श्राफ याच्यावर गोळीबार केल्यानंतर आरोपींनी दुचाकीवरून पळ काढला होता. अंधेरीत दुचाकी टाकून आरोपींनी रेल्वेने पळ काढला होता. आता आरोपींना सूरत एक्सप्रेसमधून ताब्यात घेण्यात आले आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, कोटा रेल्वे स्थानकावरून या संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र, या प्रकरणाची कोटा पोलिसांकडून अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. तसेच, सुरक्षेचा मुद्दा आणि तपासाच्या गोपनीयतेमुळे ताब्यात घेतलेल्या संशयिताची ओळख अद्याप उघड करण्यात आलेली नाही. या प्रकरणासंदर्भात कोटा पोलिसांकडून लवकरच अधिकृत माहिती दिली जाण्याची शक्यता आहे.

तपास आता मुंबई क्राईम ब्रँचकडे

बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या कारवर झालेल्या गोळीबार प्रकरणाचा तपास आता मुंबई क्राईम ब्रँचकडे वर्ग करण्यात आला आहे. सुरुवातीला या प्रकरणी जुहू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, घटनेची संवेदनशीलता पाहता तपास क्राईम ब्रँचकडे सोपवण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. गोळीबार करणाऱ्या तीन अज्ञात आरोपींचा शोध घेणे हे सध्या पोलिसांसमोर सर्वात मोठे आव्हान ठरले आहे. यातील ३ संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

आमदार जितेंद्र आव्हाडांना जीवे मारण्याची धमकी

वृत्तसंस्था, मुंबई

मुंबईत अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराची घटना ताजी असतानाच, आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना जीवे मारण्याची धमकी आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे सिनेसृष्टीत खळबळ उडाली असून भीतीचे वातावरण पसरले आहे. ही घटना ताजी असतानाच, आता आमदार जितेंद्र आव्हाड यांनाही जीवे मारण्याची धमकी आल्याने खळबळ माजली आहे. यासंदर्भात आव्हाड यांनी एक मोबाईल नंबर शेअर करत आपल्या ट्विटमध्ये लिहिले आहे की, एका इसमानी दोन ते तीन वेळा मला फोन केला, भ्रमणध्वनीवर अर्वाच्च भाषेत बोलून मारण्याची धमकी दिली. या धक्कादायक प्रकारानंतर आव्हाड यांचे कार्यकर्ते हेमंत वाणी यांनी संबंधित मोबाईल नंबरवर कॉल केला असता, त्या व्यक्तीने त्यांनाही जीवे मारण्याची धमकी दिली. आधी जिव्हाला गोळ्या घालेन, नंतर तुला पण गोळ्या घालेन, घरच्या बाहेर येऊन गेलो, असे त्या व्यक्तीने वाणी यांना सांगितले. या अत्यंत गंभीर प्रकारानंतर हेमंत वाणी यांनी तात्काळ पोलिसांत धाव घेत याप्रकरणी रीतसर तक्रार दाखल केली आहे.

जळगावात भीषण अपघात,३ ठार

जळगाव : जळगाव शहराजवळील गिरणा नदीवरील बांभोरी पुलावर रविवारी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास कार आणि कंटेनरचा अत्यंत भीषण अपघात झाला. या अपघातात तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. हे तिघेही धरणगाव तालुक्यातील झुरखेडे येथील रहिवासी असून, एकमेकांचे नातेवाईक होते. या अपघातानंतर झुरखेडे गावावर शोककळा पसरली.



भुसावळजवळील वनोली येथे सध्या देवीची यात्रा सुरू आहे. या यात्रेसाठी आलेल्या एका नातेवाईकाला सोडण्यासाठी पंकज चौधरी, हरीश चौधरी आणि रवींद्र चौधरी हे तिघे कारने गेले होते. तेथे नातेवाईकाला सोडल्यानंतर ते जळगावकडे आले आणि तेथून आपल्या झुरखेडे या गावी परत जाण्यासाठी निघाले होते. सर्वजण नातेवाईकांना सोडून कारने गावी परत येत होते. त्यावेळी बांभोरी पुलावरून त्यांच्या कारची आणि समोरून येणाऱ्या कंटेनरची जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, कारमधील तिन्ही तरुणांचा जागीच दुर्दैवी अंत झाला. या दुर्घटनेमुळे झुरखेडे गावावर आणि परिसरात शोककळा पसरली आहे. पोलिस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

कोणालाही सोडले जाणार नाही; एकनाथ शिंदेंनी टायगर श्रॉफची भेट घेत दिली ग्वाही

वृत्तसंस्था, मुंबई

बॉलिवूड अभिनेते जॅकी श्रॉफ यांचा मुलगा अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर जुहू परिसरात गोळीबार करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. अचानक झालेल्या हल्ल्यात अभिनेता टायगर श्रॉफ, त्याचा चालक आणि एक रिक्षाचालक जखमी झाले आहे. या गोळीबारानंतर टायगर श्रॉफ थोडक्यात बचावला असून तो आता सुखरूप आहे. या घटनेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टायगरच्या घरी जाऊन त्याची भेट घेतली आणि विचारपूस केली. या भेटीदरम्यानचे फोटो समोर आले असून, यात टायगर श्रॉफच्या हातावर पट्टी बांधलेली दिसत होती, तसेच त्याच्या खांद्यावर आणि छातीवरही मलमपट्टी केलेली पाहायला मिळते. भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, ही एक गंभीर घटना आहे. पाच राऊंड गोळीबार झाला, पण सुदैवाने तो सुरक्षित आहे. त्याचा ड्रायव्हर जखमी झाला असून, ही घटना निषेधार्ह आहे.



मी अभिनेत्याची भेट घेतली. दारूगोळा आणि काचेच्या तुकड्यांमुळे त्याच्या डाव्या हाताला जखमा झाल्या आहेत. या घटनेमुळे अभिनेता आणि त्याचे कुटुंब खूप चिंतेत आहे. मी त्यांना खात्री दिलीय की राज्य सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. आम्ही या गुंडगिरीचा पूर्णपणे नायनाट करू. यापुढे कोणत्याही प्रकारची धमकी खपवून घेतली जाणार नाही. जबाबदार लोकांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले आहे.

झेंडूच्या फुलांना कवडीमोल दराने शेतकरी हवालदिल

वृत्तसंस्था, मुंबई

दुष्काळाच्या संकटामुळे शेतकरी हवालदिल झालेला आहे. दुसरीकडे दसरा सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत झेंडूच्या फुलांना अपेक्षित दर मिळेल या आशेने अनेक शेतकऱ्यांनी झेंडू लागवड केली होती. उद्या दसरा अर्थात विजया दशमीसाठी मोठ्या प्रमाणावर झेंडूची मागणी असते. या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात झेंडूच्या फुलांची आवक झाल्याने ३० ते ४० रुपये किलो एवढ्या कवडीमोल दराने झेंडूची फुलांची विक्री होत आहे. त्यामुळे झेंडूची फुले विक्री करुन ४ पैसे मिळतील अशी आशा बाळगलेला शेतकरी मात्र हवालदिल झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



विजयादशमीच्या निमित्ताने घराघरांत, मंदिरांमध्ये, वाहन, दुकानांना, कार्यालयांना सजविण्यासाठी झेंडूच्या फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मात्र, सणाच्या तोंडावर बाजारपेठेत झेंडूच्या फुलांना केवळ ३० ते ४० रुपये प्रतिकिलो असा दर मिळत असल्याने विक्रेत्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे. फुले बाजारात आणण्यासाठी होणारा वाहतूक खर्च, तोडणी, लागवड खर्च लक्षात घेता कवडीमोल दर मिळत असल्याने झेंडूची फुले विक्रेत्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील शेतकरी विविध नैसर्गिक संकटांचा सामना करत आहेत. दुष्काळामुळे खरीप हंगामातील पिके हातची गेली आहेत. या परिस्थितीत झेंडूच्या फुलांना दर मिळाल्यास आर्थिक कोंडी थोडीफार सुटेल अशी शेतकऱ्यांना आशा होती. परंतु बाजारपेठेत अतीशय कमी दरामुळे झेंडू उत्पादक शेतकरी आणि विक्रेते दोघांनाही आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे झेंडू विक्रेत्यांच्या चेहऱ्यावरील समाधान हरवल्याचे दिसून येत आहे.

विजयादशमी सणाला देखील झेंडू फुलांना योग्य दर मिळत नसल्याने विक्रेते चिंताग्रस्त झाले आहेत. दसऱ्याचा उत्साह बाजारपेठेत दिसत असला, तरी झेंडूच्या फुलांच्या पडलेल्या दरामुळे झेंडू उत्पादक शेतकरी आणि विक्रेत्यांचे मात्र आर्थिक गणीतच कोलमडल्याचे दिसत आहे.

पतीने पत्नीवर शस्त्राने केले सपासप वार

अकोला : कौटुंबिक वाद विकोपाला गेल्याने संतप्त पतीने पत्नीवर शस्त्राने सपासप वार केले. त्यामध्ये गंभीर जखमी झालेल्या पत्नीचा मृत्यू झाल्याची घटना वाशीम जिल्ह्याच्या रिसोड शहरातील हिंगोली मार्गावरील छत्रपती संभाजी नगर परिसरात रविवारी घडली. कल्पना योगेश ढवळे (३५ वर्षे) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. कुटुंबात नियमित किरकोळ वाद होत असतात. मात्र, वेळीच ते सामंजस्याने सोडवण्याची गरज असते. अन्यथा मोठा अनर्थ घडू शकतो. या प्रकारच्या घटनेचा प्रत्यय वाशीम जिल्ह्यात आज आला. पती-पत्नीमध्ये कौटुंबिक कारणावरून वाद झाला.

हा वाद विकोपाला जाऊन पती योगेश ढवळे याने पत्नी कल्पना यांच्यावर धारदार शस्त्राने वार केले. हा प्रकार त्यांच्या मुलाने पाहताच तो ओरडला. मुलाचा आवाज ऐकून नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या कल्पना यांना तातडीने रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच रिसोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. किरकोळ कारणावरून झालेल्या वादानंतर पतीने पत्नीवर शस्त्राने प्राणघातक हल्ला केला. पत्नी रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहून आरोपी पती घटनास्थळावरून पसार झाला. त्याला पकडण्याचे पोलिसांपुढे आव्हान होते. रिसोड पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. रिसोड पोलिसाच्या पथकाने काही वेळातच आरोपीला ताब्यात घेतले. प्राथमिक तपासानुसार ही घटना कौटुंबिक वादातून घडल्याचे समोर येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास रिसोड पोलीस करीत आहेत. आरोपी हा मूळचा वाशीम येथील काळे फैल भागातील रहिवासी आहे. तो काही वर्षे परभणी येथे वास्तव्यास होता. एका खासगी कंपनीत कार्यरत असलेला योगेश पंधरा दिवसांपूर्वीच रिसोड येथे भाड्याच्या घरात कुटुंबासह राहण्यास आला होता.

थोडक्यात

"खुशाल जागा हो" काव्य संग्रहाचे लोकार्पण संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर :-(धनंजय पांढरे)

राष्ट्रिपता जोतिराव फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर व मूलनिवासी नायक-नाईकांच्या विचारांचे समाज प्रबोधन पर गीत संग्रह "खुशाल जागा हो" लोककवी व गायक मूळ निवासी .के.जी. साव यांचा लोकार्पण सोहळा दि. १६ तारखेला ला दिक्षाभुमी बुक स्टॉल, चंद्रपूर येथे सायं. ७ वा.संपन्न झाला. प्रकाशक जी.के.उपरे,अध्यक्ष, बौद्ध धम्म प्रसार व साहित्य प्रकाशन संस्था बल्लारपूर व माजी मानद सचिव सि.डी.सी.सी.बैंक,चंद्रपूर होते.उदघाटक एच.सी.सहारे व मुख्य अतिथी तेलंगानाचे लोककवी व लेखक मधु बावलकर, आदिलाबाद तर अथिती संविधान प्रबोधक गायक नभा वाघमारे,कवी व गायक के.जी.साव, गायक रमेश रामटेके,बल्लारपूर,आनंद मेश्राम, नागपूर, संदीप वाघमारे, देवानंद रायपुरे,राहुल मडामे, नागपूर,सेवकदास बरके, महेंद्र खंडाळे उपस्थित होते.

काव्य संग्रहाचे लोकार्पण एच.सी.सहारे व मंचावरील अतिथीगणांनी केले. प्रास्ताविक संस्थेचे सचिव एम.टी.साव सर यांनी केले. त्यांनी संस्थेची वाटचाल विषद करून आतापर्यंत एकुण आठ पुस्तकांचे लोकार्पण केल्याचे सांगितले. "खुशाल जागा हो" हे नववे पुस्तक आज प्रकाशित होत असल्याचा आनंद व्यक्त केला.यात दोन पुस्तकांचे हिंदीत अनुवाद झालेत.या गीत-संग्रहासाठी विषेश प्रयत्न प्रा.डॉ.मृदुला रायपुरे-जांगडेकर यांनी टायटल सह दर्शनी पृष्ठ व प्रस्तावना देवुन अविस्मरणीय कार्य केले.त्यांचे आणि आर्थिक मदत व स्टेज दिल्याबद्दल वरिल सर्वांचे आभार व्यक्त केले. संचलन पंकज जांगडेकर यांनी तर आभार मिलिंद खोब्रागडे यांनी मानले.

एकच साहेब बाबासाहेब फाउंडेशनचे अधिकृत उमेदवार उत्तमप्रकाश शंकरराव शहारे अपक्ष निवडणुकीच्या रिंगणात!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या २०२६ च्या निवडणुकीत उत्तमप्रकाश शंकरराव शहारे हे अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत आहेत. एकच साहेब बाबासाहेब फाउंडेशनचे अधिकृत उमेदवार म्हणून त्यांना पाटिंबा देण्यात येत असून, पदवीधर मतदारांनी त्यांच्या उमेदवारीला समर्थन देऊन त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आपल्या मताच्या माध्यमातून योग्य प्रतिनिधी निवडण्याची संधी पदवीधरांना मिळत असते.



या पार्श्वभूमीवर उत्तमप्रकाश शंकरराव शहारे यांच्या उमेदवारीला पाठिंबा देत त्यांच्या नावासमोर पसंतीक्रमांक १ नोंदवून त्यांना विजयी करण्यासाठी सहकार्य करावे, या निवडणुकीसाठी मतदान २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत होणार आहे. त्यामुळे पात्र पदवीधर मतदारांनी मतदानाच्या वेळेची नोंद घेऊन निर्धारित वेळेत मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन करण्यात येत आहे. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत उत्तमप्रकाश शंकरराव शहारे यांना पसंतीक्रमांक १ देऊन त्यांना भरघोस मतांनी विजयी करावे आणि त्यांच्या उमेदवारीला बळ द्यावे, असे आवाहन एकच साहेब बाबासाहेब फाउंडेशनच्या वतीने करण्यात येत आहे.

बुद्ध नगरीतील ५६ फुटांच्या महाबोधी महाविहाराची प्रतिकृती नागपूरकरांचे आकर्षण

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

तथागत गौतम बुद्धांचा शांती, करुणा, मैत्री आणि समतेचा संदेश तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परिवर्तनवादी विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने नागपूर बुद्धिस्ट कॉन्सोर्टियम च्यावतीने बुद्ध पार्क, बुद्ध नगर, आसी नगर झोन येथे साकारण्यात आलेली ५६ फूट उंच महाबोधी महाविहाराची भव्य प्रतिकृती नागपूरकरांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. सुमारे १२ हजार चौरस फुटांच्या डोममध्ये उभारण्यात आलेला हा देखावा २२ ऑक्टोबरपर्यंत नागरिकांसाठी खुला आहे. बोधगया येथील ऐतिहासिक महाबोधी महाविहाराची आठवण करून देणारी ही प्रतिकृती, डोंगेश्वरी पर्वताचा देखावा आणि तथागत बुद्धांच्या मूर्ती नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर साकारलेल्या या उपक्रमातून बौद्ध धम्माचा गौरवशाली इतिहास, भारतीय संस्कृती आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रवास अनुभवण्याची संधी मिळत आहे. विशेषतः विद्यार्थी, लहान मुले आणि तरुणांना इतिहासाची प्रत्यक्ष ओळख व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी बुद्ध पार्क परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली. प्रबोधनकार विकास राजा आणि सुभाष कोठारे यांनी उपस्थितांना बौद्ध धम्माचा इतिहास, सम्राट अशोकापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंतचा परिवर्तनाचा प्रवास, नालंदा विद्यापीठाचा ऐतिहासिक वारसा आणि शिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. बुद्धविचार, समता, बंधुता आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची प्रगती साधण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.



या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही शासकीय आर्थिक मदतीशिवाय तरुणांनी सुमारे तीन महिन्यांच्या अथक परिश्रमातून ही भव्य प्रतिकृती साकारली आहे. अश्विन गणवीर, मिथिलेश गाणार, राकेश धारगावे, छोटू भाऊ खांडेकर, अमित वाढे, देवाभाऊ उमरे आणि अश्विनी गजभिये यांनी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या प्रयत्नांना नागपूर बुद्धिस्ट कॉन्सोर्टियमच्या संपूर्ण टीमची साथ लाभली. बौद्ध धम्माचा इतिहास, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि सामाजिक समतेची मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पदवीधर मतदार संमेलनात बावनकुळेंची नाराजी उघड!



नेहमीचेच कार्यकर्ते दिसतात, पदवीधर मतदार कुठे आहेत?

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

पदवीधर मतदारांशी थेट संवाद साधण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या संमेलनात मतदारांची अपेक्षित उपस्थिती नसल्याने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नाराजी व्यक्त केली. नेहमी नेहमी तेच कार्यकर्ते आणि पदाधिकारी दिसतात मग पदवीधर मतदार कुठे आहेत असा सवाल उपस्थित करत त्यांनी स्थानिक प्रचारयंत्रणेचे लक्ष वेधले. यावेळी भाजपमधील गटबाजीचा मुद्दाही चर्चेत आला. खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या मनोरंजन सभागृहात पदवीधर मतदारसंघातील भाजप-महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या प्रचारार्थ पदवीधर मतदार संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाला सावनेर विधानसभा क्षेत्राचे आमदार आशिष देशमुख यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.खापरखेडा येथील डीएव्ही प्राथमिक मतदान केंद्रावर सुमारे ६७० पदवीधर मतदार असल्याची माहिती देण्यात आली. मात्र एवढ्या मतदारसंख्येच्या तुलनेत संमेलनाला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे बावनकुळे यांच्या निदर्शनास आले, त्यामुळे त्यांनी प्रचाराच्या नियोजनाबाबत नाराजी व्यक्त केली.

केवळ पक्षाचे नेहमीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित राहून चालणार नाही, तर प्रत्यक्ष पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक यंत्रणा पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचण्यात कमी पडत असेल, तर स्वतःची टीम लावून मतदारांच्या घरी संपर्क साधण्याचा इशारही बावनकुळे यांनी दिला.

प्रचारात केवळ कार्यक्रमांचे आयोजन किंवा प्रसिद्धीवर भर न देता प्रत्यक्ष जनसंपर्क वाढविणे,मतदारांशी संवाद साधणे आणि त्यांना मतदानासाठी प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक असल्याचा संदेश त्यांनी दिला. आमदार आशिष देशमुख यांनीही संमेलनात मनोगत व्यक्त केले. पदवीधर मतदारांशी थेट संपर्क साधणे, प्रचाराची दिशा प्रभावी ठेवणे आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करणे यावर त्यांनी भर दिला. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याची गरज यावेळी अधोरेखित झाली.

भाजप नेते मनोहर कुंभारे यांनी पक्षातील गटबाजीच्या मुद्द्याकडे लक्ष वेधल्याची माहिती आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे काम करावे,असा सूर यावेळी व्यक्त करण्यात आला. अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून प्रचारात समन्वय राखण्याची गरजही चर्चेत आली. या संमेलनाला शांताराम गावडे, रमेश जैन,पृथ्वीराज बोरकर,रामराव मोहाळे अशोक तांदूळकर प्रकाशे, टेकाळे दिलीप बनसोड, रवी फुलझेले, अरविंद गजभिये, राजेश गायकवाड, प्रमोद पिंपळे, चंद्रशेखर लांडे श्रीराम इको, राहुल बागडे, आशिष लागे, सुरेंद्र शेंडेआणि नितीन गोस्वामी उज्वला लांडे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

नागपूर विभाग पदवीधर निवडणुकीसाठी महायुतीच्या प्रचाराला वेग!

आमदार संजय पुराम यांच्या उपस्थितीत आमगाव येथे निवडणूक नियोजन बैठक संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे- सालेकसा : नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या प्रचाराला वेग आला असून, निवडणुकीच्या नियोजनासाठी आमगाव येथे बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत आमदार संजय हनुमंतराव पुराम सहभागी झाले होते. यावेळी निवडणुकीच्या प्रचाराचे नियोजन, प्रचाराची पुढील दिशा आणि मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार आहे. त्यामुळे निवडणुकीला अवघे काही दिवस शिल्लक असताना महायुतीच्यावतीने प्रचाराची तयारी अधिक गतिमान करण्यात येत आहे. पदवीधर मतदारांशी संपर्क साधणे, निवडणूक प्रचाराचे प्रभावी नियोजन करणे आणि संघटनात्मक पातळीवर समन्वय साधणे, यावर बैठकीत भर देण्यात आला. आमदार संजय हनुमंतराव पुराम यांच्या उपस्थितीमुळे प्रचाराच्या नियोजनाला महत्त्व प्राप्त झाले असून, आगामी निवडणुकीच्या दृष्टीने महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



पीएम श्री जि.प. उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे नवरात्र उत्सवात गरबा-दांडियाची धूम



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दहेगाव येथे सोमवार (ता. १९ ऑक्टोबर) ला नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून विद्यार्थिनींसाठी गरबा व दांडिया नृत्याचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शाळेच्या प्रांगणात रंगीबेरंगी पारंपारिक वेशभूषेत विद्यार्थिनींनी ठेका धरला आणि संपूर्ण परिसर भक्तीमय व उत्साही झाला.

गरबा-दांडियाचे सांस्कृतिक महत्त्व :

गरबा हा फक्त नृत्यप्रकार नसून तो शक्तीची उपासना आहे. गुजरात व महाराष्ट्राच्या सीमेवर हा लोकनृत्य प्रकार देवीच्या आराधनेचे प्रतीक मानला जातो.

१. एकता आणि समन्वय : गोलाकार फिरत केलेल्या गरब्यात सर्वजण एका तालात येतात, यातून एकतेची भावना वाढते.

२. शारीरिक व्यायाम : गरबा हा एक उत्तम एरोबिक व्यायाम आहे, ज्यामुळे शरीर सुदृढ राहते.

३. सांस्कृतिक जपणूक : आजच्या मोबाईल युगात लहान मुलांना आपली संस्कृती विसरू नये म्हणून हा उपक्रम महत्त्वाचा आहे.

शालेय परिसरात याचे महत्त्व :

शाळा म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान नव्हे तर संस्कारांचे केंद्र आहे. अशा कार्यक्रमांमुळे :

विद्यार्थ्यांमधील न्यूनगंड दूर होतो :स्टेजवर नाचल्याने आत्मविश्वास वाढतो.

- मुलींचा सहभाग : मुलींना आपले कलागुण दाखवण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळते. यामुळे शाळेतील मुलींच्या उपस्थितीत वाढ होते.

- आनंददायी शिक्षण : अभ्यासाच्या तणावातून मुक्त होऊन मुले शाळेकडे आकर्षित होतात. हीच खरी पीएम श्री शाळेची संकल्पना आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धानला केंद्राचे केंद्रप्रमुख राजू आंबीलकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी केले तर संचालन शिक्षिका प्रज्ञा रामटेके यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शा.व्य.स. अध्यक्ष नितेश इंगळे उपस्थित होते. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंद सुधीर कांबळे, सुधीर खंडाईत, राजेश रोहाड, उमेश उके, सुजाता बोदेले,ज्योती आंबिलदुके, प्रज्ञा रामटेके, संगीता आंबिलदुके, उमेश उके, पुष्पलता उके, रंजना उके यानी विशेष परिश्रम घेतले.

भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करारात कामगारांचे हक्क आणि सामाजिक सुरक्षेला प्राधान्य देण्याची CFTUIची मागणी

यूके व्यापार शिष्टमंडळाकडून भारतातील प्रमुख कामगार संघटना आणि कामगार नेत्यांना चर्चेसाठी निमंत्रण; राजेश निंबाळकर यांनी डेव्ह पाइक यांना निवेदन सादर केले

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

यूके व्यापार शिष्टमंडळाचा एक भाग म्हणून इंग्लंडमधील ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधींचे एक शिष्टमंडळ भारतात आले. या शिष्टमंडळात इंग्लंडमधील विविध शहरांचे महापौर तसेच ब्रिटिश सरकारचे अधिकारी सहभागी झाले होते. भारतझब्रिटन मुक्त व्यापार करार तसेच व्यापार आणि आर्थिक सहकार्याशी संबंधित विषयांवर चर्चा करण्यासाठी या शिष्टमंडळाने भारतातील प्रमुख कामगार संघटना आणि कामगार नेत्यांना निमंत्रित केले. या उपक्रमाचा एक भाग म्हणून CFTUIचे प्रतिनिधी राजेश निंबाळकर यांनी मुंबईत ब्रिटिश ट्रेड्स युनियन काँग्रेसच्या नॉर्थ ईस्ट, यॉर्कशायर आणि हंबर विभागाचे प्रादेशिक सचिव कॉम्रेड डेव्ह पाइक यांची भेट घेतली. या वेळी ITUC-आशिया पॅसिफिकचे डॉ. सय्यद पाशा देखील उपस्थित होते. राजेश निंबाळकर यांनी कामगारांच्या समस्या आणि मागण्यासंदर्भातील निवेदन सादर केले. भारत-ब्रिटन मुक्त व्यापार कराराच्या अंमलबजावणीत कामगारांचे हक्क, सन्मानजनक रोजगार, न्याय्य वेतन आणि सामाजिक सुरक्षा यांना प्राधान्य देण्याची मागणी या चर्चेत करण्यात आली. असंघटित आणि कंत्राटी कामगारांचे हक्क, रोजगाराची सुरक्षितता, सुरक्षित कार्यस्थळे, कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, लैंगिक समानता आणि सर्वसमावेशक सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यावर CFTUIने विशेष भर दिला.



राजेश निंबाळकर यांनी सांगितले की, आर्थिक विकास आणि व्यापारविस्ताराचे लाभ कामगारांपर्यंतही पोहोचले पाहिजेत. केवळ व्यापार आणि गुंतवणुकीत वाढ होणे पुरेसे नाही; कामगारांची प्रतिष्ठा, जीवनमान आणि सामाजिक संरक्षण सुधारणेही तितकेच आवश्यक आहे. भारत आणि युनायटेड किंगडममधील कामगार संघटनांमधील सहकार्य अधिक दृढ करण्याचे तसेच व्यापार धोरणांशी संबंधित चर्चांमध्ये कामगारांच्या आवाजाला योग्य प्रतिनिधित्व मिळण्याचे आवाहन त्यांनी केले. मुक्त व्यापार कराराचे यश केवळ आर्थिक प्रगतीवर नव्हे, तर कामगारांचे हक्क, सामाजिक न्याय आणि सन्मानजनक रोजगार यांच्या प्रभावी संरक्षणावरही मोजले गेले पाहिजे, हे CFTUIने स्पष्ट केले.

सन्मान महावितरणमधील सौदामिनींचा: प्रकाशाची मशाल घेऊन चाललेल्या महावितरणच्या कर्तृत्ववान लेकींची गौरवगाथा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महावितरण म्हणजे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रगतीची वीज पोहोचवणारी खऱ्या अर्थाने 'जीवनवाहिनी' ठरली आहे. या जीवनवाहिनीला गतिमान ठेवण्याचे आणि अत्यंत खडतर परिस्थितीतही अविरत कर्तव्य बजावण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य महावितरणमधील महिला कर्मचारी अर्थात 'सौदामिनी' करत आहेत. या लेकी केवळ वीज जोडण्याचे काम करत नसून लोकांचे आयुष्य उजळवण्याचे महान कार्य करत आहेत.

नवरात्रीच्या या पवित्र व मंगल पर्वात, या कर्तृत्ववान महिलांच्या अनमोल योगदानाला आणि निष्ठेला सलाम करण्यासाठी महावितरणतर्फे 'सन्मान सौदामिनींचा' या अत्यंत हृदयस्पर्शी कार्यक्रमाचे भव्य आयोजन नागपूर परिमंडलाच्या 'विद्युत भवन' मुख्यालयात करण्यात आले. हा सोहळा केवळ एक औपचारिक पुरस्कार वितरण कार्यक्रम नव्हता, तर एका महावितरण परिवाराने आपल्या सर्वात महत्त्वाच्या आणि कर्तव्यदक्ष सदस्यांप्रति व्यक्त केलेली सख्खोल कृतज्ञता होती.



महावितरणमधील सेवा म्हणजे केवळ कार्यालयातील कागदपत्रे किंवा संगणकावर काम करणे एवढेच मर्यादित नाही. ग्रामीण भागातील विजेच्या खांबांवर चढणे, रात्री-अपरात्री बिघाड दुरुस्त करण्यासाठी घराबाहेर पडणे आणि कडक उन्हात वा तुफान वादळातही वीज सेवा खंडित होऊ न देणे, अशी अत्यंत आव्हानात्मक कामे यात समाविष्ट असतात. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून, किंबहुना अनेकदा त्यांच्याही पुढे जात या महिलांनी आपली क्षमता, चिकाटी आणि ताकद सिद्ध केली आहे.

'सन्मान सौदामिनींचा' या कार्यक्रमात जेव्हा या महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रवासातील संघर्ष आणि अनुभव व्यक्त केले, तेव्हा संपूर्ण सभागृह भारावून गेले. दुर्गम गडचिरोली जिल्ह्यापासून ते नागपूर शहरापर्यंत विविध ठिकाणी सेवा बजावताना आलेल्या संघर्षांना त्यांनी अत्यंत आनंदाने सामोरे जात प्रत्येक कार्यात सकारात्मकता शोधली. पूर्वी कागदावर फुटपट्टीने रेषा आखण्यापासून ते आज आधुनिक संगणकीय प्रणालीवर लीलया काम करण्यापर्यंतचा त्यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी व समाधानकारक राहिला आहे.

हा सन्मान म्हणजे मातृत्वाचा, स्त्रीशक्तीचा आणि त्यांच्या अथक परिश्रमांचा सन्मान आहे, अशी भावना या वेळी महिलांनी व्यक्त केली. प्रपंचासोबत परमार्थ साधत, भक्तीला मनाचा व्यायाम मानून हसत-खेळत सेवा बजावल्यास कामाचा ताण जाणवत नाही आणि भोवतालचे वातावरणही सकारात्मक राहते, हा विचार त्यांनी मांडला. त्यांच्या प्रत्येक शब्दात संघर्षाची जाणीव तर होतीच, पण त्याहून अधिक जिंकण्याचा बुलंद आत्मविश्वास आणि अखंड सेवेची भावना ओसंडून वाहत होती.

या सोहळ्यात नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे, नागपूर ग्रामीण मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे आणि सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते या सर्व सौदामिनींचा गौरव करण्यात आला. ज्ञान आणि बुद्धिमत्तेचे प्रतीक असलेले 'पुस्तक' आणि नाजूक पण तितक्याच कणखर व्यक्तिमत्त्वाला सलाम करणारे 'गुलाबपुष्प' देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

दुर्गम भागात बिलिंगचे काम असो वा उपकेंद्रात तंत्रज्ञ म्हणून बजावलेली सेवा असो, जेव्हा कंपनीकडून असा भावपूर्ण सन्मान मिळतो, तेव्हा या महिलांचा आत्मविश्वास द्विगुणित होतो. "तुमच्या कामाची दखल घेतली गेली आहे आणि तुमचे योगदान अनमोल आहे," हीच भावना या सन्मानाने अधोरेखित केली. ज्याप्रमाणे स्त्रीशिवाय घराला घरपण येत नाही, तसेच महावितरण हेदेखील एक कुटुंब असून येथे कार्यरत महिलांमुळेच संपूर्ण संस्थेत चैतन्याचे आणि सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

'सन्मान सौदामिनींचा' हा उपक्रम महावितरणमध्ये स्त्री-शक्तीला केंद्रस्थानी आणून सामाजिक आणि भावनिक स्तरावर एक नवीन सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा ठरला. महावितरणच्या या सौदामिनी केवळ घरोघरी प्रकाश पोहोचवत नाहीत, तर समाज आणि कुटुंबातही आशा, विश्वास आणि प्रगतीची मशाल घेऊन पुढे जात आहेत, हे या गौरवगाथेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

शब्दवेली
साहित्य विशेष
दैनिक सिंहवाणी वृत्त
५ दिनांक : मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

स्त्री शक्तीचा आदर केवळ नवरात्री पुरताच का?

नवरात्रीचा मूळ गाभा आणि साधेपणा हरवत चालला

सुनील शिरपुरे
यवतमाळ

नवरात्री आणि आपली आजची मानसिकता या विषयाकडे पाहताना असे लक्षात येते की, काळानुसार मानवी स्वभाव, जीवनशैली आणि श्रध्दा ठेवण्याच्या पद्धती बदलल्या आहेत. आजच्या आधुनिक जगात नवरात्रीच्या नऊ दिवसांकडे आणि मानसिकतेकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन समोर येतात. नवरात्री आणि आजची मानसिकता या दोन्ही गोष्टींचा परस्परसंबंध अत्यंत रंजक आणि विचार करायला लावणारा आहे. नवरात्र हा केवळ नऊ दिवस उपवास करण्याचा, गरबा खेळण्याचा किंवा धार्मिक विधींचा सण राहिलेला नाही, तर तो आजच्या मानवी मानसिकतेचे आणि बदलत्या सामाजिक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब बनला आहे.

पूर्वी नवरात्र हा प्रामुख्याने कडक उपवास, व्रतवैकल्ये, पूजा-अर्चा आणि अध्यात्माचा काळ मानला जायचा. आजच्या मानसिकतेत श्रध्दा कायम आहे, पण तिचे स्वरूप अधिक उत्सवप्रिय आणि सामाजिक झाले असून भक्तीपेक्षा देण्याच्या मानसिकतेतूनही पाहतात. दैनंदिन तणावातून काही काळ बाजूला होऊन मन सकारात्मक ऊर्जेने भरण्यासाठी लोक या दिवसांत देवीची उपासना करतात. नऊ दिवस केली जाणारी प्रार्थना किंवा ध्यान लोकांना मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जा देणारे साधन वाटते. आजच्या 'डिजिटल' युगात माणूस स्क्रीनला खिळलेला असतो. नवरात्रीचे नऊ दिवस लोकांना घराबाहेर पडून, मित्रांना भेटण्याची आणि गरब्याच्या निमित्ताने एकत्र येण्याची संधी देतात. त्यामुळे गरबा आणि दांडिया हे केवळ नृत्य राहिले नसून, ते आजच्या पिढीसाठी तणावमुक्त विसरून मुक्तपणे जगण्याचे आणि आनंद साजरा करण्याचे माध्यम बनले आहे. तसेच हा सण आता केवळ घरात पूजेपुरता मर्यादित न राहता, एकत्र येऊन आनंद साजरा करण्याचा एक मोठा सामाजिक सोहळा बनला आहे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षडरिपूंवर विजय मिळवणे हा या सणाचा खरा उद्देश आहे.

नवरात्र म्हणजे आदिशक्तीच्या, स्त्री शक्तीच्या जागरणाचा उत्सव. आजचा सुशिक्षित समाज या नऊ दिवसांत स्त्री सबलीकरण, स्त्री शिक्षण आणि त्यांच्या हक्कांबद्दल उघडपणे बोलू लागला आहे. स्त्रीला केवळ 'अबला' न मानता तिचे 'दुर्गा' रूप स्वीकारण्यास तयार होत आहे म्हणजेच आजची मानसिकता या संकल्पनेला अधिक प्रगल्भतेने पाहू लागली आहे. एकीकडे समाजात कर्तृत्ववान स्त्रियांचा आदर करणे, त्यांना समान संधी देणे याविषयीची जाणीव वाढली आहे म्हणजेच सकारात्मक बदल दिसून येत आहे. तर दुसरीकडे द्वंद्व ही पहायला मिळत आहे. नऊ दिवस देवीची मनोभावे पूजा करतो. पण समाजात खऱ्या आयुष्यातील स्त्रियांवर होणारे अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार किंवा त्यांच्याशी होणारा दुजाभाव थांबवायचा नाही म्हणजेच दुर्लक्ष करायचे. नवरात्रीत आपण दुर्गेच्या नऊ रूपांची पूजा करतो. लहान मुलींना देवी मानून त्यांचे पादपूजन करून पाय पडतो. पण दुसरीकडे, समाजात महिलांविरुध्दचे गुन्हे आणि मानसिक छळ कमी झालेला नाही. नऊ दिवस ज्या स्त्री शक्तीला आपण पूजतो, त्याच स्त्रीचा रोजच्या आयुष्यात किती आदर केला जातो म्हणजे महिलांची सुरक्षितता आणि आदर हा आजच्या मानसिकतेसमोरील मोठा प्रश्न आहे. आधुनिक महिला आता या सणाकडे स्वत:मधील 'दुर्गा' (आत्मविश्वास आणि शक्ती) जागृत करण्याचे माध्यम म्हणून पाहत आहे. आजची स्त्री अन्यायाविरुध्द आवाज उठवण्यासाठी नवरात्रीच्या ऊर्जेचा वापर करत आहे.

आजच्या न्यूक्लियर फॅमिली आणि डिजिटल जगात माणूस एकटा पडत चालला आहे. नवरात्रीचे नऊ दिवस लोकांना एकत्र आणतात, ज्यामुळे 'एकटेपणाची मानसिकता' दूर होऊन समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि मानसिक प्रवासाला एक नवी ऊर्जा मिळते. सर्व मतभेद, जात-पात बाजूला ठेवून एकत्र नाचणे, आनंद साजरा करणे यामुळे समाजातील एकतेची भावना बळकट होते. वर्षभराच्या थकव्यानंतर मानवी मनाला पुन्हा नवसंजीवनी देणारा हा काळ ठरतो. नवरात्रीच्या नऊ रंगाचे आजच्या काळात वेगळेच वेड आहे. कार्यालयांमध्ये, कॉलेजमध्ये सर्वजण एकाच रंगाचे कपडे घालताना दिसन येते. ही मानसिकता 'एकता' आणि 'समानता' दर्शवते. विषमतेच्या भिंती तोडून सर्वांनी एकत्र येण्याची ही आधुनिक मानसिकता नक्कीच कौतुकास्पद आहे. सांगायचे तात्पर्य म्हणजे आजची मानसिकता नवरात्रीकडे एक पारंपरिक धार्मिक सण म्हणून तर पाहतेच, पण सोबतीला मनोरंजन, सामाजिक एकत्रिकरण आणि मानसिक ऊर्जा मिळवण्याचे एक उत्तम माध्यम म्हणूनही याकडे बघते. नवरात्री हा केवळ एक धार्मिक सण राहिलेला नाही, तर तो सामाजिक एकत्रिकरण, आत्मपरीक्षण आणि मनोरंजनाचा एक मोठा उत्सव बनला आहे. गरज आहे ती फक्त बाह्य भपक्यापलीकडे जाऊन या सणामागील 'स्त्री शक्तीचा आदर' आणि 'अंतर्मनाच्या शुद्धीकरणाचा' विचार जपण्याची आणि देवीच्या रूपांमधील संयम, बुध्दी आणि करुणा हे गुण आपल्या दैनंदिन विचारांमध्ये आणि वर्तनात उतरवण्याची. जेणेकरून खऱ्या अर्थाने आपल्या मनातील 'महिषासूर' रुपी नकारात्मक विचारांचा मर्दन करता येईल.

आधुनिक काळात लोकांच्या मानसिकतेत एक सकारात्मक बदलही पाहायला मिळत आहे, तो म्हणजे पर्यावरणपूरक नवरात्र. प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी शाडूच्या मातीच्या मूर्तीची स्थापना करणे, रासायनिक रंगाऐवजी नैसर्गिक रंगाचा वापर करणे आणि ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी आवाजाची मर्यादा पाळणे यावियी आजची तरुण पिढी जागरूक होत आहे. हा बदल समाजाच्या प्रगतीशील मानसिकतेचे लक्षण आहे. अनेक मंडळांमध्ये आता महागड्या मूर्ती किंवा सजावटीऐवजी ता पैशातून रक्तदान शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना मदत किंवा वृक्षारोपण यासारखे सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. म्हणजेच आजची तरुण पिढी अधिक संवेदनशील होताना दिसते. लोक परंपरेचा आदर करत आहेत, पण त्यात स्वतःच्या सोयीनुसार आणि आधुनिक विचारसरणीनुसार बदलही करत आहेत.

भारतीय संस्कृतीत नारीला आदिशक्तीचे रूप मानले गेले आहे. त्यामुळे नवरात्र हा भारतीय संस्कृतील अत्यंत महत्त्वाचा, ऊर्जेचा आणि आदिशक्तीच्या उपासनेचा सण आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवात आपण दुर्गेच्या नऊ रूपांची अत्यंत भक्तीभावाने पूजा करतो, उपवास करतो आणि तिचा जयजयकार करतो. हा सण केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नसून तो वाईटावर चांगल्याचा विजय आणि स्त्री शक्तीचा सन्मान करण्याचे प्रतिक आहे. पण नवरात्र संपताच, 'या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता' म्हणणारे आपण, आपल्याच घरातील आणि समाजातील जिवंत स्त्रीशक्तीचा आदर करायला का विसरतो? आपण पुन्हा आपल्या जुन्या मानसिकतेकडे का वळतो? म्हणून स्त्रीशक्तीचा आदर केवळ नवरात्री पुरताच का? हा आजच्या काळातील आधुनिक समाजासमोरील एक अत्यंत गंभीर आणि विचार करायला लावणारा प्रश्न आहे.

एकीकडे आपण स्त्रीला देवीचे रूप मानून तिच्यासमोर नतमस्तक होतो, तर दुसरीकडे प्रत्यक्ष आयुष्यात अनेक स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. वर्षातील नऊ दिवस तिची पूजा करणे आणि उर्वरित ३५६ दिवस तिच्या अस्तित्वाचा, तिच्या हक्कांचा आणि तिच्या भावनांचा आदर न करणे, हा एक ढोंगीपणा आहे. खऱ्या स्त्रीशक्तीचा आदर करायचा असेल, तर तो केवळ काही दिवसांपुरता मर्यादित न राहता दैनंदिन जीवनाचा भाग असायला हवा. आजच्या आधुनिक युगातही आपल्याला अनेक विरोधाभास पाहायला मिळतात. नवरात्रीत रात्री उशिरापर्यंत गरबा खेळणाऱ्या मुलींना सुरक्षित वातावरण मिळते, पण एरवी मात्र त्यांना रात्री बाहेर पडताना हजार वेळा विचार करावा लागतो. एका बाजूला 'कन्या पूजन' केले जाते, तर दुसऱ्या बाजूला आजही समाजात मुलगा आणि मुलगी असा भेद केला जातो. घरात आणि कामाच्या ठिकाणी रात्रंदिवस झटणाऱ्या स्त्रीच्या कष्टाला अनेकदा गृहीत धरले जाते.

स्त्रीशक्तीचा खरा आदर केवळ मूर्तीची पूजा करण्यात किंवा तिची स्तुती गाण्यात नाही. शिक्षण, नोकरी आणि प्रगतीचे निर्णय घेताना तिला पुरुषांच्या बरोबरीने समान संधी आणि स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. प्रत्येक स्त्रीला घरात, रस्त्यावर आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि सन्मानाचे नि रात्रीच्या वेळीही भीतीमुक्त वातावरण मिळायला हवे. तिच्या मताला, तिच्या आवडीनिवडीला महत्त्व आणि तिच्या स्वप्नांवर बंधने न घालता तिला स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याचे स्वातंत्र्य समाजात दिले पाहिजे. मुलांवर लहानपणापासूनच मुलींचा आदर करण्याचे संस्कार झाले पाहिजे. जोपर्यंत आपण घरातल्या स्त्रीला माणूस म्हणून आदर देत नाही, तोपर्यंत मंदिरातील देवीची पूजा व्यर्थ आहे. स्त्री ही केवळ चूल आणि मूल सांभाळणारी व्यक्ती नसून ती आज अंतराळापासून ते देशाच्या संरक्षणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजवत आहे. तिच्यातील या अथांग शक्तीचा आदर रोजच्या व्यवहारात दिसणे गरजेचे आहे.

काळ बदलतो तशा सण साजरा करण्याच्या पद्धती बदलतात हे स्वाभाविक आहे. आजच्या मानसिकतेत जरी आधुनिकता आणि मनोरंजन वाढले असले, तरी सणाचे मूळ मर्म विसरता कामा नये. नवरात्र ही केवळ नऊ दिवस नटण्याची किंवा गरबा खेळण्याची संधी नाही, तर ती स्वत:मधील नकारात्मक विचार, अहंकार आणि वाईट सवयींवर विजय मिळवण्याची पर्वणी आहे. स्त्री ही केवळ नवरात्रीत पुजली जाणारी मूर्ती नाही, तर ती सृष्टीचे चक्र चालवणारी, कुटुंबाला आधार देणारी आणि समाजाची प्रगती साधणारी जिवंत शक्ती आहे. जोपर्यंत आपण आपल्या घरातील आई, बहीण, पत्नी आणि मुलगी यांच्या कर्तृत्वाचा आणि अस्तित्वाचा आदर करत नाही, तोपर्यंत नवरात्रीच्या पूजेला काहीच अर्थ उरणार नाही. म्हणूनच, स्त्रीशक्तीचा आदर हा केवळ नऊ दिवसांचा उत्सव न ठरता, तो ३६५ दिवसांचा जीवनमार्ग बनला पाहिजे. आपण समाजातल्या प्रत्येक स्त्रीला सुरक्षित आणि आदरयुक्त वातावरण देऊ, तरच खऱ्या अर्थाने देशात आणि समाजात 'नवरात्र' साजरी होईल.

- ७४९८८८५०६१

नवरात्र उत्सव, नवचैतन्याचा तेजोमय प्रकाश

रमेश लांजेवार
नागपूर

मॉदेवी हे मांगल्य, चैतन्य, उर्जेचें व शक्तीचे प्रतीक आहे. अनेक कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते.कारण मॉ दुगेचें दुसरे रूप म्हणजे संपूर्ण ब्रम्हांडच म्हणावे लागेल. घटस्थापणेपासुन तर दसऱ्यापर्यंत संपूर्ण भारतात आपल्याला वेगवेगळ्या पध्दतीचे उत्साहाचे व मांगल्याचे वातावरण पहायला मिळते.मॉ दुगाचीं शक्ती अफाट व अनंतकाल आहे. त्याची आपण गणना सुध्दा करू शकत नाही.त्यामुळे संपूर्ण शुभ कार्याप्रसंगी व कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते. देवीचे अनेक रूप आपल्याला पहायला मिळते.प्राचीन काळापासून शक्तीच्या उपासनेला खूपच महत्व दिले आहे. शक्तीची उपासना मानवजातीच्या कल्याणासाठी नेहमी प्रेरणादायी ठरत असते. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आपल्याला वेगवेगळी शक्तीची रूपे पहायला मिळते. म्हणजे नवरात्रीमध्ये पृथ्वीतलावर साक्षात देवी प्रगट होत असते.

या पृथ्वीतलावर देवी भागवत पुराणानुसार देवींची १०८ शक्तीपीठ असल्याचे सांगण्यात येते.त्याचप्रमाणे वेगवेगळ्या पुराणांमध्ये ही आकडेवारी वेगवेगळी सांगीतली आहे.कालिका पुराणांमध्ये २६, शिवचरित्र पुराणामध्ये ५१, दुर्गा शप्तसती आणि तंत्रचूडामणिमध्ये शक्ती पीठांची संख्या ५२ सांगितली आहे. परंतु साधारणतः ५२ शक्तीपीठांना जास्त महत्व दिले जाते.वा शक्ती पीठांपैकी साडेतीन शक्तिपीठे एकट्या महाराष्ट्रात आहे हे महाराष्ट्राचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.देवीची साडेतीन शक्तिपीठामध्ये श्री महालक्ष्मी (अंबाबाईचे देऊळ, कोल्हापूर) हे महाराष्ट्रात असलेल्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक आहे.श्री रेणुकामाता (माहूर) माहूर हे देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी दुसरे असून येथील पीठाची देवता रेणुकामाता आहे.

रेणुकादेवी तसेच दत्तात्रय आणि परशुराम यांची देखील प्राचीन मंदिरे माहूरगडावर पहायला मिळते.त्यामुळे साडेतीन शक्तिपीठांपैकी हे एक मूळ जागृत पीठ आहे. तुळजाभवानी (तुळजापूर) महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी तिसरे शक्तीपीठ आहे. श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे. ही देवी भगवती (भवानी) म्हणून प्रसिध्द आहे. महाराष्ट्रातील प्रेरणा शक्ती व स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आराध्य दैवत अशी ही तुळजापूरची तुळजाभवानी देवी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे. इतिहास व पुरातत्वदृष्ट्या हे मंदिर यादवकालीन मानले जाते.तर काहिंच्या मते हे १७ व्या किंवा १८ व्या शतकातील मानली जाते. व साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्ध्या पीठाचे महत्त्वाचे स्थान म्हणजे सप्तशृंगी देवी (नाशिक) सप्तशृंगीदेवीला महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीचे ओंकार रूप समजण्यात येते. शुंभनिशुंभ व महिशासुर या पाशवी शक्तीच्या असुरांचा नाश केल्यावर तप-साधनेसाठी देवीने या गडावर वास्तव्य केले होते. सह्याद्रीच्या या उंच कड्यास सात शिखरे आहेत. त्यावरूनच या स्थानाचे नाव सप्तशृंगगड असे पडले. नवरात्र उत्सवामध्ये संपूर्ण भारतात आपल्याला एक आगळावेगळे मांगल्याचे व नवचैतन्याचे वातावरण पहायला मिळते. कारण लहान-मोठे, आबालवृद्ध संपूर्ण मॅदेवीच्या आराधनेमध्ये तल्लीन असतात व जय माता दी चा जयघोष करीत असतात. त्यामुळे नवरात्रीपासुनच दिवाळीच्या सणाची चाहूल लागते आणि नवरात्रीपासुनच आपण घरांच्या सजावटीला सुरूवात करतो.

नवरात्र उत्सवामध्ये देवीची ९ दिवस आराधना केल्यानंतर दशमीला विजयादशमी (दसरा) उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व म्हणजे असुरी शक्तीचा नाश व सत्याचा विजय मानलेल्या जाते. दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाचा संहार करून असुरी शक्तीला संपवीले व विजय प्राप्त केली. त्यानिमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो. आपण पहातो की नवरात्रीपासुन गुलाबी थंडीला सुरुवात होते. म्हणजे संपूर्ण सृष्टीचे वातावरण या ९ दिवसांमध्ये बदलल्याचे आपल्याला दिसून येते व सर्वत्र नवचैतन्य निर्माण होते.परंतु यावर्षी कोरड्या दुष्काळाचे सावट असल्याने जनुकाय थंडी नाहीशी झाली की काय असे वाटत आहे.

महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधल्या जाते.त्याचप्रमाणे महाराष्ट्रात अनेक देवीदेवतांचे वास्तव्य असल्याचे आपल्याला पहायला मिळते. त्यामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण नागरिकांनी महाराष्ट्र दर्शन करून देवीदेवतांचे एकदा तरी दर्शन घेतले पाहिजे. नवरात्रामध्ये आपण मॅदेवीची आराधना करतोच यात दुमत नाही.परंतु निसर्गाला वाचविण्यासाठी देवीला साकडे सुध्दा घातले पाहिजे. कारण दिवसेंदिवस निसर्गाचे संतुलन डगमगल्याने हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. यामुळे सध्याच्या परिस्थितीत राज्यासह देशात कोरड्या दुष्काळाचे सावट दिसून येते. बदलत्या हवामानामुळे पशुपक्षी, मानव, जीवजंतू यांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे स्पष्ट दिसुन येते.कारण वाढते प्रदुषण, जंगल तोड यामुळे निसर्ग भयभीत झालेला आहे.याचेच प्रयत्नीय पशुपक्षांना भोगावे लागत आहे. आज जंगल तोडीमुळे आणि वाढत्या प्रदुषणामुळे व अलनिनोच्या प्रभावामुळे अनेक पशुपक्षी नामशेष झाल्याचे दिसून येते. उदाहरण द्यायचे झाले तर चित्ता असे अनेक पशुपक्षी आहेत की ते काही नामशेष झाले आहेत किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.याकरिता नवरात्र उत्सव लक्षात घेता संपूर्ण भक्तांनी वृक्षलागवडीकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.

फक्त फोटो शेषन पुरते किंवा कागदावर वृक्षारोपण नसावे तर ९ दिवस वृक्षलागवडीची मोहीम युध्दपातळीवर राबवीली पाहिजे. यात सरकारचा, प्रशासनाचा, सामाजिक संस्थांचा, दुर्गा मंडळे, शाळा महाविद्यालये यांचा सुध्दा सहभाग असायला हवा. यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईलच मॅदेवी सुध्दा प्रसन्न होईल व आपणा सर्वांना भरपूर आशिर्वाद देईल.कारण वृक्षलागवडीमुळे स्थल, जल, वायु यांचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल.मॉ महालक्ष्मी, रेणुकामाता, तुळजाभवानी, सप्तशृंगी देवीला प्रार्थणा करतो की, राज्यासह देशावर आलेले दुष्काळाचे सावट दुर व्हावे अशी मॉ चरणी प्रार्थना करतो.नवरात्रामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होवो आकार- पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर -दक्षिण सर्वत्र सुख-शांती व मांगल्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे अशी देवीच्या चरणी प्रार्थना करतो.कारण नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होने काळाची गरज आहे.कारण वाढते प्रदुषण, दुष्काळ, जंगलतोड व दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी होणे. यामुळे मानव, पशुपक्षी, संपूर्ण जीवजंतू व अन्य प्राणी यांचा सर्वांचा जीव धोक्यात आहे. याकरीता नवरात्र उत्सवाच्या पावनपर्वाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून संपूर्ण भारतवासीयांनी इतिहास घडवीने गरजेचे आहे.कारण मॅदेवी म्हणजे संपूर्ण ब्रम्हांड त्यामुळे आपल्याला वृक्षांच्या जळामुळात, पानात, फुलात, फळात देवीचे दर्शन अवश्य होईल. हे माते कोरड्या दुष्काळापासुन सर्वांना सावरण्याची शक्ती प्रदान कर व सर्वत्र मंगलमय वातावरण प्रस्थापित कर अशी तुज्या चरणी प्रार्थना करतो. सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके !! शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणी नमोस्तुते ! जय माता दी !

- ९९२१६९०७७९

सीमोल्लंघन करूया विचारांचे, रूढींचे आणि अंधश्रद्धेचे!

रूढींच्या बेड्या तोडूया, विचारांना देऊ नवी दिशा, सावित्रीच्या विचारांनी, उजळू दे समतेची आशा। अंधश्रद्धेचे दहन करून, शिक्षणाची ज्योत पेटवूया, विजयादशमीच्या पर्वावर, परिवर्तनाचे सीमोल्लंघन करूया! दसरा म्हणजे विजयाचा, नव्या संकल्पांचा आणि सकारात्मक परिवर्तनाचा सण. प्रभू श्रीरामांनी रावणावर मिळवलेला विजय आपल्याला सत्याचा असत्यावर आणि न्यायाचा अन्यायावर विजय मिळवण्याची प्रेरणा देतो. मात्र, आजच्या काळात दसऱ्याचा अर्थ केवळ रावणदहनापुरता मर्यादित न ठेवता, आपल्या मनातील व समाजातील वाईट विचारांचे दहन करण्याची गरज आहे. स्त्री-पुरुष भेदभाव, जातिभेद, अंधश्रद्धा, हुंडाप्रथा, अन्यायकारक रूढी आणि स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर घातली जाणारी बंधने यांवर विजय मिळवणे, हेच खऱ्या अर्थाने आजच्या काळातील सीमोल्लंघन ठरेल. या परिवर्तनाच्या प्रवासात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार आपल्याला नवी दिशा देतात.

ज्या काळात मुलींना शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारला जात होता, त्या काळात सावित्रीबाई फुले यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सहकार्याने मुलींच्या शिक्षणासाठी ऐतिहासिक कार्य केले. समाजाचा विरोध, अपमान आणि अनेक संकटांचा सामना करून त्यांनी शिक्षणाची ज्योत तेवत ठेवली. स्त्रीने शिकावे, स्वावलंबी व्हावे, स्वतःच्या हक्कांची जाणीव ठेवावी आणि अन्यायाविरुद्ध उभे राहावे, हा त्यांच्या कार्याचा मूलभूत संदेश होता. सावित्रीबाईंनी शिक्षणाला केवळ अक्षरज्ञान मानले नाही, तर समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनवले. शिक्षणामुळे माणसाला योग्य-अयोग्य यातील फरक समजतो, स्वतःच्या अधिकारांची जाणीव होते आणि अन्यायकारक प्रथांना प्रश्न विचारण्याचे बळ मिळते. आज मुली शिक्षण घेत आहेत, विविध क्षेत्रांत यश मिळवत आहेत; तरीही काही ठिकाणी मुलगा-मुलगी भेदभाव, बालविवाह, हुंडाप्रथा आणि स्त्रियांवरील अन्याय दिसून येतो. आशा परिस्थितीत सावित्रीबाईंच्या विचारांची आठवण केवळ जयंती किंवा पुण्यतिथीपुरती न ठेवता, ती आपल्या दैनंदिन आचरणात आणणे आवश्यक आहे. आपल्या समाजात काही परंपरा प्रेम, आपुलकी आणि एकतेची शिकवण देतात; परंतु ज्या रूढी माणसाच्या स्वातंत्र्यावर बंधने घालतात, शिक्षणापासून दूर ठेवतात किंवा स्त्री-पुरुषांत भेद निर्माण करतात, त्यांचा चिकित्सक विचार करणे गरजेचे आहे. आणि मानवी प्रतिष्ठेचा मार्ग दिसतो. त्यांच्या विचारांचा प्रभाव स्वीकारणे म्हणजे जुन्या प्रत्येक गोष्टीला नाकारणे नव्हे, तर विवेकाच्या कसोटीवर परंपरांचा विचार करून अन्यायकारक प्रथांमध्ये परिवर्तन घडवून आणणे होय.

- सौ. माधुरी धनोकार, अकोला


थोडक्यात

अड्याळमध्ये जुगारावर पोलिसांची धाड, चौघांना अटक; ९१० रुपयांचा मुद्देमाल जप्त

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

५२ पत्त्यांचा जुगार रंगात आला असतानाच पोलिसांनी छापा टाकून चार जणांना पकडले. मौजा अड्याळ येथे १८ ऑक्टोबर रोजी ही कारवाई करण्यात आली. जुगाराविरोधातील पोलिसांच्या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस पथकाने घटनास्थळी धाड टाकली. यावेळी राकेश भाऊराव ठाकरे (४२), सूर्यभान तिमा मडावी (५२), रूपचंद वातु गायकवाड (५२) आणि रामभाऊ गंगाराम शहारे (६५), सर्व रा. अड्याळ, हे ५२ पत्त्यांचा जुगार खेळताना आढळले. पोलिसांनी घटनास्थळावरून ताशपत्ते आणि ८६० रुपये रोख असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी चारही आरोपींविरुद्ध पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम १२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

कोदामेंढी येथे आज धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भोजनदान



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

दरवर्षीप्रमाणे यंदाही धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ .बाबासाहेब आंबेडकर बौद्ध बहुउद्देशीय सोसायटी कोदामेंढी तर्फे बसस्थानक चौकात उद्या मंगळवार (ता.२०ऑक्टोबर)ला सायंकाळी भोजनदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बहुउद्देशीय सोसायटीचे अध्यक्ष संदीप गजभिये,उपाध्यक्ष संघपाल बोरकर, सदस्यगण रोशन खोब्रागडे, अनुप ठवरे, प्रवीण साखरे, आशिष साखरे,प्रफुल फुलझले, प्रदीप बोरकर,नरेंद्र वाहने, जितेंद्र रंगारी ,अनिल खोब्रागडे,तरुण गजभिये, मनोज खोब्रागडे, चरण खोब्रागडे, कांता रंगारी, शकुन तिरपुडे,पंचफुला नंदेश्वर, लहाना ठवरे परिश्रम घेत असून समस्त ग्रामवासी सहकार्य करत आहे.

स्वच्छतेचा संदेश देत जनजागृती रॅली

पारवे महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

स्वच्छ भारत अभियानाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पारवे कॉलेज ऑफ नर्सिंग, पारवे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि पारवे फॅरामेडिकल इन्स्टिट्यूशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी येथे स्वच्छता जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छता, आरोग्य आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून देण्यात आले.


या रॅलीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत स्वच्छतेविषयी घोषणा दिल्या. परिसर स्वच्छ ठेवणे आणि स्वच्छतेच्या सवयी दैनंदिन जीवनात अंगीकारणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला. या वेळी संस्थेचे संचालक डॉ. मिश्रा, प्राचार्या चारुलता गुलघाने तसेच प्राध्यापक वैशाली राऊत, इशिका फुलझेले आणि मोहिनी डुकरे उपस्थित होते. त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी जनजागृतीचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन केले.

२० ऑक्टोबरला जागतिक ऑस्टिओपोरोसिस दिन

जागतिक ऑस्टिओपोरोसिस दिनाच्या निमित्ताने हाडांच्या ठिसूळपणाबाबत जनजागृती करणारे प्रबोधनात्मक गीत डॉ. संजीव चौधरी सादर करणार,२० ऑक्टोबर ला, जागतिक ऑस्टिओपोरोसिस दिन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दरवर्षी २० ऑक्टोबर रोजी जागतिक ऑस्टिओपोरोसिस दिन साजरा केला जातो. हाडे ठिसूळ होण्याचा हा आजार अनेकदा



हाड मोडेपर्यंत लक्षात येत नसल्याने त्याला 'मूक मारेकरी' असेही म्हटले जाते. विशेषतः रजोनिवृत्तीनंतर महिलांमध्ये तसेच वाढत्या वयातील पुरुषांमध्ये या आजाराचा धोका वाढतो. या आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी डॉ. संजीव चौधरी व डॉ. वैशाली चौधरी यांच्या लेखणीतून साकारलेले, मोरेश्वर निस्ताने यांच्या सुमधुर स्वरांनी सजलेले आणि हर्षा वेखंडे यांच्या निवेदनाने नटलेले प्रबोधनात्मक गीत सादर करण्यात आले आहे. कॅल्शियम व जीवनसत्त्व 'ड'युक्त आहार, नियमित व्यायाम, योग्य जीवनशैली आणि वेळेवर निदान यांद्वारे ऑस्टिओपोरोसिसचा धोका कमी करता येतो. या जागतिक दिनानिमित्त हाडांच्या आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शिक्षकांना नोकरीतून काढण्याच्या धमक्या देणाऱ्यांची चौकशी करणार

शिवाजी शिक्षण संस्थेचे नाव घेतले नाही, अमरावती शिक्षक मतदारसंघात काँग्रेसकडून संस्था चालकांमार्फत दबाव टाकला जात आहे, महाराष्ट्रातील पाचही जागा महायुती जिंकेल, असा विश्वास : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत काँग्रेसला मतदान न केल्यास शिक्षकांना नोकरीतून काढण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याच्या तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत. या तक्रारींची योग्य वेळी चौकशी करण्यात येईल. शिक्षकांना धमकावून मतदान मिळवण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा महसूलमंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिला.

शिक्षण संस्थांना सरकारकडून अनुदान मिळत असताना काही संस्थांमधील व्यक्तींकडून शिक्षकांवर दबाव टाकला जात असल्याचा आरोप बावनकुळे यांनी केला. शिक्षकांनी कोणत्याही धमकीला न घाबरता, पारदर्शकपणे आणि आपल्या इच्छेनुसार मतदान करावे. शिक्षकांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.



शिवाजी शिक्षण संस्थेबाबत भूमिका स्पष्ट करताना बावनकुळे म्हणाले, मी शिवाजी शिक्षण संस्थेचे नाव घेतले नव्हते. या संस्थेबद्दल मला पूर्ण आदर आहे. मी स्वतः या संस्थेचा विद्यार्थी आहे. संस्थेचे काम मोठे करण्यात आमचेही योगदान राहिले आहे. मात्र, संस्थेच्या पदाचा किंवा नावाचा राजकीय स्वार्थासाठी गैरवापर होत असेल, तर त्याला आमचा आक्षेप आहे.

महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या संस्थेने त्यांच्या आदर्शांचे पालन करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. संस्थेतील काही व्यक्ती काँग्रेसला मतदान करण्यासाठी शिक्षकांना धमकावत असल्याच्या तक्रारी आल्या असून, त्यांची चौकशी केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

काही व्यक्ती गैरवापर करत असतील, तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. मी संस्थेचे नाव घेतले नसताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि हर्षवर्धन देशमुख यांना एवढे का लागले, असा प्रश्नही बावनकुळे यांनी उपस्थित केला.

महाराष्ट्रातील पाचही जागा जिंकण्याचा विश्वास

नागपूर पदवीधर मतदारसंघासह महाराष्ट्रातील पाचही विधान परिषद जागांवर महायुतीचा विजय होईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, महायुती अत्यंत मजबूत आहे. पदवीधर मतदारांना सुधाकर कोहळे यांच्या माध्यमातून आपले प्रश्न शिक्षकांना नोकरीतून काढण्याची धमकी देणे चुकीचे आहे. अशा प्रकारांना संस्थेचा अधिकृत निर्णय समजू नये. संस्थेच्या नावाखाली सरकारपर्यंत पोहोचवता येतील आणि ते सोडवले जातील, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे नागपूर पदवीधर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार सुधाकर कोहळे विजयी होतील. यापूर्वीच्या निवडणुकीत संदीप जोशी यांना पराभूत करण्यासाठी सत्तेचा गैरवापर आणि जातीचे राजकारण करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, आपण सत्तेचा गैरवापर केला नसल्याचे सांगत यावेळी ही जागा महायुती जिंकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अमरावतीतील बंडखोरावर कारवाईची मागणी

अमरावती येथील शिवसेनेच्या उमेदवाराविरोधात निवडणूक लढवणाऱ्या बंडखोर उमेदवारावर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती आपण केली असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. मी स्वतः अमरावतीमध्ये प्रचार केला आहे. त्यामुळे पक्षाने आपल्या बंडखोर उमेदवारावर कारवाई करावी, अशी माझी अपेक्षा आहे, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत काँग्रेस नेते सुनील केदार यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या मुद्द्यावर बावनकुळे यांनी नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात आपण पोलीस अधीक्षकांना माहिती दिल्याचे त्यांनी सांगितले.

संजय राऊत यांच्यावर टीका करताना बावनकुळे म्हणाले, संजय राऊत यांनी आपली उंची बघून बोलावे. देवेंद्र फडणवीस हे देशातील महत्त्वाच्या मुख्यमंत्र्यांपैकी एक आहेत. त्यांना कोणाच्या प्रमाणपत्राची गरज नाही. राज्यातील जनतेने त्यांना स्वीकारले आहे. बोलण्याचे स्वातंत्र्य आहे म्हणून कोणाबद्दलही वाईट पद्धतीने बोलणे योग्य नाही. जनता त्यांना योग्य धडा शिकवेल.

दुष्काळ निवारणासाठी काटकसरीचे आदेश

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीवर बोलताना बावनकुळे म्हणाले की, आपल्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने दुष्काळ निवारणासाठी आवश्यक सूचना दिल्या आहेत. दुष्काळी उपाययोजनांवर अधिक प्रभावीपणे खर्च करण्यासाठी काटकसर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

विकासासाठी एखाद्या रस्त्याचे काम काही काळ पुढे ढकलावे लागले, तरी चालेल; मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्या परवडणार नाहीत. शेतकऱ्यांना मदत करणे ही आमची प्राथमिकता आहे. चारा आणि पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्या लागतील, असे त्यांनी स्पष्ट केले. जलसंधारण, पाणीसाठा वाढविणे आणि जुन्या विहिरींचे पुनर्विकास यावर सरकार भर देत असल्याचेही त्यांनी सांगितले.

कोणतीही योजना बंद होणार नाही

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारी योजनांना कात्री लावली जाणार का, या प्रश्नावर बावनकुळे म्हणाले की, कोणतीही योजना बंद केली जाणार नाही. मात्र, योजनांच्या अंमलबजावणीत आवश्यक सुधारणा करून अनावश्यक खर्च टाळता येऊ शकतो. त्यातून वाचणारा निधी दुष्काळ निवारणासाठी वापरणे हा सरकारचा उद्देश आहे.

पुण्यतिथी महोत्सवाचे भव्य आयोजन

भव्य पालकी यात्रा आज

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

नगरीतील साई मंदिरात दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही साई बाबांची पुण्यतिथी ची साजरा करण्यात येत आहे. करिता खालीलप्रमाणे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, अशी विनंती साईबाबा मंदिर विश्वस्ताद्वारे केली जात आहे.

मंगळवार दि.२०/१०/२०२६ ला पहाटे ४ ते ६ : "श्री" चा अभिषेक, हवन व पूजा,सकाळी ६ ते ७: श्री साईबाबांची आरती,सकाळी ७ ते १२ : श्री साईबाबांची पालखी नगर मिरवणुक, दिंडी पताका, कलश मिरवणुक, भजनी मंडळी एकत्र. दिंडीकरी - श्री संत भारती महाराज सांप्रदायिक हरिपाठ भजन मंडळ, म्हसेपठार (संचालक श्री. महेश कवडकर), दुपारी १२ ते १ : श्री साईबाबांची आरती व साईदर्शन, अल्पोहार तसेच बुधवार दि.२१/१०/२०२६ ला सकाळी ८ ते ९ : श्री



साईबाबांची पूजा व आरती, दुपारी ३ ते ६ भजन श्री साईबाबा महीला भजन मंडळ, सावनेर, रात्री ८ ते १० : भजन श्री विश्वकर्मा महीला भजन मंडळ, सावनेर, गुरूवार दि.२२/१०/२०२६ ला सकाळी ८ ते ९: श्री साईबाबांची पूजा व आरती, रात्री ८ ते १०: भजन संध्या आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार सावनेर,शुक्रवार २३/१०/२०२६, सकाळी ८ ते ९ : श्री साईबाबांची पूजा व आरती, रात्री ८ ते १० : भजन - विठ्ठल रूक्मिनी भजन मंडळ,पांढुर्णा रोड, सावनेर, शनिवार, २४/१०/२०२६ सकाळी ८ ते ९ : श्री साईबाबांची पूजा व आरती, दुपारी ३ ते ६ : गोपाळ काल्याचे किर्तन ह.भ.प. श्री. हरिचंद्र वंजारी महाराज म.लाडगाव, ता. काटोल, जि. नागपूर. सायं. ६ ते ७: श्री. साईबाबांची पूजा व आरती महाप्रसाद वितरण शनिवार दि. २४/१०/२०२६ ला रात्री ७ ते १० पर्यंत. आयोजित केलेल्या वरील सर्व कार्यक्रमास आपण तन-मन-धनाने व कुटुंबियांसह सहभागी होवून कार्यक्रमाचा लाभ्यावा व कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही विनंती.

तसेच सर्व साईभक्तांना विनंती आहे की, सदर कार्यक्रमास ज्या भक्तांना धन, धान्य तथा देणगी देण्याची इच्छा असेल ती साई मंदिर सावनेर येथे स्विकारण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

श्री. साईबाबांची पालखी सरळ साई मंदीर येथून प्रस्थान करून मुख्य मार्गाने-बाजार चौक, राम मंदीर रोड ते होळी चौक ते गांधीपुतळा-अवधुतवाडी, राजकमल चौक, मेन रोड मार्गे भ्रमण करून मुख्य रस्त्याने परत साई मंदीरात पोहचेल.तरी भाविकांनी आपल्या आंगणात रांगोळी पताका लावून पालकीचे स्वागत करावे अशी विनंती आयोजकांतर्फे करण्यात येत आहे

सर्प बचावासाठी आता अधिक सुरक्षित पाऊल!



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासोबतच सर्प बचावाचे कार्य अधिक सुरक्षित आणि जबाबदारीने व्हावे, या उद्देशाने खापा वनपरिक्षेत्र अधिकारी विजय गंगावने यांच्या मार्फत कार्यरत सर्पमित्रांना आवश्यक सर्प बचाव साहित्याचे वाटप करण्यात आले.खापा वनपरिक्षेत्र हद्दीतील सर्पमित्र विशाल शेंडे व प्रेम खडसे यांना स्नेक रेस्क्यू हुक, रेस्क्यू बॅग आणि हेड लॅम्प आदी आवश्यक साहित्य देण्यात आले.

यावेळी सर्पमित्रांना साप पकडताना अत्यंत दक्षता बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या. स्वतःची, नागरिकांची तसेच सापाची सुरक्षितता महत्त्वाची असून सापांसोबत कोणत्याही प्रकारचा खेळ, प्रदर्शन किंवा स्टंट करू नये, असे स्पष्ट करण्यात आले.

मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यात सर्पमित्रांची महत्त्वाची भूमिका

मानवी वस्तीत आलेल्या सापांना कोणतीही इजा न करता सुरक्षितपणे बचाव करण्याच्या कार्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यामध्ये जबाबदार सर्पमित्रांचे मोठे योगदान आहे. यापुढेही वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली जबाबदारीने कार्य करण्याचे आवाहन करत सर्पमित्रांना त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

खापा वनपरिक्षेत्र अधिकारी विजय गंगावने यांच्या हस्ते सर्पमित्रांना रेस्क्यू साहित्याचे वाटप

स्वयंघोषित सर्पमित्रांना इशारा!

वनविभागाच्या मार्गदर्शनाबाहेर नियमांचे उल्लंघन करून साप पकडणे, त्यांचे प्रदर्शन करणे किंवा सापांसोबत खेळ व स्टंट करणे टाळावे. वन्यजीव संरक्षणासंबंधी नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई होऊ शकते, असा इशारा देण्यात आला.

नागरिकांनीही साप दिसल्यानंतर स्वतः त्याला पकडण्याचा किंवा मारण्याचा प्रयत्न न करता वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या प्रशिक्षित सर्पमित्रांची मदत घ्यावी.तसेच साप किंवा वन्यजीव आढळल्यास – १९२६ वर संपर्क साधा, 'सापाचा खेळ नको – सुरक्षित सर्प बचाव हवा!' वन्यजीव वाचवा, निसर्गाचे संतुलन राखा! मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी वनविभागाला सहकार्य करा!

प्रवाह तयार झाले, पण पाणी थांबवणाऱ्या पट्ट्या नव्हत्या!

मौदा तालुक्यामधील धरणे अत्यंत गंभीर अवस्थेत आहेत, उन्हाळ्यात पाणीटंचाईचा गंभीर धोका असून, पालकमंत्र्यांनी याकडे लक्ष द्यावे अशी विनंती आहे

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

सरकारने पाणी साठवून ते जमिनीत मुरवण्यासाठी विविध ठिकाणी धरणे बांधली. तथापि, मौदा तालुक्यामधील अनेक धरणांमध्ये पाणी रोखण्यासाठी आवश्यक असलेल्या संरक्षक पट्ट्यांची कमतरता आहे, ज्यामुळे सरकारच्या योजनेचा मूळ उद्देशच धोक्यात आला आहे. काही धरणांमधून या पट्ट्यांची चोरी झाल्यामुळे पाण्याची गळती होत आहे, तर अनेक धरणे आधीच कोरडी पडण्याच्या मार्गावर आहेत. परिणामी, येत्या उन्हाळ्यात रहिवाशांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.

मौदा तालुक्याच्या ग्रामीण भागात भूजल पातळी वाढवण्यासाठी, शेतीसाठी पाणी पुरवण्यासाठी आणि गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी धरणे बांधण्यात आली. तथापि, अनेक ठिकाणी बांधकामानंतर त्यांच्या देखभालीकडे आणि दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. धरणांमध्ये पाणी अडवणाऱ्या पट्ट्यांच्या अभावामुळे नदीचे पाणी साठवणे अवघड होते. परिणामी, पावसानंतर उपलब्ध असलेले पाणीदेखील वाया जात आहे.

प्रशासनाच्या योजनेवरील प्रश्न

धरण बांधकामावर शासकीय निधी खर्च करूनही, केवळ बंधाऱ्यांची कमतरता ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे, बंधारे चोरीला गेले आहेत किंवा त्यांचे नुकसान झाले आहे का, हे निश्चित करण्यासाठी संबंधित विभागाने तालुक्यातल्या सर्व बंधाऱ्यांची पाहणी करावी.

उन्हाळा सुरू होण्यापूर्वी दुरुस्ती आणि डागडुजीची कामे पूर्ण झाल्यास, संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता कमी होण्यास मदत होऊ शकते. आता प्रशासन ही समस्या किती गांभीर्याने घेते, याकडे गावकरी लक्ष ठेवून आहेत. धरणांमधील पाण्याची पातळी झपाट्याने घटली आहे; प्रशासन बंधाऱ्यांच्या पट्ट्या बांधण्याकडे दुर्लक्ष करत आहे का?

यावर्षी कमी पावसामुळे धरणांमधील पाणीसाठा कमी झाला आहे. यामुळे रबी हंगामात शेतकऱ्यांसमोर सिंचनाची गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. शेती आणि पाणीपुरवठा हे पेंच, तोतलाडोह धरण आणि खिंडसी तलावातील पाण्यावर अवलंबून असताना, धरणांवर जलसंधारण पट्ट्यांच्या अभावामुळे उपलब्ध पाणी वाया जाण्याचा धोका आहे.

प्रशासनाने वेळेवर कारवाई न केल्यास, या उन्हाळ्यात शेतकरी आणि गावकरी दोघांनाही पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. धरणे बांधली आहेत,



पण जलसंधारण पट्टे कुठे आहेत? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. परिसरातील शेतकरी आणि नागरिक तातडीने बंधारे बांधून जलसाठा कायम राखण्यासाठी एक योजना तयार करण्याची मागणी करत आहेत.

७० गावांचा पाणीपुरवठा बाधित होण्याची शक्यता आहे

प्रस्तुत धरण आठ ते दहा गावांना पाणीपुरवठा करते. जेव्हा धरण नवीन बांधले गेले होते, तेव्हा नदीपात्रात पाच ते सहा फूट पाणी होते. तथापि, धरणाच्या चार तुळयांची चोरी झाल्यामुळे पाण्याची पातळी लक्षणीयरीत्या खाली आली आहे. सध्या नदीपात्रात फक्त गुडघ्यापर्यंत पाणी आहे.

ही परिस्थिती अशीच राहिल्यास, येत्या उन्हाळ्यात आपल्याला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे, प्रशासनाने तात्काळ या समस्येकडे लक्ष देऊन धरणालगत पट्ट्या बसवाव्यात.

- धर्मेंद्र येलाणे, माळी सरपंच बाबादेव

डीपीडीसी मार्फत घ्यावयाच्या उपाययोजना

मौदा तालुक्यात गावांमध्ये दोन-तीन, तर काही ठिकाणी तब्बल पाच धरणे बांधण्यात आली आहेत. मात्र, जलसंधारण पट्ट्यांच्या अभावामुळे अनेक धरणे पाणी साठवू शकत नाहीत. त्यामुळे, नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा नियोजन समितीमार्फत हा प्रश्न गांभीर्याने हाताळावा. ग्रामपंचायतीमार्फत प्रत्येक बंधाऱ्याची पाहणी करावी आणि आवश्यक बंधारे उभारण्यासाठी निधी व योग्य नियोजन उपलब्ध करून द्यावे.

- देवेंद्र गोडबोले, माजी जिल्हा परिषद सदस्य

थोडक्यात

येसंबा येथील नवदुर्गा उत्सव मंडळाला माजी उपसभापती खेमराज चाफले यांनी दिली भेट



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

येसंबा येथील नवदुर्गा उत्सव मंडळाला पं. स. मौदा माजी उपसभापती तथा चाचेर- निमखेडा जि प सर्कलचे भाजपचे भावी उमेदवार खेमराज चाफले यांनी भेट देऊन मातेचा आशिर्वाद घेउन महाप्रसाद घेतला .या प्रसंगी धनराज हारोडे उपसरपंच येसंबा, हिरा चकोले अध्यक्ष महिला आघाडी भाजपा मौदा, हर्षद हारोडे मंडळाचे अध्यक्ष व सदस्यगण,गावातील भाविक भक्तगण व महिला मंडळी, पाहुणे मंडळी उपस्थित होते.

सचिन बेंडभर यांच्या उपक्रमाची जिल्हास्तरावर निवड



दै. सिंहवाणी वृत्त, पुणे

माजी विद्यार्थी संघ, महात्मा जोतिराव फुले विद्यालय व शंकरराव मुगुटराव कामथे कनिष्ठ महाविद्यालय शिवरी आयोजित जिल्हास्तरीय निबंध लेखन स्पर्धेत प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर यांच्या पाठ्यपुस्तकातील लेखकाशी पत्राद्वारे संवाद या उपक्रमाची निवड करण्यात आल्याने नुकताच त्यांचा सन्मान पुणे जिल्ह्याचे वस्तू व सेवा कर विभागाचे उपयुक्त योगेश नेतनकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, प्रकल्प संचालक संतोष हराळे, सुप्रसिद्ध वक्ते व साहित्यिक नारायण टाक, शंकरराव कामथे, बळवंत गरुड आदी मान्यवर उपस्थित होते.

पुरंदर तालुक्यातील महात्मा ज्योतिराव फुले विद्यालय व शंकरराव मुगुटराव कामथे कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघाने पुणे जिल्हास्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केले होते. यात एकूण १०६ स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यातील २८ स्पर्धकांची निवड करण्यात आली. या स्पर्धेत प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर यांच्या पाठ्यपुस्तकातील लेखकांची पत्राद्वारे संवाद या उपक्रमाची निवड करण्यात आली. पुणे जिल्ह्याचे वस्तू व सेवा कर विभागाचे उपयुक्त योगेश नेतनकर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान सासवड येथील पांडुरंग भवन येथे करण्यात आला. यावेळी चॉक अँड टॉकच्या पलीकडे या पुस्तकाचा प्रकाशन सोहळाही संपन्न झाला. पुनम साळुंखे, शुभांगी भोसले, संतोष इनामके आणि लक्ष्मण जगताप अशा उपक्रमशील शिक्षकांनी या उपक्रमात सहभाग घेतला असून या विजेत्या शिक्षकांनीही या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर यादव यांनी केले. प्रमोद धायगुडे यांनी स्वागत, अविनाश जाधव यांनी प्रास्ताविक तर तानाजी सातव यांनी आभार मानले.

SCGT तर्फे 'सन्मान स्त्रीशक्तीचा', शहरातील सात कर्तृत्ववान महिलांचा गौरव



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टच्या नागपूर युवा उद्यमी चॅप्टरतर्फे नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या 'सन्मान स्त्रीशक्तीचा' या विशेष कार्यक्रमात शहरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सात कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी हॉटेल सयाजी, लक्ष्मी नगर चौक, नागपूर येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्रशासकीय सेवा, पोलीस प्रशासन, पर्यावरण संरक्षण, उद्योजकता, पाककला, शिक्षण आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला. यात शिल्पा सोनाले, उप जिल्हाधिकारी, नागपूर, दीपा आगे कारागृह अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह, नागपूर, हेमा देशपांडे विभागीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड, नागपूर, मीनल देहाडराय उद्योजिका आणि संचालक- अ‍ॅक्वाडेस स्ट्रक्रल कन्सल्टंट्स प्रा. लि., निता अंजनकर सुप्रसिद्ध शेफ आणि आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड होल्डर, अश्विनी बुजोने प्राचार्य, BKVTI नागपूर, भाग्यश्री राऊत जर्नलिस्ट या कर्तृत्ववान महिलांचा समावेश होता.

सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टच्या नागपूर युवा उद्यमी चॅप्टरतर्फे व्यावसायिक नेटवर्किंगसोबत सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम राबविले जातात. 'सन्मान स्त्रीशक्तीचा' हा कार्यक्रम महिलांच्या कार्याचा गौरव करणारा आणि समाजाला प्रेरणा देणारा ठरला. यावेळी SCGT चे विदर्भ रिजन हेड बागेश महाजन, डेप्युटी रिजन हेड निखिल जोशी, युवा उद्यमी चॅप्टरचे चेअरपर्सन अमित बोरकर, सचिव अंकुश हरकरे, कोषाध्यक्ष शुभम नवघरे तसेच शहरातील विविध क्षेत्रात व्यवसाय करणारे उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्विततेसाठी युवा चॅप्टरच्या कोअर टीमचे मोहन भोंग, अजिंक्य कैदलवार, चैताली बांगरे, हर्षल इरडे, समर कारलकर, राहुल गद्रे, सुधाकर लिचडे, तन्मय ताम्हाणे आदी सदस्यांनी सहकार्य केले.

तब्बल ५० दिवसांच्या प्रतीक्षेनंतर शिक्षक भरतीतील अनियमिततेच्या चौकशीसाठी समिती गठित!

पवित्र पोर्टल शिक्षक भरती प्रकरणाला अखेर गती, गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जनेत चंद्रा दोंतुला यांचे आदेश, हिंदी माध्यमाच्या पात्र उमेदवारांना न्याय मिळण्याची आशा; सात दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश!



दै. सिंहवाणी वृत्त, राजू फुंडे-सालेकसा

गोंदिया जिल्हा परिषद अंतर्गत पवित्र पोर्टलद्वारे करण्यात आलेल्या सन २०२५-२६ मधील सहाय्यक शिक्षक भरती प्रक्रियेत कथित अनियमितता झाल्याच्या तक्रारीनंतर तब्बल ५० दिवसांनी अखेर चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जनेत चंद्रा दोंतुला यांनी १९ ऑक्टोबर २०२६ रोजी यासंदर्भात आदेश जारी केले असून, या निर्णयामुळे शिक्षक भरतीतील अनियमिततेच्या आरोपांची चौकशी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

तक्रारींची दखल; चौकशी समिती गठित

पवित्र पोर्टल शिक्षक भरती प्रक्रियेत पात्रता आणि पसंतीक्रम निश्चित करताना अनियमितता झाल्याचा आरोप करत राजेश्वरी मानदास बसना व इतरांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी दाखल केल्या होत्या. या प्रकरणी १ सप्टेंबर २०२६ रोजी तक्रार अर्ज सादर करण्यात आला होता. त्यानंतरही विविध स्तरांवर तक्रारी व निवेदने देण्यात आली. मात्र, चौकशी समिती गठित होण्यासाठी तब्बल ५० दिवसांची प्रतीक्षा करावी लागली. अखेर या तक्रारींची दखल घेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांवर चौकशीची जबाबदारी

या प्रकरणाच्या चौकशीसाठी दोन अधिकाऱ्यांची समिती नियुक्त करण्यात आली आहे.

१. श्री. तानाजी लोखंडे – अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया (समिती प्रमुख).

२. श्री. सुधीर महानमुनी – शिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद गोंदिया.

सदर समितीने तक्रारींच्या अनुषंगाने सखोल व निष्पक्ष चौकशी करून सात दिवसांत अहवाल सादर करावा, असे निर्देश आदेशात देण्यात आले आहेत.

हिंदी माध्यमाच्या उमेदवारांना न्याय मिळणार का?

गोंदिया जिल्हा परिषद शिक्षक भरती प्रक्रियेत हिंदी माध्यमाच्या पात्र उमेदवारांवर अन्याय झाल्याचा मुद्दा यापूर्वीही उपस्थित करण्यात आला होता. पात्र उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार आणि नियमानुसार न्याय मिळावा, तसेच भरती प्रक्रियेतील कथित अनियमितता दूर करण्यात यावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे.

आता चौकशी समिती गठित झाल्यामुळे या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. समितीच्या चौकशीतून नेमक्या कोणत्या बाबी स्पष्ट होतात आणि संबंधित तक्रारींमध्ये तथ्य आढळते का, याकडे उमेदवारांसह शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

५० दिवसांच्या विलंबानंतर तरी न्याय मिळणार?

शिक्षक भरतीसारख्या महत्त्वाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता राखणे अत्यंत आवश्यक आहे. तक्रारींच्या चौकशीसाठी समिती गठित होण्यास ५० दिवसांचा कालावधी लागल्याने उमेदवारांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमाला आता पूर्णविराम मिळण्याची अपेक्षा आहे. सात दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याच्या निर्देशांमुळे या प्रकरणाचा लवकर निकाल लागण्याची आशा निर्माण झाली आहे. आता चौकशी निष्पक्षपणे होऊन पात्र उमेदवारांना न्याय मिळतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

श्री कोलबा स्वामी विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा संपन्न

विठ्ठलाच्या दिंडीने माजी विद्यार्थी व माजी शिक्षकांचे स्वागत, जुन्या आठवणींना उजाळा



दै. सिंहवाणी वृत्त, धापेवाडा

श्री कोलबा स्वामी विद्यालय, धापेवाडा येथे रविवार दिनांक १८ ऑक्टोबर रोजी माजी विद्यार्थी स्नेह मेळावा उत्साह पूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. अनेक वर्षानंतर एकत्र आलेले माझे विद्यार्थी त्यांचे लाडके शिक्षक आणि शाळेच्या आठवणींनी संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या स्नेह मिळाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे वारकरी संप्रदायाच्या वतीने काढण्यात आलेली विठ्ठलाची दिंडी विठ्ठल नामाच्या गजरात भक्तीने वातावरणात माझी विद्यार्थी व माजी शिक्षकांचे पारंपारिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. या स्वागतामुळे जणू काही विठ्ठलाच्या पंढरीत झाल्याचा अनुभव उपस्थित मिळाला. माजी विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. तसेच राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य मंडळाच्या सचिव आदरणीय सुहास ताई केदार या आवर्जून उपस्थित होत्या. यावेळी माजी मुख्याध्यापक, निंबाळकर सर, प्रा.गायचारे सर, डोंगरे सर, पिल्लेवान सर, हिवाळे सर, मदनकर सर, भगत सर, खडकर सर, सूर्यवंशी सर, शिंदे सर, प्रा. भोयर सर, भोयर मॅडम, चिखले मॅडम, सोमकुवर मॅडम, तामगाडगे सर, यांच्यासह अनेक माजी शिक्षक उपस्थित होते.

शाळेचे मुख्याध्यापक कडू सर, पर्यवेक्षक पाथरकर सर, प्रा. कांडलकर मॅडम, प्रा. बी.पी. राठोड सर, प्रा.राठोड सर, नंदनवार सर, इरपाजी सर बेलसरे सर, भड सर, कोडे मॅडम, मालापुरे सर, बेलसरे सर, इरपाजी सर, इंगोले मॅडम, चौधरी मॅडम, टेंभेकर मॅडम, सवाईमुल मॅडम, सलामे मॅडम, त्रिवेदी मॅडम, धोटे मॅडम, बागडे मॅडम, यांच्यासह शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक कडू सर यांनी विशेष परिश्रम घेतले विद्यार्थ्यांचा आनंदात आपला आनंद असल्याची भावना जपत त्यांनी संपूर्ण कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक कडू सर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक निंबाळकर सर , विशेष अतिथी म्हणून गायचारे सर हे मंचावर उपस्थित होते. यावेळी ग्रामीण भागात शिक्षणाचे रोपटे लावणारे आज त्याचे वट वृक्षात रूपांतर झाले. आदरणीय सहकार महर्षी बाबासाहेब केदार यांचा मान्यवरांच्या हस्ते दीप प्रतिमेला अर्पण करून दीप प्रज्वलित करण्यात . त्यानंतर माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षकांचा आधारित सत्कार करून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली ज्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ज्ञानासोबतच जीवनाची दिशा दिली, संस्कार केले आणि आयुष्यात पुढे जाण्याची प्रेरणा दिली, त्या शिक्षकां प्रति, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अनेकांच्या मनात जुन्या आठवणी दाटून आल्या.

या स्नेह मेळाव्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे श्री कोलबा स्वामी विद्यालयाचा माजी विद्यार्थी डॉ. आदिल शेख हा नुकताच दक्षिण कोरियातून पीएच.डी. ही सर्वाच्च शैक्षणिक पदवी प्राप्त करून भारतात परतला. त्याचाही शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. त्याच्या यशामुळे उपस्थित त्यांना अभिमान वाटला. कार्यक्रमादरम्यान माजी विद्यार्थ्यांनी आपल्या परिचय करून देत शाळेतील जीवनातील आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांची मनमोकळेपणाने संवाद साधत त्यांना जीवनात प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचे आणि यश मिळवण्याचे, प्रेरणादायी मार्गदर्शन केले. किंवा आठवणींना उजाळा देण्यापुरताच हा स्नेह मेळावा मर्यादित न राहता, शाळेच्या परिसरात माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा उपक्रमही राबविण्यात आला या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

या आनंद सोहळ्यात शाळे कडून वारकरी हृदयाच्या परंपरेनुसार साजेशी भेटवस्तू देऊन माझी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. अनेक वर्षानंतर पुन्हा एकत्र आलेले मित्र-मैत्रिणींनी आणि शिक्षक यांच्यातील संवादाने जुन्या नात्यांना नव्याने उजाळा मिळाला शालेय जीवनातील खोड्या, वर्गातील गमती जमती शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन आणि एकत्र घालवलेले दिवस यांचे आठवण काढताना, उपस्थित भारावून गेले. यानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला, तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आनंद, आपुलकी,कृतज्ञता आणि जुन्या आठवणींचा सुंदर संगम असलेल्या स्नेह मेळाव्याची सांगता. उत्साह पूर्ण वातावरणात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थिनी प्रणाली डहाट यांनी केले तसेच आभार व्यक्त माजी विद्यार्थिनी मेघा इंगळे यांनी केले.

शाळेच्या आठवणींनी पुन्हा एकदा माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणले आणि विद्यार्थी शिक्षकांमधील नात्याची वीण अधिक घट्ट केली हा स्नेह मेळावा उपस्थितांचा स्मरणात कायम राहील अशी भावना यावेळी व्यक्त झाल्या.

नवरात्रोत्सवातून चिमुकल्यांनी दिला समाजाला अनोखा संदेश!

स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाप्रथा, अंधश्रद्धेविरुद्ध नवदुर्गेच्या रूपातून जनजागृती; एस. आर. के. इंडो किड्स, जलालखेडाचा अभिनव उपक्रम



दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नवरात्रोत्सव म्हटले की देवीची आराधना, पारंपरिक वेशभूषा, गरबा-दांडिया आणि उत्साहाचे वातावरण डोळ्यांसमोर उभे राहते. मात्र, या उत्सवाला सामाजिक प्रबोधनाची जोड देत नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील एस. आर. के. इंडो किड्स शाळेने एक अभिनव उपक्रम राबविला. नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट प्रथा आणि वाईट प्रवृत्तींविरुद्ध जनजागृती करत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी समाजाला वेगळा संदेश दिला. नर्सरी ते केजी-१ मधील विद्यार्थ्यांनी नवदुर्गेची विविध रूपे साकारून स्त्रीशक्तीचा सन्मान, सामाजिक समानता आणि चांगल्या विचारांची रुजवण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी केवळ देवीची रूपे साकारली नाहीत, तर आपल्या अभिनयातून समाजातील गंभीर प्रश्नांवरही प्रकाश टाकला. शोषण, दारिद्र्य, स्त्रीभ्रूणहत्या, अंधश्रद्धा आणि हुंडाप्रथा यांसारख्या सामाजिक समस्यांचे प्रतीकात्मक चित्रण करून या वाईट प्रवृत्तींचा नाश करण्याचा संदेश देण्यात आला. नवदुर्गेच्या हातातील त्रिशूलाचा माध्यमातून समाजातील अनिष्ट रूढी, अन्याय आणि चुकीच्या विचारांचा अंत होत असल्याचे प्रभावी सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले.

समाजात आजही स्त्री-पुरुष असमानता, स्त्रियांवरील अन्याय, हुंडाप्रथा आणि अंधश्रद्धा यांसारख्या समस्या वेगवेगळ्या स्वरूपांत दिसून येतात. या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसून समाजाच्या विचारांत बदल होणेही तितकेच आवश्यक आहे. हाच विचार लक्षात घेऊन शाळेच्या वतीने नवरात्रोत्सवाला जनजागृतीची जोड देण्यात आली. लहान वयातील विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयातून मांडलेला हा संदेश उपस्थितांसाठी लक्षवेधी ठरला.

नवदुर्गेची विविध रूपे साकारताना विद्यार्थ्यांनी वाईट प्रवृत्तींचा नाश आणि चांगल्या विचारांचा विजय या संकल्पना प्रभावीपणे मांडल्या. स्त्री ही कुटुंबासोबतच समाजाच्या प्रगतीची महत्त्वाची शक्ती आहे. त्यामुळे मुलींचा जन्म आनंदाने स्वीकारणे, महिलांना समान संधी देणे, त्यांचा सन्मान राखणे आणि अन्यायकारक प्रथांना विरोध करणे आवश्यक आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या निरागस अभिनयातून गंभीर सामाजिक विषय सहज आणि प्रभावीपणे लोकांसमोर मांडण्यात आले.

या कार्यक्रमात हितांशी खरपुरिये, शैली तिवारी, लाभवी करसाडीये, नेहारिका चौरे, अद्रिका रहाट, त्रिशा मानमोडे, रिद्धी निंबुरकर, दीक्षिता बरडे, लाव्या मोरे आणि जागृती नागमोते यांनी नवदुर्गेची विविध रूपे साकारली. पारंपरिक वेशभूषा, आकर्षक सादरीकरण आणि अभिनयातील उत्साह यामुळे विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. चिमुकल्यांनी साकारलेल्या भूमिकांचे सर्वांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सादर केलेल्या सुंदर गरबा नृत्याने कार्यक्रमाच्या उत्साहात आणखी भर घातली. नवरात्रोत्सवातील पारंपरिक सांस्कृतिक वातावरण आणि सामाजिक प्रबोधनाचा उद्देश यांचा या कार्यक्रमात सुरेख मेळ साधण्यात आला.

आजच्या काळात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी केवळ शैक्षणिक प्रगती पुरेशी नसून त्यांच्यामध्ये सामाजिक भान, आत्मविश्वास, संवेदनशीलता आणि नैतिक मूल्यांची जोपासना होणेही गरजेचे आहे. शालेय जीवनातच चांगले संस्कार मिळाल्यास विद्यार्थ्यांची विचारसरणी सकारात्मक बनण्यास मदत होते. अभिनय, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक प्रश्नांची ओळख करून दिल्यास त्यांच्यामध्ये समाजाप्रती जबाबदारीची भावना विकसित होते.

एस. आर. के. इंडो किड्स शाळेच्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती आणि परंपरांची माहिती मिळण्यासोबतच समाजातील अनिष्ट प्रथांविषयी जागरूक होण्याची संधी मिळाली. एकीकडे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले, तर दुसरीकडे सामाजिक समस्यांविषयी विचार करण्याची प्रेरणाही मिळाली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो, त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव विकसित होण्यास मदत होते.

नवरात्रोत्सव हा शक्तीची उपासना करण्याचा सण आहे. मात्र, देवीची पूजा करताना समाजातील प्रत्येक स्त्रीचा सन्मान राखणे, मुलींच्या जन्माचे स्वागत करणे आणि महिलांवरील अन्यायाला विरोध करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. उत्सव साजरा करताना त्यातून समाजाला सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न झाला, तर त्या उत्सवाचे महत्त्व अधिक वाढते. जलालखेडा येथील एस. आर. के. इंडो किड्स शाळेने याच विचारातून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचा उपक्रम राबविला.

प्राचार्य शुभांगी अर्डक यांच्या संकल्पनेतून शाळेतील शिक्षकांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नर्सरी ते केजी-१ मधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. चिमुकल्यांच्या सहभागातून साकारलेल्या या नवरात्रोत्सवात संस्कार, संस्कृती, कलागुण आणि सामाजिक जागृती यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी दिलेला हा संदेश समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

थोडक्यात

घट विसर्जन मिरवणुकीने येरखेडा शहर दुमदुमले, ठिकठिकाणी स्वागत व प्रसादाचे वितरण



दै. सिंहवाणी वृत्त, कामठी

तालुक्यातील येरखेडा येथील सार्वजनिक तारा माता मंदिरात अश्विन नवरात्राच्या पर्वावर ५१ अखंड मनोकामना ज्योत (घट) स्थापन केले होते आज नवमीच्या पर्वावर काढण्यात आलेल्या घट विसर्जन मिरवणुकीने येरखेडा शहर दुमदुमले ठिकठिकाणी नागरिकांनी स्वागत करून प्रसादाचे वितरण केले. नगराध्यक्ष राजकिरण बर्वे यांची हस्ते अखंड मनोकामना ज्योत (घटाची) पूजा- आरती करून घट विसर्जन मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली बँड,ढोल ताशे,भजन मंडळाच्या उपस्थितीत निघालेली मिरवणूक रामकृष्ण लेआउट, पाणी टाकी,झेंडा चौक,दुर्गा चौक, तेलीपुरा,कामठी कन्टोन्मेंट मार्ग नगर भ्रमण करीत श्री शेत्र महादेव घाट कन्हान नदी येथे अखंड मनोकामना जोत घटाचे विसर्जन करण्यात आले.

मिरवणुकीत येरखेडा नगरपंचायत चौपाध्यक्ष रंजना काळे, बांधकाम सभापती मनीष कारेमोरें ,माजी सभापती बेबीताई काळे, अनुराधा भोयर, माजी जिल्हा परिषद सदस्य सरिता रंगारी ,माजी सरपंच मंगला कारेमोरें ,पुजारी कमलेश सहारे ,मधुकर ढोले, वसंतराव फावदे ,जगदीश झाडे, सुदाम राकडे ,मुरलीधर पारधी, मनोहर पारधी, लोनेश्वर देशमुख ,दास बाबू, युवराज भोगे, प्रवीण फायदे, रुपेश श्रीवास्तव, भाऊराव देशमुख,वसंतराव गुजेवार, घनश्याम गुजेवार, शीला देशमुख,सुषमा राकडे ,रमेश कारेमोरे, मीना दास,रजनी कारेमोरे,संगीता भोगे,वंदना वाझूरकर, वत्सला गुजेवार, सरिता भोयर, प्राजक्ता ढोले,अंकिता आगाशे, दिव्या पांडे सह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते घट विसर्जन मिरवणुकीचे ठिकठिकाणी नागरिकांनी स्वागत करून प्रसादाचे वितरण केले.

चिनोरा येथील रितीक मेश्रामची तायक्वांडो कराटेमध्ये उत्तुंग भरारी

तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष दिवाकर नन्नावरे यांच्या पुढाकाराने रितीकला लोकवर्गणीतून पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत



दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे

वरोरा येथील आनंद निकेतन महाविद्यालयात बी.कॉम. द्वितीय वर्षाला शिक्षण घेणाऱ्या रितीक भोलाराम मेश्राम याने तायक्वांडो कराटे या खेळात विशेष प्राविण्य प्राप्त केले असून त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्याने त्याला पुढील तायक्वांडो कराटे स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक चणचण भासत असल्याने त्याला राज्य स्तरावर पुणे येथे भाग घेता यावा, यासाठी गावातील तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष दिवाकर नन्नावरे, यांनी विशेष परिश्रम घेत लोकवर्गणीतून पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत गोळा करून चिनोरा ग्रामपंचायत कार्यालयात रितीक मेश्राम याला पन्नास हजार रुपये चे पाकिट दिले. यावेळी दिवाकर नन्नावरे, ग्रामपंचायत अधिकारी श्रीकांत कदम, प्रशासक राठोड,माजी सरपंच सुशिला तेलमोरे, प्राध्यापीका अर्चना वाटकर, सरपंच ताई परचाके, सदस्य निलेश डोंगरकर, पतंजली योग समितीचे तुळशिराम मिलमिले, गजानन भोयर, शरद भोयर, काशिनाथ शेंडे, माधुरी डोंगरकार, तुळशीदास धानोरकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

वरोरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आणखी तीन संचालकांवर अपात्रतेची टांगती तलवार

थकबाकी व राजकीय हितसंबंधांच्या आरोपावरून कारवाईची प्रक्रिया, बाजार समितीत राजकीय संघर्ष पुन्हा चर्चेत

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे

वरोरा कृषी उत्पन्न बाजार समितीतील संचालकांच्या अपात्रेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. बाजार समितीची कथीत थकबाकी आणि व्यापारी संस्थाशी संबंधित हितसंबंधांच्या मुद्द्यांवरून संचालक प्रवीण माणिकचंद मालु, व निरज शंकरलाल गोठी यांना जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून नोटीस बजावण्यात आली आहे या दोघांना २३ ऑक्टोबर ला दुपारी १ वाजता सुनावणी साठी उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहे. संबंधीत तक्रारीतील आरोप सिद्ध झाल्यास त्यांच्या संचालक पदाच्या पात्रतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

याआधीही माजी सभापती विजय देवतळे यांच्या तक्रारीवरून ग्रामपंचायत गटातुन निवडुन आलेल्या राजेंद्र चिकाटे, गणेश चवले, रघुनाथ जाधव व पुरुषोत्तम पावडे या चार सदस्यांना अपात्र करण्यात आले आहे. दिनांक ५ आक्टोंबर ला माजी सभापती डॉ विजय देवतळे यांच्या तक्रारीवरून बाजार समितीच्या आणखी तीन संचालकांवर अपात्रतेसाठी जिल्हा उपनिबंधक यांनी तिन संचालकांना नोटीस देऊन २३आक्टोबर रोजी आपले मत मांडण्यासाठी बोलविले आहे. या तक्रारीवरून प्रवीण मालु यांच्या पत्नी रश्मी मालु यांच्या नावाने कार्यरत असलेल्या हे.कुशल दाल मील उद्योग या फर्म कडे आर्थिक वर्ष २०२४-२५ व २०२५-२६ या कालावधीत देखरेख शुल्कापोटी अंदाजे ४ लाख ३७ हजार ५७१ रूपयाची थकबाकी असल्याचा दावा करण्यात आला आहे.तसेच संचालक निरज गोठी यांच्या पत्नी ज्योती या मे.बालाजी ऑग्रो इंडस्ट्रीज या व्यापारी फर्म कडे बाजार शुल्क देखरेख शुल्क, पर्यावरण शुल्क आणि इतर शुल्क मिळुन अंदाजे ७ लाख ४७ हजार २३० रुपयांची थकबाकी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कथीत थकबाकीच्या पार्श्वभूमीवर संबंधित संचालकांची पात्रता तपासुन आरोप तथ्यावर आधारित असल्याचे आढळून आल्यास नियमानुसार अपात्रतेची कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ. विजय देवतळे यांनी केली आहे. बाजार समितीचे संचालक बाळु भोयर यांनाही अशाच स्वरूपाची नोटीस पाठवण्यात आल्याची माहिती आहे.त्याच्या मुलाने स्वत:च्या नावाने दुकान गाळे भाड्याने घेतले असून त्यातून बाजार समितीच्या व्यवहाराचा लाभ मुलाला पोहचवण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आल्याचे सांगितले जाते.

दीक्षाभूमीवर अनुयायांच्या सोयीसाठी महावितरणचे अत्याधुनिक माहिती केंद्र सुरू



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

परमपूज्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या ऐतिहासिक दीक्षाभूमीवर ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त महामानवाच्या अभिवादनासाठी येणाऱ्या लाखो बौद्ध अनुयायी, नागरिक आणि वीज ग्राहकांना महावितरणच्या आधुनिक, ग्राहकाभिमुख सेवांची माहिती सहज मिळावी, तसेच विद्युत सुरक्षेबाबत जनजागृती व्हावी यासाठी महावितरणच्या वतीने दीक्षाभूमी परिसरात विशेष माहिती केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या केंद्राचे उद्घाटन सोमवारी (१९ ऑक्टोबर) नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते दिक्षाभुमी उपकेंद्राच्या प्रांगणात पार पडले.

दीक्षाभूमीवर दरवर्षी भरणाऱ्या या महासंगमात हजारो भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, प्रशासकीय स्तरावर यंदा वीज ग्राहकांशी थेट संवाद साधण्याचा हा एक आगळावेगळा प्रयत्न करण्यात आला आहे. यावेळी मुख्य अभियंता व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध योजनांच्या माहिती पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्यास नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे, नागपूर ग्रामीण मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, काँग्रेसनगर विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल जीवतोडे, महाल विभागाचे कार्यकारी अभियंता डॉ. गजानन जयस्वालम सिव्हील लाईन्स विभागाचे कार्यकारी अभियंता धम्मदिप फुलझले आणि बुटीबोरी विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत टेंभेकर यांचेसह सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता हेमराज ढोके, महावितरणचे अनेक अभियंते, अधिकारी, कर्मचारी, भोजनदान व पुस्तक वितरण समितीचे सदस्य आणि विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात अमरदिप बागडे यांच्या प्रास्ताविकाने झाली, सूत्रसंचालन पांडूरंग कुकडे यांनी केले तर आभार प्रदर्शन राजेश पोफळी यांनी मानले.

दोन दिवस चालणाऱ्या या माहिती केंद्राच्या माध्यमातून महावितरणतर्फे पर्यावरणपूरक सौर ऊर्जेलां प्रोत्साहन देणाऱ्या आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसार केला जात आहे. यामध्ये विशेषतः घरगुती ग्राहकांसाठी अतिशय लाभदायक ठरणारी 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना', राज्य सरकारची 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना', शेतकऱ्यांच्या समृद्धीचा मार्ग सुकर करणारी 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' आणि 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' यांसारख्या महत्त्वाच्या योजनांसह विद्युत सुरक्षेसाठी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहिती दिली जात आहे. नागरिकांना या तांत्रिक बाबी आणि योजना चटकन समजून घेता याव्यात, यासाठी आकर्षक माहितीपत्रके, पोस्टर्स, बॅनर्स आणि हकश्राव्य (ऑडिओ-व्हिज्युअल) माध्यमातून माहिती दाखवण्याची सोय करण्यात आली आहे.

या उपक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, केवळ योजनांची माहिती देणे हा नसून दैनंदिन जीवनात वीज वापरताना कोणती काळजी घ्यावी, पावसाळ्यात किंवा उन्हाळ्यात वीज अपघात कसे टाळावेत याविषयीची 'विद्युत सुरक्षा' लोकांपर्यंत पोहोचवली जात आहे. याचबरोबर, महावितरणचे डिजिटल मोबाईल ॲप आणि ऑनलाईन बिल भरणा प्रणालीचा वापर कसा करावा, याचे प्रत्यक्ष मार्गदर्शनही येथील कर्मचाऱ्यांकडून नागरिकांना मिळत आहे.

दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या जास्तीत जास्त वीज ग्राहकांनी आणि नागरिकांनी या माहिती केंद्राला आवर्जून भेट द्यावी आणि महावितरणच्या विविध डिजिटल सेवा व लोककल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

अंबाझरी परिसरासह इतर ठिकाणी मनपाद्वारे अनुयायांसाठी स्नानगृहांची व्यवस्था

७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी परिसरात मनपाच्या विविध नागरी सुविधा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

७०व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने विविध नागरी सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. अनुयायांना आवश्यक सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात आले असून, दीक्षाभूमी परिसरासह अंबाझरी तलाव परिसरातही स्नानगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. अंबाझरी तलाव परिसरात उभारण्यात आलेल्या स्नानगृहांची मोठ्या संख्येने अनुयायांकडून लाभ घेतला जात असून, मनपाच्या वतीने करण्यात आलेल्या नागरी व्यवस्थेबद्दल अनुयायांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, अनुयायांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देतानाच पर्यावरणाचे संरक्षण आणि तलावाची स्वच्छता अबाधित ठेवण्यावरही मनपाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. अंबाझरी तलाव परिसरातील स्नानगृहांची व्यवस्था महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्रपणे करण्यात आली असून, अनुयायांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुविधाजनक वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मोठ्या संख्येने नागपूर शहरात येणाऱ्या अनुयायांना आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मनपाचे अधिकारी व कर्मचारी विविध ठिकाणी कार्यरत आहेत. यासोबत अनुयायांना येणाऱ्या अडचणी आणि समस्येच्या समाधानासाठी मनपाच्या वतीने २४ तास उपलब्ध असे नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. ज्याच्या मदतीने नागरिकांच्या समस्या सोडवता येत आहे. नागरिक व अनुयायांनी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांचा वापर करून परिसराची स्वच्छता राखण्यास सहकार्य करावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.


गुरूवार २२ ऑक्टोबर सायंकाळ पर्यंत मुलभुत व अत्यावश्यक सोयी सुविधा पुरविल्या जाणार आहेत. दीक्षाभूमी परिसराच्या ठिकाणी व समोवताल (दीक्षाभूमी ते लॉ कॉलेज परिसर, डॉ. पंजाबराव देशमुख विद्यापिठ परिसर, आय.टी.आय. परिसर, माता कचेरी परिसर, जेल परिसर) येथे एकूण १०५५ शौचालयाच्या सिट्स तसेच अंबाझरी तलावाच्या पायथ्याशी १८० शौचालयाच्या सिट्स व बेझनबाग व उंटखाना मैदानात ४० शौचालयाच्या सिटस् अशा एकूण १२८५ शौचालयाच्या सिटस् उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

उखर्डा ते उखर्डा पाटी रस्त्याची दयनीय अवस्था; लोकप्रतिनिधी अन् प्रशासनाच्या 'कुंभकर्णी' कारभारावर ग्रामस्थ संतप्त!

आंदोलने करूनही जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम वरोरा उपविभाग गेंड्याच्या कातडीचा; अभिजित कुडे यांचा आक्रमक इशाऱ्यासह एल्गार!

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे

वरोरा तालुक्यातील उखर्डा ते उखर्डा पाटी रस्त्याची अत्यंत भीषण आणि दयनीय अवस्था झाली असून संपूर्ण रस्ता खड्डेमय झाला आहे. रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता, अशी स्थिती निर्माण झाली असून हा रस्ता मुख्य मार्ग आहे की एखादी शेतातली पांदण वाट, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या मार्गावरील खड्ड्यांमुळे दररोज छोटे-मोठे अपघात घडत असून प्रवाशांना कंबरदुखीसह प्रचंड शारीरिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या ५ ते ६ वर्षांपासून या रस्त्याची सातत्याने दुरवस्था झालेली आहे. तरीही गेंड्याच्या कातडीचे जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग



प्रशासन कुंभकर्णी झोपेत असलेले लोकप्रतिनिधी याकडे साफ दुर्लक्ष करत आहेत. लोकप्रतिनिधींना सामान्य जनतेच्या जिवाची साधी पर्वा उरलेली नाही, असा जोरदार आरोप करत युवा नेते अभिजित कुडे यांनी प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

विविध आंदोलने करूनही प्रशासन बेफिकीर

या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आजवर भजन आंदोलन, दिवे लावा आंदोलन, रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये झाडे लावा आंदोलन आणि प्रशासनाची झोप उडवण्यासाठी 'झोपा काढून' आंदोलन अशा अनेक नाविन्यपूर्ण व तीव्र मागार्ने आंदोलने करण्यात आली. स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला वारंवार निवेदने दिली, तरीही सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित अधिकारी डोळ्यावर झापडे ओढून बसले आहेत.

कामगार अन् विद्यार्थ्यांचे हाल; संतापाचा उद्रेक!

हा रस्ता या परिसरातील अत्यंत महत्त्वाचा मुख्य मार्ग आहे. या रस्त्यावरून दररोज मोठ्या संख्येने नागरिक, शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि स्थानिक कंपन्यांमध्ये कामाला जाणारे कामगार ये-जा करतात. परंतु खड्डेमय रस्त्यामुळे कंपनीत जाणाऱ्या तरुणांना आणि नागरिकांना नाहक भयंकर त्रास सहन करावा लागत आहे. खासदार असोत वा आमदार, सर्वच लोकप्रतिनिधी या समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून झोपेचे सोंग घेत आहे.

"गेल्या ६ वर्षांपासून उखर्डा परिसरातील जनता या नरकयातना सहन करत आहे. प्रशासनाला लोकांच्या प्राणाची किंमत राहिलेली नाही का? आम्ही शांततेच्या मार्गाने निवेदने दिली, सर्व प्रकारची आंदोलने केली. मात्र आता नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. यापुढे आम्ही एकही दिवस हा अन्याय सहन करणार नाही. जर तातडीने या रस्त्याचे पक्के काम सुरू झाले नाही, तर लोकप्रतिनिधी आणि बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना रस्त्यावर उतरून गाठू व लोकशाही मार्गाने तीव्र धडा शिकवू!"

- शेतकरी नेते अभिजित कुडे

रस्त्याची ही भीषण अवस्था पाहता आता उखर्डा परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड संतापाची लाट पसरली आहे. प्रशासन आतातरी कुंभकर्णी झोपेतून जागे होऊन या रस्त्याचे काम हाती घेणार की आणखी एखाद्या मोठ्या अपघाताची प्रतीक्षा करणार, असा परखड सवाल जनता विचारत आहे.

सिनियर भोंसला पॅलेस येथे नवमीनिमित्त पारंपरिक शस्त्र, अश्व व वाहन पूजन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

श्रीमंत राजे भोसले घराण्याच्या ऐतिहासिक व पराक्रमी परंपरेचे जतन करत, महाल येथील राजे मुधोजी भोसले यांच्या ऐतिहासिक सिनियर भोंसला पॅलेस येथे नवमीचा सण अत्यंत मंगलमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विजयादशमीच्या पूर्वसंध्येला साजरा होणाऱ्या या पावन पर्वावर राजघराण्याच्या परंपरेनुसार विधीवत शस्त्रपूजन, अश्वपूजन आणि वाहनपूजन मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाले.

भोसले घराण्याचे सर्व वाहने, ऐतिहासिक तलवारी, ढाल, भाले, बंदुका व विविध पारंपरिक शस्त्रास्त्रांची वैदिक मंत्रोच्चारात पूजा करण्यात आली. सैनिकी व शौचार्ची परंपरा जपत घराण्यातील मानाच्या अश्वांचे (घोडे) पूजन करून त्यांना नैवेद्य अर्पण करण्यात आला. "श्रीमंत छत्रपती राजे शिवाजी महाराज भोसले आणि श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले यांच्या समृद्ध शौर्य परंपरेचे स्मरण करून देणारा हा उत्सव आहे. नवमी आणि विजयादशमी हे केवळ सण नसून आपल्या स्वाभिमान, सामर्थ्य आणि समृद्ध संस्कृतीचे प्रतीक आहेत. ही गौरवशाली परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे."

धानावरील कीड व रोगामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्या!

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सालेकसाच्यावतीने निवेदन

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

तालुक्यातील धान पिकावर कीड व विविध रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत नुकसानभरपाई देण्यात यावी, तसेच पीक विमा न काढलेल्या शेतकऱ्यांनाही राज्य शासनाकडून तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तालुका सालेकसाच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात १७ ऑक्टोबर २०२६ रोजी गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेले महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन सादर करण्यात आले.

सालेकसा तालुका हा धान उत्पादक तालुका म्हणून ओळखला जात असून, येथील बहुतांश शेतकरी धान पिकावर अवलंबून आहेत. मात्र, बदलत्या हवामानामुळे धान पिकावर विविध कीड व रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. पीक वाचविण्यासाठी शेतकरी वारंवार औषधांची फवारणी करीत आहेत. तरीही



रोगांवर नियंत्रण मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. महागड्या औषधांच्या फवारणीमुळे त्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली असून, आगामी हंगामातील धान उत्पादनात घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत विमा काढलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांचा शेताचे तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश संबंधित विमा कंपनी व विभागाला देण्यात यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच पीक विमा न काढलेल्या शेतकऱ्यांनाही शासनाने विशेष आर्थिक मदत द्यावी. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी करावी, योग्य पंचनामे करावेत आणि बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी विनंती करण्यात आली.

धान पिकावरील रोगांच्या प्रादुर्भावांमुळे शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेली गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले.

या मागण्यांची दखल घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन आवश्यक निर्णय घेण्यात येईल, अशी हमी दिल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

सदर निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोणे, तालुका महिला अध्यक्ष गीताताई चौधरी, ज्येष्ठ कार्यकर्ते रघुदास नागपुरे, तालुका युवती अध्यक्ष सुषमाताई राऊत, तालुका उपाध्यक्ष दिलीप ढेकवार, तालुका युवक उपाध्यक्ष ध्रुवकुमार हुकरे आणि ऋषी बैस यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

थोडक्यात

यूथ सोशल ग्राम फाउंडेशनच्या राष्ट्रीय कार्यकारी समिती सदस्यपदी रुपेश कुतरमारे

दे. सिंहवाणी वृत्त, वरोरा -धर्मेंद्र शेरकुरे

यूथ सोशल ग्राम फाउंडेशनच्या राष्ट्रीय कार्यकारी समिती सदस्यपदी रुपेश पांडुरंग कुतरमारे यांची निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीमुळे बोपापूर गावासह वरोरा तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



रुपेश कुतरमारे यांनी मागील वर्षभरात विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत सामाजिक बांधिलकी जपली आहे. मागील वर्षी त्यांची राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून निवड झाली होती. या गौरवामुळे त्यांच्या सामाजिक कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली गेल्याचे अधोरेखित झाले आहे.समाजातील ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर आणि आपुलकी व्यक्त करण्यासाठी 'होली विथ ओल्ड एज' यांसारख्या उपक्रमांत सहभाग, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण, स्वच्छतेबाबत जनजागृती, गरजू व्यक्तींना मदत आणि युवकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांवर त्यांनी भर दिला आहे.

यूथ सोशल ग्राम फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवकांना सामाजिक कार्यासाठी प्रोत्साहित करणे, पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणे आणि समाजविकासाच्या उपक्रमांना चालना देणे, हा त्यांच्या कार्याचा प्रमुख उद्देश आहे. मागील वर्षी राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून झालेली निवड आणि आता राष्ट्रीय कार्यकारी समिती सदस्यपदी मिळालेली जबाबदारी, यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याच्या प्रवासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल मित्रपरिवार, सामाजिक क्षेत्रातील सहकारी आणि परिसरातील नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळाल्याने बोपापूर गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याची भावना व्यक्त होत आहे.

निसर्गातील प्रत्येक जीव महत्वाचा आहे : प्रा . महादेव गावंडे



दे. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर

पृथ्वीवरील पर्यावरण व परिसंस्थेचा समतोल राखण्यासाठी पक्षी व प्राणी अत्यंत महत्त्वाचे असून त्यांच्याशिवाय मानवी जीवनाची आणि निसर्गाची कल्पना करणे अशक्य आहे. राष्ट्रसंताची सामुदायिक प्रार्थना केवळ मानवासाठी नसून सृष्टीतील प्रत्येक जीवाच्या कल्याणासाठी केलेली आराधना होय,आपला घरोघरी,गावोगावी,नगरानगरात प्रार्थना संकल्प उत्तम असून आता पशु पक्ष्यांना वाचविण्याचा संकल्प करा असे प्रतिपादन राजमाता जिजाऊ नागरी पतसंस्थेचे मार्गदर्शक प्रा. महादेव गावंडे यांनी सामुदायिक प्रार्थनेत केले.

गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात विविध ठिकाणी ५१ सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून यावेळी मनोज बाबाराव गावंडे यांच्या निवासस्थानी सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या घेण्यात आली यावेळी तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे,ज्येष्ठ मार्गदर्शक नारायण पवार,दशरथ सोनटक्के, सारंग अडसड, गजानन चव्हाण, मोहन नागपूरकर,जितेंद्र किन्हेकर मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला स्मिता धमाळें यांच्या आदेशावरून शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली यावेळी प्रार्थनेचे महत्व विषद करतांना प्रा. गावंडे म्हणाले की संतांच्या जीवन कार्यात त्यांनी पशुपक्ष्यांना आपले समजून प्रेम दिलेले आढळते आज मोबाईल रेडिएशन,टॉवर्स व त्यांच्याशी संबंधित भौतिक कारणामुळे पक्ष्यांच्या जीवनावर घातक परिणाम होत आहे पाण्याच्या भीषण टंचाईने हिंस्त्र पशु गावात येत आहेत यावर उपाय म्हणून वृक्षावर व बंधाऱ्यावर पाण्याची व्यवस्था करण्याचा संकल्प करून कृतीत आणू यावेळी त्यांनी संत महापुरुष यांचे ग्रंथातील ओवींच्या आधारे अनमोल मार्गदर्शन केले.

त्यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला हार्मोनियम अशोक भगत महाराज,शिवलिंग पटवे,नरेंद्र गेडाम,यशवंत भगत, किशोर पवार तबला अनिल अस्वार, मधुकर आजमिरे,किशोर राऊत,खेंजिरी सुरेश कदम साथसंगत पुंडलिक भालेराव, पंजाब गडदे,श्यामराव देशमाने, कैलास मस्के,संजय हटकर, गजानन गव्हाणकर,सुधाकर कपटे,गजानन चव्हाण,माधव गव्हाणे,सतीश चव्हाण,विनोद पवार,साहेबराव सरकटे,सुभाष जाधव महिला प्रतिनिधी कमल गडदे,मुक्ता काळबांडे,आशा माने, रंजना किन्हेकर, विद्या पुरी,आशा रुद्राक्षवार,शोभा सोनारे,प्रीती गावंडे, शांता कदम,वनिता गेडाम, निलेश कदम, प्रीती कदम,आज्ञा कदम,भुवनेश्वरी व गिरिजा गावंडे यांनी केली. अल्पोपहार महाआरती राष्ट्रवंदना जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली यावेळी असंख्य स्त्री पुरूष आबालवृद्ध मोठया संख्येने उपस्थित होते.

'बुद्धं शरणं गच्छामि'च्या मंगलघोषात जपानी अनुयायांनी घेतली धम्म दीक्षा

जयभीमच्या घोषणांनी दुमदुमली दीक्षाभूमी, तीन हजारांवर अनुयायांनी स्वीकारली धम्मदीक्षा

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

'बुद्धं शरणं गच्छामि... धम्मं शरणं गच्छामि... संघं शरणं गच्छामि..."चा मंगलस्वर आणि त्याला मिळणारा 'जयभीम..."चा घोषणांचा प्रतिसाद... महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक धम्मक्रांतीची साक्षीदार असलेली दीक्षाभूमी सोमवारी पुन्हा एकदा धम्ममय झाली. या वातावरणात जपानहून आलेल्या २० अनुयायांनी तथागत गौतम बुद्धांच्या धम्माची दीक्षा स्वीकारली.



सातासमुद्रापारच्या या अनुयायांचा धम्मस्वीकार सोमवारच्या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरला. सायंकाळपर्यंत देश-विदेशातील तीन हजारांहून अधिक अनुयायांनी धम्मदीक्षा घेतली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी आणि अखिल भारतीय भिक्खू संघाच्या संयुक्त सहकार्याने रविवारपासून तीन दिवसीय धम्मदीक्षा सोहळ्याला प्रारंभ झाला. सोमवारी दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच विविध राज्यांतील उपासक-उपासिका आणि अनुयायांची पावले दीक्षाभूमीकडे वळली. हात जोडून त्रिशरण-पंचशील ग्रहण करणाऱ्या जपानी अनुयायांनी विशेष लक्ष वेधून घेतले. त्यांनी भिक्खू संघाच्या उपस्थितीत धम्मदीक्षा स्वीकारली.

दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेनानायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या बुद्धवंदनेने सोहळ्याची सुरुवात झाली. त्यानंतर दिवसभर भिक्खू संघाकडून अनुयायांना धम्मदीक्षा देण्यात आली. त्रिशरण, पंचशील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे ग्रहण करण्यात आले. 'बुद्धं शरणं गच्छामि'च्या मंगलघोषात मिसळणाऱ्या 'जयभीम'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून गेला. सायंकाळी पाच वाजेपर्यंत तीन हजारांहून अधिक अनुयायांनी धम्माचा स्वीकार केला. आवश्यक नोंदणीनंतर दीक्षार्थींना प्रमाणपत्रांचेही वाटप करण्यात आले.

सोहळ्यात भंते नागसेन, भंते प्रज्ञाबोधी, भंते धम्मविजय, भंते महानाग, भंते कुमारकश्यप, भंते धम्मप्रकाश, भंते नागप्रकाश, भंते नागानंद, भंते धम्मपाल, भंते बुद्धदीप, भंते कुशीनागा आणि भंते अनुत्तरबोधी यांच्यासह भिक्खू संघातील मान्यवर सहभागी झाले.

जपानच्या विद्यापीठात बाबासाहेबांचा पूर्णाकृती पुतळा

जपानच्या भदंत युक्यो यांचे दीक्षाभूमीवर गौरवोद्गार, कोयासान विद्यापीठात विद्यार्थ्यांना दिली जाते बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीची ओळख, आंतरराष्ट्रीय धम्म परिषदेत भारत-जपानच्या भिक्खूंचे विचारमंथन

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडविलेल्या धम्मक्रांतीचा जागर आता जपानच्या विद्यापीठातही होत आहे. जपानच्या कोयासान विद्यापीठाच्या प्रांगणात बाबासाहेबांचा पूर्णाकृती पुतळा उभा असून, तेथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना या महामानवाने भारतात बुद्ध धम्माचे चक्र पुन्हा कसे गतिमान केले, याची ओळख आवर्जून करून दिली जाते. ह्याभारतात आज बुद्ध धम्माचे जे अस्तित्व आणि व्यापक स्वरूप दिसते, त्यामागे डॉ. आंबेडकरांचे अतुलनीय योगदान आहे, अशा शब्दांत जपानचे भदंत युक्यो यांनी दीक्षाभूमीवर बाबासाहेबांच्या



कार्याचा गौरव केला.

७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला दीक्षाभूमीवर आयोजित आंतरराष्ट्रीय धम्म परिषदेत भदंत युक्यो बोलत होते. अध्यक्षस्थानी दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई होते. साएकी युकाई, नागासाकी, तामिळनाडूचे भंते बोधी धम्म, चेन्नईचे राहुल आनंद, डोंगरगढचे भंते कुमार कश्यप आणि ॲड. किशोर कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भदंत ससाई यांच्यामुळे आम्हाला डॉ. आंबेडकर समजले, असे सांगत भदंत युक्यो म्हणाले, भारतात आल्यानंतर बाबासाहेबांचे कार्य आणि त्यांच्या विचारांची व्यापकता जवळून जाणून घेता आली. आम्ही त्यांच्या विचारांचा स्वीकार केला आहे. आता कोयासान विद्यापीठात धम्माच्या अध्ययनासोबत बाबासाहेबांच्या विचारांची बीजेही विद्यार्थ्यांमध्ये रुजविली जात आहेत. विद्यापीठात अन्य विषयांबरोबर बौद्ध धर्माचेही शिक्षण दिले जाते.

परिषदेत भदंत ससाई यांनी बुद्ध धम्माच्या वाटचालीवर मार्गदर्शन केले. विविध देश आणि राज्यांतून आलेल्या मान्यवरांनी तथागत गौतम बुद्धांचा मानवतावादी संदेश, धम्माचे विविध पैलू आणि आजच्या अस्थिर जगात त्याची वाढती प्रासंगिकता सांगितली. जपानी भाषेतील भाषणाचा हिंदी आणि मराठीत अनुवाद आंबेडकरी विचारवंत तथा बौद्ध धर्माचे अभ्यासक डॉ. एस. के. गजभिये यांनी केला. संचालनाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली.

राज्यस्तरीय विज्ञान-गणित प्रदर्शनात एकलव्य मोखाडा व पिंपरी अव्वल, खैरी-परसोडा येथे बक्षीस वितरण उत्साहात



दे. सिंहवाणी वृत्त, रामटेक

खैरी-परसोडा, ता. रामटेक (नागपूर) - नेस्ट व महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय विज्ञान व गणित प्रदर्शन २०२६-२७, एकलव्य मॉडेल रेसिडेन्सी स्कूल, खैरी-परसोडा येथे दि. १७ ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रदर्शनात राज्यभरातील ४० एकलव्याचा विद्यार्थींनी उत्कृष्ट विज्ञान प्रकल्प सादर करण्यात आले.

स्पर्धेचा अंतिम निकाल पुढीलप्रमाणे : ज्युनियर गट - प्रथम : एकलव्य स्कूल, मोखाडा - द्वितीय : एकलव्य स्कूल, पेठ रोड तर सिनिअर गट - प्रथम : एकलव्य स्कूल, पिंपरी- द्वितीय : एकलव्य स्कूल, डहाणू यांचा समावेश आहे. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षीस देऊन अभिनंदन करण्यात आले. या यशाबद्दल सर्व विजेत्या शाळांचे राज्यभरात कौतुक होत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्या रूपा बोरेकर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

धम्मध्वजारोहणाने दीक्षाभूमीवर धम्मपर्वाचा मंगलारंभ

समता सैनिक दलाच्या शिस्तबद्ध उपस्थितीत कार्यक्रम, भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत बुद्धवंदना



दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक धम्मक्रांतीची साक्ष देणाऱ्या दीक्षाभूमीवर सोमवारी सकाळी धम्मध्वज फडकताच ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमांचा मंगलारंभ झाला. समता सैनिक दलाच्या शिस्तबद्ध उपस्थितीत आणि भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याने दीक्षाभूमीवरील वातावरण धम्ममय झाले. ध्वजारोहणानंतर बुद्धवंदना घेण्यात आली. तथागत गौतम बुद्धांचा समता, करुणा आणि मानवमुक्तीचा संदेश जगभर पोहोचविणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या मुख्य सोहळ्याला मंगळवारी दीक्षाभूमीवर लाखो अनुयायी उपस्थित राहणार आहेत. तत्पूर्वी सोमवारी सकाळी धम्मध्वजारोहण करण्यात आले. त्यामुळे दीक्षाभूमीवरील विविध कार्यक्रमांना विधिवत सुरुवात झाली.

समता सैनिक दलाचे सैनिक शिस्तबद्ध पद्धतीने या प्रसंगी उपस्थित होते. भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत धम्मध्वज फडकविण्यात आला. त्यानंतर उपस्थित भिक्खू संघ आणि अनुयायांनी बुद्धवंदना केली. शांत आणि मंगल वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे दीक्षाभूमी परिसरात धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या उत्सवाची अनुभूती अधिक गडद झाली. यावेळी भिक्खू संघातील भंते प्रज्ञाबोधी यांच्यासह विविध भंते, समता सैनिक दलाचे पदाधिकारी व सैनिक उपस्थित होते.

लाल तोंडाच्या माकडाची सुखरूप सुटका!

उमरेडच्या डॉ आंबेडकर कॉलनी येथील घटना, वन्यजीव रक्षकांची तत्परता, वैद्यकीय तपासणी व उपचारांसाठी माकड वनविभागाच्या ताब्यातून उपचार केंद्राकडे रवाना

दे. सिंहवाणी वृत्त, उमरेड

उमरेड शहरातील डॉ आंबेडकर कॉलनी परिसरात अचानक आढळून आलेल्या लाल तोंडाच्या माकडाची वन्यजीव रक्षकांनी तत्परता दाखवत सुखरूप सुटका केली. रीसस मॅकाक या जातीच्या माकडाला पुढील वैद्यकीय तपासणी व उपचारांसाठी वनविभागाच्या माध्यमातून संक्रमण उपचार केंद्राकडे रवाना करण्यात आले आहे.



आंबेडकर कॉलनी परिसरात माकड आढळल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिल्यानंतर वन्यजीव रक्षक सौरभ भोयर, गौरव सोनडवले, जय राऊत आणि नकुल माहूरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांची सुरक्षितता आणि माकडाला कोणतीही इजा होऊ नये, याची काळजी घेत त्यांनी ही मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली.

उमरेड शहर आणि परिसरातील स्थानिक जंगलात लाल तोंडाची ही माकडे सर्वसाधारणपणे आढळत नसल्याने हे माकड येथे कसे आले, याबाबत उत्सुकता व्यक्त होत आहे. एखाद्या मालवाहू वाहनातून प्रवास करताना किंवा अन्नाच्या शोधात ते या परिसरात आले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी व्ही. अंबटकर, वनरक्षक शुभम बेले आणि विनोद रेवतकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही सुटका मोहीम राबविण्यात आली.

माकडाला सुरक्षितपणे ताब्यात घेतल्यानंतर त्याच्या आरोग्याची तपासणी करून पुढील उपचार आणि पुनर्वसनासाठी संक्रमण उपचार केंद्राकडे पाठविण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर योग्य ती काळजी घेऊन त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

या बचावकार्यात वन्यजीव रक्षकांनी दाखविलेली तत्परता, सतर्कता आणि समन्वय यामुळे संभाव्य धोका टाळण्यात यश आले. वन्यप्राण्यांना नागरी वस्तीत पाहिल्यास नागरिकांनी स्वतःहून त्यांना पकडण्याचा प्रयत्न न करता वनविभागाला त्वरित माहिती द्यावी असे आवाहन करण्यात आले.

बोरीत ५४ वर्षांत पहिल्यांदाच पाझर तलाव कोरडा

महाराष्ट्रात १९७२ साली उद्भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिंतूर तालुक्यातील सर्वात मोठी लोकसंख्या असलेल्या बोरी येथे १९७२ साली सरकारने पाझर तलावाची निर्मिती केली होती. प्रत्येक पावसाळ्यात हा पाझर तलाव भरताच परिसरातील विहीर, हातपंपाची पाणीपातळी वाढण्यास मदत होत होती. परंतु यावर्षी अलनिनोच्या प्रभावामुळे सरासरीपेक्षा अतिशय कमी पाऊस झाल्यामुळे ५४ वर्षात पहिल्यांदाच हा पाझर तलाव ऐन पावसाळ्यात कोरडा पडला असून बोरीकरांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येणार आहे.

या पाझर तलावात असलेल्या दुष्काळी विहीरीत सध्या एक महिनाभर पुरेल एवढा पाणीसाठा आहे. त्यानंतर नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने त्वरीत उपाययोजना कराव्यात अशी मागणी बोरीतील नागरिकांमधून जोर धरत आहे.

मतदानाचा हक्क बजावण्यासाठी शुक्रवारी विशेष नैमित्तिक रजा

खाजगी आस्थापनातील मतदारांसाठी चार तासाची सवलत

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघासाठी शुक्रवार दिनांक २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी विशेष नैतिक रजा देण्यात आली आहे. खाजगी आस्थापनामध्ये काम करणाऱ्या मतदारांना मतदानासाठी चार तासाची विशेष सवलत देण्यात येणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती विजयालक्ष्मी बिदरी यांनी आज दिली.

भारत निवडणूक आयोगाने नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी शुक्रवार दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ ते चार वाजेपर्यंत मतदान होणार आहे. सामान्य प्रशासन विभागातर्फे मतदारांनी मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी मतदार असलेल्या व्यक्तीला विशेष नैतिक रजा जाहीर केली आहे. ही रजा त्यांच्या अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजेव्यतिरिक्त असणार आहे.

खाजगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी दोन ऐवजी चार तासाची विशेष सवलत देण्यात आली आहे.

किट्समध्ये दसरा पूजन उत्साहात संपन्न

दे. सिंहवाणी वृत्त, रामटेक : कविकुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स (किट्स), रामटेक येथे दसऱ्याच्या पूर्वसंध्येला विविध विभागांमध्ये दसरा पूजन करण्यात आले. मुख्य पूजन मेकॅनिकल विभागाच्या कार्यशाळेत पार पडले. यावेळी संस्थेचे प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



भारतीय संस्कृतीत दसरा सणाला विशेष महत्त्व असून, या निमित्ताने शस्त्र पूजा करण्याची परंपरा आहे. पूजन कार्यक्रमाला संस्थेतील विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक तसेच कर्मचारी उपस्थित होते. धार्मिक वातावरणात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ. यशवंत जिभकाटे यांचे मार्गदर्शन मध्ये प्राध्यापक व टेक्निकल कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

शब्दवेली

साहित्य विशेष

दैनिक
सिंहवाणी वृत्त

१० दिनांक : मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com

Epaper : epaper.sinhvani.com

बुद्धाच्या धम्मात बाबासाहेबांना दिसलेला समतेचा भारत

मनिषा कांबळे,
यवतमाळ



धर्म माणसाला मोठे करतो की माणसामाणसांत उंच-नीचतेच्या भिंती उभ्या करतो? धर्माच्या नावावर माणसाचा सन्मान हिरावून घेतला जात असेल, तर त्या व्यवस्थेकडे प्रश्न विचारण्याचा अधिकार माणसाला नाही का? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनप्रवासाकडे पाहताना हे प्रश्न अपरिहार्यपणे समोर येतात. कारण बाबासाहेबांचे धर्मातर हा केवळ श्रद्धेचा विषय नव्हता; तो मानवी प्रतिष्ठा, सामाजिक न्याय आणि समतेच्या मूल्यांशी जोडलेला ऐतिहासिक निर्णय होता. त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला, तो एका अन्यायकारक सामाजिक वास्तवाला पर्याय शोधण्यासाठी आणि माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार अधोरेखित करण्यासाठी.

बाबासाहेबांच्या धर्मांतराकडे केवळ धार्मिक घटनेच्या चौकटीतून पाहिले, तर त्या निर्णयामागील व्यापक सामाजिक आशय दुर्लक्षित राहील. त्यासाठी त्यांच्या संघर्षाचा, वैचारिक प्रवासाचा आणि त्यांनी उभ्या केलेल्या समतेच्या तत्त्वज्ञानाचा मागोवा घेणे आवश्यक आहे.

धर्मांतरामागे होती स्वाभिमानाची भूमिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीय विषमता आणि अस्पृश्यतेचे वास्तव स्वतः अनुभवले. उच्च शिक्षण, असामान्य बुद्धिमत्ता आणि विद्वत्ता असूनही जन्माच्या आधारावर माणसाला दुय्यम ठरवणारी व्यवस्था त्यांनी जवळून पाहिली. सार्वजनिक पाणवठ्यापासून शिक्षणाच्या संधींपर्यंत आणि सामाजिक व्यवहारांपासून मानवी प्रतिष्ठेपर्यंत अनेक क्षेत्रांत भेदभाव सहन करावा लागणाऱ्या समाजाच्या वेदना त्यांना माहीत होत्या.

मात्र बाबासाहेबांनी या वेदनांना केवळ वैयक्तिक दुःख म्हणून स्वीकारले नाही. त्यांनी त्या सामाजिक व्यवस्थेचे विश्लेषण केले आणि परिवर्तनासाठी संघर्ष उभारला. शिक्षण, संघटन, राजकीय प्रतिनिधित्व, कायदेशीर हक्क आणि सामाजिक चळवळींच्या माध्यमातून त्यांनी वंचित समाजाला स्वाभिमानाची जाणीव करून दिली. १९३५ मध्ये येवला येथे झालेल्या परिषदेत त्यांनी हिंदू धर्मात मरणार नसल्याची ऐतिहासिक घोषणा केली. या घोषणेमागे क्षणिक भावनिक प्रतिक्रिया नव्हती. अनेक वर्षांच्या अनुभवातून, चिंतनातून आणि विविध धर्मांच्या अभ्यासातून आकाराला आलेली ती भूमिका होती. बाबासाहेबांसाठी धर्मांतर म्हणजे केवळ धर्माचे नाव बदलणे नव्हते. माणसाच्या प्रतिष्ठेला नाकारणाऱ्या सामाजिक चौकटीतून बाहेर पडून समता आणि विवेकाला महत्त्व देणारा मार्ग स्वीकारणे, हा त्यामागील मूलभूत विचार होता.

बुद्धाच्या धम्मात दिसलेला विवेकाचा प्रकाश

बाबासाहेबांनी विविध धर्मांचा अभ्यास केला. त्यांना असा जीवनमार्ग हवा होता, जो माणसाला विचार करण्याचे स्वातंत्र्य देईल, नैतिकतेला महत्त्व देईल आणि सामाजिक विषमतेला मान्यता देणार नाही. प्रदीर्घ अभ्यासानंतर त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करण्याचा निर्णय घेतला. बुद्धाच्या शिकवणीत प्रज्ञा, करुणा आणि शील यांना महत्त्वाचे स्थान आहे. विवेकाने विचार करणे, इतरांच्या दुःखाची जाणीव ठेवणे आणि आपल्या आचरणाला नैतिक अधिष्ठान देणे, ही या मूल्यांची मध्यवर्ती भूमिका आहे. बाबासाहेबांना बुद्धाच्या धम्मात केवळ वैयक्तिक शांततेचा मार्ग दिसला नाही; तर सामाजिक परिवर्तनाची शक्यताही दिसली. त्यांच्या विचारविश्वात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही केवळ राजकीय घोषणा नव्हती. ती मानवी संबंधांचा पाया बनली पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. त्यांच्या बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथातून बुद्धाच्या जीवनाचा आणि धम्माचा त्यांनी केलेला अभ्यास व विश्लेषण समोर येते. बुद्धाच्या शिकवणीचा सामाजिक अर्थ स्पष्ट करण्याचा त्यांचा प्रयत्न या ग्रंथात दिसतो.

बाबासाहेबांच्या दृष्टीने माणसाच्या जीवनात विवेकाला स्थान असणे आवश्यक होते. समाजातील अन्यायाला परंपरेचा आधार आहे म्हणून तो योग्य ठरत नाही. एखादी गोष्ट दीर्घकाळ चालत आली आहे म्हणून ती न्याय्य ठरत नाही. तिची चिकित्सा केली पाहिजे, तिचे मानवी परिणाम तपासले पाहिजेत आणि माणसाच्या प्रतिष्ठेला केंद्रस्थानी ठेवून तिचे मूल्यमापन केले पाहिजे. हीच विवेकशील भूमिका त्यांच्या धम्मस्वीकारामागे महत्त्वाची होती.

दीक्षाभूमीवर घडलेला इतिहास

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर बाबासाहेबांनी भदंत चंद्रमणी यांच्या हस्ते बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यानंतर त्यांनी उपस्थित अनुयायांना धम्मदीक्षा दिली आणि बावीस प्रतिज्ञांचा स्वीकार करवून घेतला. या सोहळ्यात लाखो लोक सहभागी झाले होते. या ऐतिहासिक घटनेने भारतीय समाजजीवनात नवे पर्व सुरू झाले. दीक्षाभूमीवर जमलेला जनसमुदाय केवळ धार्मिक विधीसाठी एकत्र आला नव्हता. त्या ऐतिहासिक निर्णयामध्ये सामाजिक प्रतिष्ठेची आकांक्षा, स्वाभिमानाची जाणीव आणि नव्या जीवनदृष्टीचा स्वीकार सामावलेला होता. बावीस प्रतिज्ञांमधून बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना बौद्ध धम्माशी निष्ठा राखण्याचा, जातिभेदाला आधार देणाऱ्या समजुतींचा त्याग करण्याचा आणि नव्या मूल्यांनुसार जीवन जगण्याचा मार्ग दाखवला. या प्रतिज्ञांचा अर्थ केवळ त्या दिवशी उच्चारलेल्या शब्दांपुरता मर्यादित नाही. त्यांचा आशय दैनंदिन जीवनात किती उतरतो, यावर त्यांचे महत्त्व ठरते. धम्मदीक्षा घेणे ही एक ऐतिहासिक सुरुवात होती; त्या विचारांनुसार जीवन घडवणे ही पुढची जबाबदारी होती.

दीक्षाभूमी म्हणूनच केवळ स्मारक नाही. ती एका ऐतिहासिक परिवर्तनाची साक्ष आहे. ती आपल्याला आठवण करून देते की, समाजात बदल घडवण्यासाठी विचार, धैर्य आणि सामूहिक कृती यांची आवश्यकता असते.

समतेचा भारत हीच बाबासाहेबांची अपेक्षा

बाबासाहेबांचे समतेचे स्वप्न धर्मांतरापुरते मर्यादित नव्हते. भारतीय संविधानाच्या निर्मितीत त्यांनी बजावलेली भूमिका आणि सामाजिक न्यायासाठी केलेला संघर्ष यांतून त्यांची व्यापक दृष्टी स्पष्ट होते. भारतीय संविधानाने समानतेचा अधिकार मान्य केला आणि अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याची तरतूद केली. मात्र कायद्याने समानता मान्य करणे आणि समाजाने ती प्रत्यक्ष आचरणात आणणे यांत अंतर असू शकते, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. बाबासाहेबांना अशी लोकशाही अपेक्षित होती, जिथे राजकीय अधिकारांबरोबरच सामाजिक जीवनातही समान प्रतिष्ठा असेल. एखाद्या व्यक्तीची जात, जन्म किंवा सामाजिक पार्श्वभूमी तिच्या प्रगतीच्या आड येऊ नये. प्रत्येकाला शिक्षण, संधी आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा.

बुद्धाच्या धम्मातील करुणा आणि मैत्रीची मूल्ये अशा समाजनिर्मितीला नैतिक आधार देतात. दुसऱ्याला कमी न लेखणे, अन्यायाबद्दल संवेदनशील असणे आणि सामाजिक व्यवहारात माणुसकीला प्राधान्य देणे, ही समतेच्या समाजाची आवश्यक लक्षणे आहेत.

समता म्हणजे केवळ सर्वांना समान शब्दांत संबोधणे नव्हे. ती प्रत्येकाच्या अधिकारांचा आदर करण्यात, संधी उपलब्ध करून देण्यात आणि भेदभावाला विरोध करण्यात दिसली पाहिजे. बंधुता म्हणजे केवळ एकत्र उभे राहणे नव्हे; तर दुसऱ्याच्या प्रतिष्ठेला स्वतःच्या प्रतिष्ठेइतकेच महत्त्व देणे होय.

आजच्या समाजाला धम्मक्रांती काय सांगते ?

आज शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिक विचारांच्या क्षेत्रांत मोठी प्रगती झाली आहे. विविध सामाजिक पार्श्वभूमीतील लोक नवनवीन क्षेत्रांत कर्तृत्व सिद्ध करीत आहेत. तरीही जातीय भेदभाव, सामाजिक विषमता आणि पूर्वग्रह पूर्णपणे संपलेले नाहीत. त्यामुळे बाबासाहेबांच्या धर्मांतराचा विचार आजही महत्त्वाचा ठरतो. १४ ऑक्टोबरला अभिवादन करणे, दीक्षाभूमीला भेट देणे किंवा धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे कार्यक्रम आयोजित करणे यांना महत्त्व आहे. मात्र या कृतींबरोबरच आपण बुद्ध आणि बाबासाहेबांच्या विचारांना किती समजून घेतले, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे.

आपल्या वर्तनात भेदभाव असेल, दुसऱ्याच्या दुःखाबद्दल संवेदनशीलता नसेल किंवा एखाद्या व्यक्तीचे मूल्य तिच्या जातीवरून ठरवले जात असेल, तर समतेच्या विचाराशी आपले नाते तपासले पाहिजे. धम्माच्या मूल्यांचा स्वीकार केवळ भाषणात किंवा घोषणांत दिसून चालत नाही; तो आपल्या व्यवहारातून दिसला पाहिजे.

बाबासाहेबांनी शिक्षणाला परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन मानले. शिक्षणाने केवळ रोजगार मिळवण्याची क्षमता वाढू नये, तर योग्य-अयोग्य यांचा विचार करण्याची दृष्टीही विकसित व्हावी. सामाजिक प्रश्न समजून घेण्याची, अन्यायाला प्रश्न विचारण्याची आणि विवेकाने निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी. धम्मक्रांतीचा वारसा पुढे नेण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने योगदान देणे आवश्यक आहे. कुटुंबात समानतेचा आदर करणे, कार्यक्षेत्रात भेदभाव टाळणे, सामाजिक व्यवहारात माणुसकी जपणे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे या कृती लहान वाटू शकतात; पण परिवर्तनाची सुरुवात अशाच कृतींमधून होते.

धम्माचा स्वीकार आणि विचारांचे आचरण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करून भारतीय समाजाला एक ऐतिहासिक दिशा दिली. त्यांच्या निर्णयामागे मानवी प्रतिष्ठा, सामाजिक न्याय आणि विवेकशील जीवनाची आकांक्षा होती. बुद्धाच्या धम्मात त्यांना अशा समाजाची शक्यता दिसली, जिथे माणसाच्या जन्मापेक्षा त्याच्या माणूसपणाला महत्त्व असेल कारण धम्म म्हणजे दुसरे तिसरे काही नसून एका माणसाने दुसऱ्या माणसाला भेटणे आहे. हेच बाबासाहेबाला अपेक्षित होते.

दीक्षाभूमीवर एक सूर्यउगवला
धम्म जगाला पटवून दिला
नाही कक्षा त्याच्या करुणेला
अवघा नूरचआभना पलटवला

दीक्षाभूमीवर घेतलेल्या प्रतिज्ञांचा अर्थ आपल्या आचरणात उतरला, बुद्धाच्या करुणेने आपल्या व्यवहाराला संवेदनशीलता दिली आणि बाबासाहेबांच्या समतेच्या विचाराने आपल्या सामाजिक भूमिकेला दिशा दिली, तर धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे स्मरण अधिक अर्थपूर्ण होईल.

बाबासाहेबांना अपेक्षित असलेला समतेचा भारत केवळ अभिवादनांतून घडणार नाही; तो घडेल विवेकशील विचारांतून, भेदभावमुक्त व्यवहारांतून आणि प्रत्येक माणसाच्या प्रतिष्ठेचा स्वीकार करणाऱ्या कृतींतून. दीक्षाभूमीचा इतिहास आपल्याला हाच प्रश्न विचारतो. आपण बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा केवळ जपतो आहोत, की तो आपल्या जगण्यातही उतरवत आहोत?

दसरा : हिंदू आणि बौद्ध बांधवांचा एक अत्यंत पावन महोत्सव

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली



दसरा- अशोक विजयादशमी हा बौद्धधम्म आणि हिंदू धर्मातील एक प्रमुख आणि अत्यंत उत्साहाने साजरा केला जाणारा सण आहे. याबद्दलची महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे- दसरा कधी साजरा केला जातो? हा सण आश्विन शुद्ध दशमीला- शरद नवरात्रोत्सवानंतर दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. नवरात्रीच्या नऊ दिवसांच्या उपवास आणि देवीच्या आराधनेनंतर दहाव्या दिवशी 'विजयादशमी' येते. दसरा साजरा करण्यामागची कारणे व आख्यायिकाः महिषासुर वधः देवी दुर्गेने नऊ दिवस युद्ध करून दहाव्या दिवशी महिषासुर राक्षसाचा वध केला, त्यामुळे या दिवसाला 'विजयादशमी' म्हणतात. प्रभू श्रीराम विजयः प्रभू श्रीरामांनी याच दिवशी रावण वध करून सीतामातेला मुक्त केले होते. पांडवांचे शस्त्रपूजनः अज्ञात वासात जाण्यापूर्वी पांडवांनी आपली शस्त्रे शमीच्या झाडावर लपवून ठेवली होती आणि दसऱ्याच्या दिवशी ती परत घेतली होती. शेतीचा सणः हा एक कृषिविषयक लोकोत्सव आहे, ज्यामध्ये शेतातले नवीन पीक घरात येते. दसऱ्याचे मुख्य विधी आणि परंपराः शमी / आपट्याची पाने-सोने देणेः या दिवशी आपट्याची वा शमीची पाने एकमेकांना देऊन "सोने लुटण्याची" आणि आपसात गोड बोलून सदिच्छा देण्याची परंपरा आहे. शस्त्र आणि वाहन पूजनः या दिवशी घरातील शस्त्रे, अवजारे, वाहने आणि यंत्रांची पूजा केली जाती. सरस्वती व अपराजिता पूजाः या दिवशी पुस्तके आणि ज्ञानाच्या साधनांची-सरस्वती पूजन तसेच अपराजिता देवीची पूजा केली जाते. रावण दहनः उत्तर, पश्चिम व मध्य भारतात या दिवशी रावणाच्या पुतळ्याचे दहन केले जाते. अशोक विजयादशमी हा बौद्ध आणि ऐतिहासिक परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी बौद्धबांधव एकत्रित बुद्धवंदना करुन समता, बंधुभाव आणि करुणेचा संदेश देतात तसेच धम्मप्रसार करतात.

दसरा- अशोक विजयादशमी हा भारत आणि नेपाळमध्ये दरवर्षी नवरात्रीच्या शेवटी साजरा केला जाणारा एक प्रमुख हिंदू- बौद्ध सण आहे. याला 'दसरा', 'दशहरा' किंवा 'दशैन' या नावानेही ओळखले जाते. हा सण हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे आश्विन महिन्याच्या दहाव्या दिवशी साजरा केला जातो. आश्विन महिना हा हिंदू सौर दिनदर्शिकेतील सातवा महिना असतो, जो सामान्यतः सप्टेंबर आणि ऑक्टोबर या ग्रेगोरियन महिन्यांत येतो. विजयादशमी म्हणजेच आश्विन शुद्ध दशमी हा दिवस भारतीय संस्कृतीत महत्त्वाचा मानला जातो. देवीच्या घटांची स्थापना आश्विन शुद्ध प्रतिपदेला केल्यानंतर देवीचे नवरात्र साजरे होते.

विजयादशमी वेगवेगळ्या कारणांसाठी साजरी केली जाते आणि भारतीय उपखंडातील नेपाळी आणि भारतातील विविध प्रांतात वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. भारताच्या दक्षिणेकडील, पूर्वेकडील, ईशान्येकडील आणि काही उत्तरेकडील राज्यांमध्ये, विजयादशमीला दुर्गापूजेची समाप्ती होते. या दिवशी देवी दुर्गाने महिषासुर या म्हैसस्वार राक्षसावर विजय मिळवून धर्माचे रक्षण केले होते. उत्तर, मध्य आणि पश्चिम राज्यांमध्ये, या सणाला दसरा म्हणतात (तसेच याला दशहरा देखील म्हणतात). या प्रदेशांमध्ये, या सणाला रामलीलाची समाप्ती होते आणि प्रभू श्रीरामाने रावणावर केलेल्या विजयाचे स्मरण केले जाते. वैकल्पिकरित्या, हा सण दुर्गा किंवा सरस्वती सारख्या देवींच्या विविध पैलूंबद्दल आदर दर्शवतो.

विजयादशमीच्या उत्सवात नदी किंवा महासागराच्या समोर मिरवणूक काढली जाते. या मिरवणुकीत देवी दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, गणेश आणि कार्तिकेय यांच्या मातीच्या मूर्ती संगीत आणि मंत्रांसह घेऊन जातात. त्यानंतर या मूर्ती पाण्यात विसर्जित केल्या जातात. इतरत्र, दसऱ्याच्या दिवशी, वाईटाचे प्रतीक असलेल्या रावणाच्या भव्य पुतळ्यांना फटाक्यांसह जाळले जाते. हे रावणदहन वाईटाचा नाश असल्याचे प्रतीक मानले जाते. विजयादशमीनंतर वीस दिवसांनी साजरा होणाऱ्या दिवाळीची तयारीही या सणातून सुरू होते. दिवाळी हा दिव्यांचा महत्त्वाचा हिंदू सण आहे.

अशोक विजयादशमी हा बौद्ध आणि ऐतिहासिक परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. मुख्य माहिती व इतिहासः (१) सम्राट अशोक आणि बौद्धधम्म दीक्षाः तिसऱ्या शतकात (इ.स.पू. २६५ नंतर) कलिंग युद्धातील भीषण रक्तपात आणि हिंसा पाहून सम्राट अशोकाचे मनपरिवर्तन झाले. चतुरस्र विजय प्राप्त होत असतानाही त्यांनी युद्धाचा त्याग करून भंते मोग्गिपुत्त तिस्स यांच्याकडून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि अहिंसेचा मार्ग स्वीकारला. हा दिवस "अशोक विजयादशमी" म्हणून ओळखला जातो. (२) धम्मक्रांतीचे प्रतीकः सम्राट अशोकाने युद्ध जिंकून नाही, तर स्वतःच्या मनातील हिंसेवर आणि क्रूरतेवर विजय मिळवून धम्माचा स्वीकार केला, म्हणून या दसऱ्याच्या दिवसाला "अशोक विजयादशमी" म्हटले जाते. (३) विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मदीक्षाः दि.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्याच मुहूर्तावर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर आपल्या ५,००,००० अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. तेव्हापासून हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि अशोक विजयादशमी म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. (४) सामाजिक व सांस्कृतिक महत्त्वः या दिवशी बौद्ध अनुयायी एकत्र येऊन बुद्धवंदना घेतात, समता, बंधुभाव आणि करुणेचा संदेश देतात तसेच धम्मप्रसारही करतात.

– ९६९९८३६७१७

दसरा, विजयादशमी आणि सीमोल्लंघन

नवरात्रीच्या नऊ दिवसांच्या अखंड जागरणांती, उपवासांती आणि आदिशक्तीच्या कठोर उपासनेनंतर येणारा दिवस आपण 'दसरा', 'विजयादशमी' किंवा 'सीमोल्लंघनाचा दिवस' म्हणून अत्यंत उत्साहात आणि मांगल्याच्या वातावरणात साजरा करतो. हिंदू धर्मातील साडेतीन मुहूर्तांपैकी एक अत्यंत पवित्र आणि पूर्ण मुहूर्त असलेला हा सण असत्यावर सत्याच्या, अन्यायावर न्यायाच्या, अंधकारावर प्रकाशाच्या आणि अधर्मावर धर्माच्या विजयाचे अजोड प्रतीक आहे. भारतीय पंचांगानुसार गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया आणि दसरा हे तीन पूर्ण मुहूर्त मानले जातात, तर दिवाळीतील बलिप्रतिपदा हा अर्धा मुहूर्त असतो. दसरा हा पूर्ण मुहूर्त असल्यामुळे या दिवशी कोणतेही शुभकार्य, नवीन व्यवसाय, वास्तू खरेदी, गृहप्रवेश किंवा सोने खरेदी करण्यासाठी पंचांग किंवा विशिष्ट वेळ पाहण्याची अजिबात गरज नसते; कारण हा संपूर्ण दिवस अतिशय शुभ व फलदायी मानला जातो. यंदा अश्विन शुद्ध दशमीला म्हणजेच २० ऑक्टोबर २०२६ रोजी हा मांगल्याचा, शौर्याचा आणि विजयाचा महाउत्सव संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा केला जात आहे. या सणाला केवळ पौराणिक कथांचाच आधार नाही, तर यामागे एक अत्यंत सखोल आध्यात्मिक, ऐतिहासिक, कृषीविषयक आणि सामाजिक अधिष्ठान दडलेले आहे, जे आजच्या आधुनिक काळातही तितकेच अभ्यासपूर्ण आणि मार्गदर्शक ठरते.

'दसरा' हा शब्द मूळ संस्कृत 'दशहरा' या शब्दावरून रूढ झाला आहे. 'दश' म्हणजे दहा आणि 'हरा' म्हणजे नष्ट करणे किंवा पराभूत करणे. पौराणिक मान्यतेनुसार, प्रभू श्रीरामाने याच दिवशी दहा तोंडे असलेल्या लंकापती रावणाचा वध करून अधर्माचा समूळ नाश केला आणि रामराज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणली. परंतु, या कथेचे खरे आध्यात्मिक महत्त्व मानवी मनाशी जोडलेले आहे. रावणाची ही दहा तोंडे म्हणजे माणसाच्या आत दडलेली काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, अहंकार, आळस, अज्ञान आणि हिंसा या दहा अंतस्थ अवगुणांचे किंवा दुर्गुणांचे प्रतीक आहेत. या सर्व नकारात्मक अवगुणांचा समूळ नाश करून मनाला शुद्ध करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने दसरा साजरा करणे होय. दुसरीकडे, 'विजयादशमी' हा शब्द 'विजया' आणि 'दशमी' या दोन शब्दांच्या संयोगातून बनला आहे. देवी दुर्गेने सलग नऊ दिवस अखंड आणि तुंबळ युद्ध करून महिषासुराचा वध केला आणि या सृष्टीला भयमुक्त केले. या असुरी प्रवृत्तीवरील विजयाच्या स्मरणार्थ गावाची वेस ओलांडताना देवी 'अपराजिता' हिची पूजा केली जाते. यासोबतच, महाभारतातील पांडवांनी आपला एक वर्षाचा कठीण अज्ञातवास संपवून याच दिवशी शमीच्या वृक्षावर लपवून ठेवलेली आपली गांडीव धनुष्यासारखी दिव्य शस्त्रे पुन्हा हाती घेतली आणि विराटाच्या गायी पळवणाऱ्या कौरवांवर स्वारी करून मोठा विजय मिळवला होता. शमी हे झाड अत्यंत औषधी असून ते अग्नीचे आणि ऊर्जेचे प्रतीक मानले जाते, म्हणूनच कोणत्याही मोठ्या कार्याला सुरुवात करण्यापूर्वी शमीची पूजा करून विजयाचा आशीर्वाद मागितला जातो.

भारतीय संस्कृती ही मुळात कृषीप्रधान असल्याने दसरा हा भारतातील एक महत्त्वाचा कृषी लोकोत्सवदेखील आहे. पावसाळ्यात पेरलेले खरिपाचे पहिले पीक याच काळात शेतकऱ्याच्या घरात येते. नवराज्ञात घटस्थापनेच्या वेळी नऊ प्रकारची धान्ये रुजवली जातात आणि दसऱ्याच्या दिवशी या धान्यांचे वाढलेले हिरवेगार आणि टवटवीत अंकुर उपटून देवाला तसेच घरातील वडीलधाऱ्या मंडळींना वाहिले जातात. बळीराजाने निसर्गाचे आणि काळ्या आईचे मानलेले हे कृतज्ञतेचे आभार असतात. याच दिवशी आपट्याची पाने 'सोने' म्हणून एकमेकांना वाटण्याची अतिशय प्राचीन आणि सुंदर प्रथा महाराष्ट्रात रूढ आहे. या प्रथेमागे रघुराजा आणि कौत्स ऋषींची एक अध्यासपूर्ण आणि संस्कारक्षम कथा आहे. कौत्स नावाच्या एका अत्यंत हुशार शिष्याला विद्याभ्यास पूर्ण झाल्यानंतर आपल्या गुरूंना १४ कोटी सुवर्णमुद्रा गुरुदक्षिणा म्हणून द्यावयाच्या होत्या. सर्वसामान्य कुटुंबातील कौत्साने वासाठी थेट अयोध्येचा उदार राजा रघु याच्याकडे मदत मागितली. रघुराजाने नुकताच 'विश्वजित' नावाचा मोठा यज्ञ करून आपली सर्व संपत्ती दान केली होती, तरीही आपल्या दारी आलेल्या एका विद्याथ्यार्ला त्याने रिकाम्या हाताने परत पाठवले नाही. राजाने या सुवर्णमुद्रांसाठी थेट देवांचा खजिनदार कुबेर आणि इंद्र यांच्यावर स्वारी करण्याचे ठरवले. राजाच्या शौर्याची कल्पना असल्याने इंद्राने कुबेराकरवी गावाबाहेरील आपट्याच्या आणि शमीच्या झाडांवर १४ कोटी सुवर्णमुद्रांचा पाऊस पाडला. कौत्साने अत्यंत प्रामाणिकपणे त्यातील केवळ १४ कोटी मुद्रा घेतल्या आणि उरलेल्या सर्व मुद्रा राजाच्या सांगण्यावरून प्रजेने लुटून नेल्या. यातूनच आपट्याची पाने सोने म्हणून वाटण्याची आणि थोरामोठ्यांचा आशीर्वाद घेत सामाजिक कृतज्ञता व्यक्त करण्याची प्रथा रूढ झाली.

– प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल, वर्धा